
मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक - ५७ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये




माझ्या संग्रहातील कृष्ण वैभव! पान ४

## माजी निवडणूक आयुक्त राजीव कुमार आहेत कुठे?-राऊत

**मुंबई:** माजी उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांच्यानंतर आता माजी मुख्य निवडणूक आयुक्तही बेपत्ता झाले असल्याचे शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत म्हणाले आहेत. आज माध्यमांशी बोलत असताना ते म्हणाले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राजीव कुमार मुख्य निवडणूक आयुक्त होते. ज्यांच्या मदतीने नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी निवडणूक जिंकली, ते राजीव कुमार कुठे आहेत? माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड बेपत्ता झाले तसे तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार कुठे आहेत? हा माझा प्रश्न आहे, असे संजय राऊत म्हणाले.

# एनडीएकडून उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे उपराष्ट्रपतीपदासाठी एनडीएचे उमेदवार असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांच्यात झालेल्या बैठकीत यावर एकमत झाले. नड्डा यांनी पत्रकार परिषदेत याची घोषणा केली.

पत्रकार परिषदेत बोलताना जे पी नड्डा म्हणाले की, आम्ही विरोधी पक्षांशीही संवाद साधू. उपराष्ट्रपती पदासाठी बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी आम्हाला त्यांचा पाठिंबाही मिळाला पाहिजे. आम्ही आधी म्हटल्याप्रमाणे, आम्ही त्यांच्या संपर्कात आहोत आणि आमच्या वरिष्ठ नेत्यांनी यापूर्वीही त्यांच्याशी संपर्क साधला आहे आणि आताही आम्ही त्यांच्या संपर्कात राहू. आमच्या सर्व एनडीए मित्रपक्षांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. सी पी राधाकृष्णन हे उपराष्ट्रपतीपदासाठी आमचे एनडीए उमेदवार आहेत.



राधाकृष्णन 21 ऑगस्ट रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील. या दरम्यान, एनडीए शासित राज्यांचे सर्व मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देखील उपस्थित राहतील. उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी 9 सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणीही होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख 21 ऑगस्ट आहे. 25 ऑगस्टपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल.

दरम्यान, जगदीप धनखड यांनी 21 जुलै रोजी अचानक उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला. धनखड यांचा कार्यकाळ 10 ऑगस्ट 2027 पर्यंत होता. मात्र त्यांनी अचानक त्यांनी राजीनामा दिल्याने यापदासाठी आता निवडणूक होत आहे.

## कोल्हापूर खंडपीठ देशातील सामाजिक न्यायासाठी मैलाचा दगड ठरेल...

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते कोल्हापूर सर्किट बेंच इमारतीचे उद्घाटन

### लवकरच खंडपीठात रूपांतर करणार; राजर्षी शाहूंच्या भूमीतून शाहू-आंबेडकरांना स्मरत सरन्यायाधीशांनी दिला शब्द

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच इमारतीचे उद्घाटन व कोनशिला अनावरण करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळयास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार शाहू महाराज छत्रपती, खासदार धैर्यशील माने यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती चंद्रशेखर, सर्किट बेंचसाठी नियुक्त केलेले न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती शिवकुमार दिगे, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख, न्यायमूर्ती एस.जी.चपळगावकर, मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डांगरे, कोल्हापूर जिल्हा पालक न्यायमूर्ती मनीष पितळे, न्यायमूर्ती अनिल किलोर, आमदार चंद्रदीप नरके, आमदार शिवाजी पाटील, जिल्हाधिकारी अमोल येडगे, महापालिका आयुक्त के.मंजूलक्ष्मी, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, ज्येष्ठ संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोलीसांकडून उपस्थित मान्यवरांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आले. यानंतर मान्यवरांनी सर्किट बेंच इमारत परिसराची पाहणी केली.

राज्य शासनाच्या वतीने सीपीआरच्या समोरील या सर्किट बेंच इमारतीसाठी ४६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा प्रशासन, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग यांच्या समन्वयातून येथील इमारती व या परिसराचे उत्कृष्ट पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले आहे.

सीपीआर समोरील जिल्हा न्यायालयाची इमारत सन १८७४ मध्ये बांधण्यात आली आहे. जिल्हा न्यायालयाचा परिसर साधारण ४२०० चौरस फूट क्षेत्रात आहे. कसबा बावडा येथील जागेत जिल्हा न्यायालयाची नवी इमारत स्थलांतरीत झाल्यामुळे ही इमारत बंद होती. तथापि, काही इमारतीमध्ये

पान ५ वर

# मतचोरीच्या आरोपांवर प्रतिज्ञापत्र द्या अथवा माफी मागा!

## निवडणूक आयोगाचा गांधींवर नाव न घेता निशाणा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

निवडणूक आयोग (EC) नवी दिल्लीतील राष्ट्रीय मीडिया सेंटरमध्ये पत्रकार परिषद घेत आहे. राहुल गांधी यांचे नाव न घेता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले - पीपीटी प्रेझेंटेशनमध्ये दाखवलेला डेटा आमचा नाही. मत चोरीच्या आरोपांवर प्रतिज्ञापत्र द्या किंवा देशाची माफी मागा. जर ७ दिवसांत प्रतिज्ञापत्र प्राप्त झाले नाही तर आरोप निराधार मानले जातील.



मत चोरी आणि एखाद्या पक्षाशी संगनमत असल्याच्या विरोधकांच्या आरोपांवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले - आमच्यासाठी कोणताही सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष नाही. सर्व राजकीय पक्ष समान आहेत. जर त्रुटी दूर करण्यासाठी अर्ज योग्य वेळी केला गेला नाही आणि नंतर मत चोरीसारखे चुकीचे शब्द वापरून जनतेची दिशाभूल केली गेली तर हा लोकशाहीचा अपमान आहे.

ज्ञानेश कुमार म्हणाले - काही मतदारांनी मत चोरीचे आरोप केले, पुरावे मागितल्यावरही उत्तर मिळाले नाही. निवडणूक आयोग अशा आरोपांना घाबरत नाही. निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून मतदारांना लक्ष्य केले जात असताना, आम्ही हे स्पष्ट करतो की निवडणूक आयोग निर्भयपणे गरीब, श्रीमंत, वृद्ध, महिला, तरुण आणि सर्व धर्म आणि वर्गाच्या लोकांसोबत दगडासारखे उभे आहे, उभे होते आणि उभे राहील.

७ ऑगस्ट रोजी राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मत चोरीचा आरोप केला होता. ते म्हणाले होते की, 'मतांची चोरी होत आहे. निवडणूक आयोग या चोरीत सहभागी आहे याचे पुरावे आमच्याकडे आहेत. ते भाजपसाठी हे करत आहेत.'

राहुल गांधी यांनी मतदार यादीतील अनियमिततेवर १ तास ११ मिनिटे २२ पानांचे सादरीकरण केले. राहुल यांनी कर्नाटकची मतदार यादी स्क्रीनवर दाखवली आणि मतदार यादीत संशयास्पद मतदार असल्याचे सांगितले.

### *निवडणूक आयोगाने भाजपने दिलेली स्क्रीप्ट वाचून दाखवली!*



*नाशिक : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या मतचोरीच्या आरोपावर आज निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद देत स्पष्टीकरण दिले. मात्र, निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टीका केली आहे. पत्रकार परिषद हा निवडणूक आयोगाचा केविलवाणा प्रयत्न होता. त्यांनी भाजपने दिलेली स्क्रीप्ट वाचून दाखवली, असा हल्लाबोल हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केलेल्या 'मतांच्या चोरी'च्या आरोपांनंतर आज आयोगाने पत्रकार परिषद घेत जोरदार प्रत्युत्तर दिले. 'आमच्यासाठी सर्व पक्ष समान आहेत आणि लोकांची दिशाभूल करणे हे संविधानाचा अपमान आहे,' असे म्हणत आयोगाने 'राजकारण बंद करा' असा इशारा दिला. मात्र, निवडणूक आयोगाच्या या भूमिकेवर पलटवार करताना हर्षवर्धन सपकाळा यांनी उपरोक्त टीका केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते, त्यानंतर आज पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगानं आपल्यावर करण्यात आलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिलं.*

## म हत्त्वा चे

### केरळ पहिले डिजिटल साक्षर राज्य

**तिरुअनंतपुरम :** केरळने एक ऐतिहासिक टप्पा गाठत स्वतःला देशातील पहिले 'संपूर्ण डिजिटल साक्षर' राज्य म्हणून स्थापित केले आहे. 2022 मध्ये सुरू झालेल्या एका महत्त्वाकांक्षी मोहिमेने चार वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर हे यश मिळवले आहे. या मोहिमेमुळे राज्यातील 14 ते 65 वयोगटातील 99.98 टक्के नागरिक आता स्मार्टफोन वापरणे, डिजिटल पेमेंट करणे आणि ऑनलाईन शासकीय सेवांचा लाभ घेण्यास सक्षम झाले आहेत. येत्या 21 ऑगस्ट रोजी याची अधिकृत घोषणा होणार असून, या उपक्रमाने लाखो नागरिकांना डिजिटल जगाशी यशस्वीपणे जोडले आहे. 'डिजी केरळ' या नावाने राज्यभरात राबवलेल्या या प्रकल्पाने केवळ तंत्रज्ञानाचा प्रसार केला नाही, तर सामान्य नागरिकांच्या जीवनात मोठा बदल घडवून आणला आहे. या मोहिमेची सुरुवात थिरुवनंतपुरम जिल्ह्यातील 'पुल्लमपारा' या ग्रामपंचायतीपासून झाली, जी देशातील पहिली संपूर्ण डिजिटल साक्षर पंचायत ठरली होती.

### न्यूयॉर्कमध्ये गोळीबार, तिघांचा मृत्यू, 8 जण जखमी

**न्यूयॉर्क :** न्यूयॉर्क पोलीस आयुक्त जेसिका टिश यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, मृत्यूमुखी पडलेले तिन्ही व्यक्ती पुरुष होते. यापैकी दोघांचे वय 27 आणि 35 वर्षे आहे, तर तिसऱ्या व्यक्तीच्या वयाबाबत अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही. घटनास्थळावरून 36 हून अधिक काडतुसांचे खोके सापडले आहेत, ज्यावरून कमीत कमी 36 गोळ्या झाडल्या गेल्याचे स्पष्ट होते. टिश यांनी सांगितले की, या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक झालेली नाही आणि संशयितांची ओळख पटलेली नाही.

# पुतिन - ट्रम्प भेटीनंतर काही तासातच रशियाचा युक्रेनवर हवाई हल्ला

**वृत्तसंस्था**
**मॉस्को**

रशियाने पुन्हा एकदा यूक्रेनवर मोठा हवाई हल्ला चढवत, 85 'शाहेद' प्रकारचे ड्रोन आणि एक इस्कंदर-M बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. हा हल्ला रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अलास्का येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर केवळ काही तासांतच करण्यात आला.



यूक्रेनच्या हवाई दलाच्या माहितीनुसार, हा हल्ला 15 ऑगस्टच्या संध्याकाळपासून 16 ऑगस्टच्या पहाटेपर्यंत सुरू होता. युक्रेनमधील अनेक भाग, विशेषतः सीमेवरच्या संघर्षप्रवण भागांना लक्ष्य करण्यात आले.

भूमिगत कारवाईसहीत दोन गावे ताब्यात घेतल्याचा रशियाचा दावा

यूक्रेनने सांगितले की त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेने 85 पैकी 61 ड्रोन पाडण्यात यश मिळवले. मात्र काही ड्रोन टाळता आले नाहीत आणि त्यांनी विविध भागांमध्ये नुकसान केले.

# दिल्ली हे विकसित भारताचे मॉडेल

## पंतप्रधानांच्या हस्ते ११,००० कोटींच्या महामार्ग प्रकल्पांचे उद्घाटन

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

"स्वातंत्र्याच्या महिन्यात दिल्ली विकास क्रांतीची साक्षीदार होत आहे," असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी ११,००० कोटी रुपयांच्या दोन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे उद्घाटन केले. द्वारका एक्सप्रेसवे आणि अर्बन एक्स्टेंशन रोड-२ या प्रकल्पांमुळे दिल्ली हे विकसित होत असलेल्या भारताचे मॉडेल बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



यावेळी आयोजित सभेला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, या प्रकल्पांमुळे दिल्ली, गुरुग्राम आणि संपूर्ण एनसीआरमधील नागरिकांचा प्रवास सुकर होईल, वेळ वाचेल आणि उद्योग-व्यापाराला चालना मिळेल. ते म्हणाले, "जेव्हा जग भारताकडे पाहते, तेव्हा ते प्रथम दिल्लीकडे पाहते. त्यामुळे दिल्लीला विकासाचे मॉडेल बनवणे आवश्यक आहे." गेल्या दशकात दिल्ली-एनसीआरमधील कनेक्टिव्हिटीमध्ये अभूतपूर्व सुधारणा झाली असून, मेट्रोचे जाळे आणि नमो भारत रॅपिड रेलसारख्या आधुनिक सुविधांमुळे दिल्ली जागतिक नकाशावर येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रकल्पांच्या माध्यमातून शाश्वत विकासावरही भर देण्यात आल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. अर्बन एक्स्टेंशन रोडच्या बांधकामात लाखो टन कचऱ्याचा वापर करण्यात आला असून, यामुळे दिल्लीला कचऱ्याच्या ढिगाऱ्यांपासून मुक्त करण्यास मदत होत आहे. तसेच, यमुना स्वच्छता आणि इलेक्ट्रिक बससेवेसारख्या उपक्रमांबद्दल त्यांनी दिल्ली सरकारच्या कामाचे कौतुक केले.

पान ५ वर

# मुसळधार पावसामुळे 23 धरणे तुडुंब

## रायगड जिल्ह्यात प्रमुख नद्या इशारा पातळीवर

**प्रतिनिधी**
**रोहा**

रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपून काढले असून, सलग तिसऱ्या दिवशीही वरुणराजाची कृपा कायम आहे. या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील बहुतांश धरणे तुडुंब भरली असून प्रमुख नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. यामुळे एकीकडे पाणीटंचाईची चिंता मिटली असली तरी, दुसरीकडे नदीकाठच्या गावांमध्ये प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

रविवारी सकाळपासूनच सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जिल्ह्याचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, जिल्ह्यात सरासरी ९६.७१ मि.मी. पावसाची नोंद झाली असून, तब्बल ९ तालुक्यांमध्ये पावसाने शंभरी ओलांडली आहे. सर्वाधिक १५५ मि.मी. पावसाची नोंद म्हसळा तालुक्यात झाली आहे. सततच्या पावसामुळे सुट्टीचा दिवस असूनही बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला. पावसाचा जोर कायम राहिल्याने जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे.

# राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मागील दोन दिवसांपासून संपूर्ण राज्यात मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. राज्यातील अनेक भागात रविवारी देखील मुसळधार पाऊस कोसळला. दरम्यान, पुढील चार ते पाच दिवस राज्यात सर्वदूर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत काही भागात अतिवृष्टीचीही शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात दोन कमी दाब क्षेत्र निर्माण झाली आहेत. त्याचाच प्रभाव म्हणून पुढील पाच दिवस संपूर्ण राज्यात पावसाचे प्रमाण वाढणार आहे. या कालावधीत काही भागात अतिवृष्टीची शक्यता आहे. प्रामुख्याने कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर सर्वाधिक असणार आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून राज्यात पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे तापमानात वाढ झाली होती. पाऊस पुन्हा सक्रिय झाल्यामुळे संपूर्ण राज्यात वाढू लागलेल्या तापमानापासून दिलासा मिळाला आहे. मुंबई शहर तसेच उपनगरातही रविवारी सकाळपासून पावसाने हजेरी लावली होती. मागील तीन दिवसांपासून मुंबईत संततधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात रविवारी सकाळी ८.३० ते ५.३० पर्यंत २०.४ मिमी, तर सांताक्रूझ केंद्रात २०.९ मिमी पावसाची नोंद झाली. पुढील तीन दिवस पावसाची तीव्रता अधिक असेल. मुंबई बरोबरच ठाणे, नवी मुंबई परिसरातही मुसळधार पाऊस पडेल. मुंबईसह ठाणे पालघर जिल्ह्यात सोमवार आणि मंगळवार मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. काही ठिकाणी या कालावधीत कमी वेळात जास्त पाऊस पडण्याचीही शक्यता आहे. प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय भागातील पेरूजवळ पाण्याच्या पृष्ठभागाचे तापमान १५ अंश सेल्सिअस तर इक्वेडोरजवळ ते १७ अंश सेल्सिअस इतके कमी असल्याने 'ला-निना'चा प्रभाव वाढत आहे.

# गाझा संकट अधिक गडद : इस्रायल नव्या लष्करी कारवाईच्या तयारीत

**तेल अवीव**

इस्रायलने गाझामध्ये मोठी लष्करी कारवाई करण्याची योजना आखली आहे. या योजनेनुसार सध्या पॅलेस्टिनी नागरिक राहात असलेल्या आणि युद्ध क्षेत्रातून त्यांना दक्षिणेकडे ढकलण्यासाठी नवे हल्ले करण्याची योजना आखली आहे. त्याचवेळी ओलिसांचे कुटुंबीय आणि इस्रायलसह जगभरातील मानवतावादी संघटनांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.



इस्रायलने गाझा पट्टीतील काही सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भागांमध्ये लष्करी कारवाई तीव्र करण्याची घोषणा केली आहे. नागरिकांचे स्थलांतर, लढाईच्या भागातून पॅलेस्टिनी नागरिकांना दक्षिण गाझामध्ये हलवण्याची तयारी सुरू आहे. विस्थापित नागरिकांसाठी तंबूंचा पुरवठा पुन्हा सुरू केला जाईल, असे इस्रायली लष्कराच्या मानवतावादी शाखेने (COG-T) सांगितले आहे.

# योगींच्या गोटात खळबळ!

## 100 हून अधिक आमदारांचा पत्ता कट होण्याची शक्यता

**वृत्तसंस्था**
**गोरखपूर**

दोन वर्षांनी उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. एकीकडे विरोधक मोर्चेबांधणी करत असताना दुसरीकडे भाजपाच्या गोटात खळबळ उडाली आहे. भाजपाच्या १०० ते ११५ आमदारांचे तिकीट कापले जाण्याची शक्यता आहे. जे आमदार गेल्यावेळी भाजपाच्या जिवावर निवडून आले आणि आताही तेच करायच्या तयारीत असलेल्या या आमदारांचा नंबर यात आहे.

महत्वाचे म्हणजे हा आकडा भाजपाच्या निम्म्या आमदारांएवढा आहे. या आमदारांच्या जागी भाजपा दुसऱ्या पक्षातून आलेल्या नेत्यांना तिकीट देण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे भाजपाच नाही तर सपाच्या भाजपमध्ये येऊ इच्छुक असलेल्या आमदारांसमोरही अडचणी वाढण्याची शक्यता आहे.



भाजपाच्या आमदारांसोबतच सपाच्या आमदारांनाही भाजपात जाताना किंवा गेल्यावर अंतर्गत सर्वेक्षण चाचणी पास करावी लागणार आहे. भाजपाला विजयाची हॅटट्रीक करायची आहे. तर सपा भाजपाविरोधात पीडीएचा मुद्दा उचलत आहे. यामुळे भाजपाने अंतर्गत हालचाली सुरु केल्याचे राजकीय तज्ञांचे मत आहे.

भाजपा लवकरच अंतर्गत सर्व्हे करण्याची तयारी करू शकते. प्रत्येक विधानसभा जागेवर भाजपा आपल्या आमदारांचा खरा चेहरा तपासणार आहे. याचसोबत सपाच्या ताब्यात असलेल्या जागांवरही तपासणी केली जाणार आहे. लोकसभेला भाजपाला मोठा फटका बसला होता, यामुळे विधानसभेला भाजपा ताकद नसलेल्या आमदारांना बाजुला करण्याची रणनिती आखत आहे. यामुळे घराणेशाहीला देखील बगल देण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# त्र्यंबकेश्वर मंदिराबाहेर सुरक्षारक्षकांकडून शिवभक्तांना बेदम मारहाण

## 10 भाविक जखमी

**प्रतिनिधी**
**नाशिक**

सलग तीन दिवस सुट्ट्या आल्यामुळं त्र्यंबकेश्वरला महादेवाचं दर्शन घेण्यासाठी भाविकांनी तुफान गर्दी केली. त्यामुळं उत्तर दरवाज्यातून मुखदर्शनासाठी काही काळ भाविकांना प्रवेश देऊन तो नंतर बंद करण्यात आल्यानं भाविकांनी संताप व्यक्त केला. त्यातील काही भाविकांनी व्यवस्थापकांना धक्काबुक्की केल्यानंतर संस्थानच्या खासगी सुरक्षारक्षकांनी भाविकांना मारहाण केली. यात आठ ते दहा भाविक जखमी झाले आहेत.



भाविकांना धक्काबुक्की केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, याबाबत भाविकांनी नाराजी व्यक्त केली. देशातील 12 ज्योतिर्लिंगांपैकी त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर महत्वाचं ज्योतिर्लिंग आहे. श्रावण महिना सुरू असल्यानं दररोज लाखोंच्या संख्येनं भाविक दर्शनासाठी त्र्यंबकेश्वरमध्ये दाखल होत आहेत.

मुंबई: सहकार शिक्षण संस्था संचालित सहकार रात्र शाळेमधून शालान्त परीक्षा २०२५ मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली विद्यार्थिनी सौ. पुष्पा सखाराम बिरामणे-शिंदे स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात पारितोषिक स्वीकारताना, सोबत संस्थेचे अध्यक्ष जगदीश नलावडे, कार्याध्यक्ष गजानन रेवडेकर आणि खजिनदार रत्नाकर पवार प्रकाशचित्रात दिसत आहेत.



## थोडक्यात

### ऑडिट अहवालात बँकेच्या तत्कालीन व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह

**मुंबई:** येस बँकेच्या जुन्या व्यवहारांची चौकशी करणाऱ्या विशेष ऑडिट अहवालात ₹५०० कोटींच्या मोठ्या कर्ज व्यवहारात गंभीर त्रुटी आणि निधीचा संशयास्पद वापर दिसून आला आहे. अहवालानुसार, २०१७ मध्ये बँकेने एचडीआयएल कंपनीचे सुमारे ₹५२३ कोटींचे कर्ज सुरक्षा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीला ₹५१८ कोटींना विकले. ऑडिट अहवालात "फंड राउंड-ट्रिपिंग" असा संशय आहे. त्यानंतर बँकेने दावा केला की तिला १५% कॅश मार्जिन मिळाले, परंतु ऑडिट तपासणीत असे आढळून आले की ही रक्कम अप्रत्यक्षपणे येस बँकेकडूनच आली. म्हणजेच खरेदीदार कंपनीला खरेदीसाठी बँकेकडून पैसे मिळाले. विशेष ऑडिटमध्ये असेही उघड झाले की या व्यवहारात कोणतीही ओपन बोली लावण्यात आली नाही किंवा स्वतंत्र मूल्यांकन करण्यात आले नाही. एनपीए होण्याच्या मार्गावर असलेली काही खाती देखील बाजार तपासणीशिवाय विकली गेली. २०१७ मध्येच, या एआरसीने बँकेच्या ९८% मालमत्ता खरेदी केल्या, ज्यामुळे संभाव्य पक्षपातीपणाचे प्रश्न उपस्थित झाले. अहवालात २०२० पूर्वी बँकेच्या तत्कालीन व्यवस्थापनाने घेतलेल्या कर्ज आणि पुनर्रचना निर्णयांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. अहवाल समोर आल्यानंतर, नियामक संस्था आणि तपास अधिकारी या व्यवहारावर लक्ष ठेवून आहेत. जर तपासात अनियमितता सिद्ध झाली, तर हे प्रकरण केवळ बँक आणि सुरक्षा एआरसीसाठीच नव्हे तर संपूर्ण मालमत्ता पुनर्प्राप्ती क्षेत्रासाठी मोठ्या बदलांचे कारण बनू शकते.

### ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ.य.बा.दळवी कालवश!



**मुंबई:** ज्येष्ठ समाजवादी नेते आणि कणकवली-मालवणचे भूतपूर्व आमदार डॉ. यशवंतराव बाबाजी दळवी तथा य. बा. यांचे आज मुंबई मुक्कामी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी फेब्रुवारी महिन्यात शंभराव्या वर्षात पदार्पण केले होते. 'आमचे डॉक्टर' या नावाने कणकवली तालुक्यामध्ये सुपरीचीत असणारे डॉ.य. बा दळवी १९६२साली कणकवली व तद्नंतर मालवण (१९७८) या मतदारसंघातून प्रजा समाजवादी पक्ष आणि जनता दलाच्या तिकिटावरून विधानसभेवर निवडून आले होते. ज्येष्ठ समाजवादी नेते, कोकणचे सुपुत्र बॅरिस्टर नाथ पै आणि केंद्रीय माजी अर्थमंत्री आणि रेल्वे मंत्री प्रा. मधु दंडवते यांचे ते विश्वासू सहकारी होते. १९५३ साली वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी मुंबईत न राहता थेट आपले गाव कळसुली गाठले. त्यानंतर कोरोनाच्या साथीमध्ये आजारी पडेपर्यंत अविरत रुग्णसेवा त्यांनी केली. गावासाठी हायस्कूल आणि ओसरगाव- कळसुली तसेच कणकवली- हळवल- शिरवल मार्गे रस्ते श्रमदान आणि भूदान या मार्गाने त्यांनी विकसित केले. त्यांच्या पश्चात पत्नी डॉ. श्रीमती साधना, सुपुत्र रणजीत (क्रीडा पत्रकार) तसेच कन्या कल्पना कदम, दीया मोरे, सुप्रिया सुलचंदानी तसेच नातवंडे-पतवंडे आहेत. नातू अनिरुद्ध हा सध्या वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षण घेत आहे.

# वसईत गेल्या वर्षीपेक्षा यंदा 2228 मिमी पाऊस जास्त, धरणे काठोकाठ

▶ शेतकऱ्यांना दिलासा, पण मुसळधार पावसाने शेतीवर संकट ▶ भर पावसातही वसईत फुटल्या तब्बल १३७४ दहीहंड्या

प्रतिनिधी
■ वसई

यंदाच्या पावसाळ्यात वसई–विरारमध्ये पावसाने अक्षरशः मुसळधार हजेरी लावली आहे. १५ ऑगस्टपर्यंत ४१७३ मिलिमीटर इतका पाऊस नोंदवला गेला असून, हा गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल २२२८ मिलिमीटरने अधिक आहे. मागील वर्षी याच काळात केवळ १९४५ मिलिमीटर पाऊस झाला होता. भारतीय हवामान खात्याने पालघर जिल्ह्यासाठी २१ ऑगस्टपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.तर मुसळधार पावसामुळेधरणे काठोकाठ भरल्याने नागरिकांना पाणीटंचाईपासून दिलासा मिळाला असला तरी





**दहीकाला उत्सवाची रंगत**

दरम्यान, मुसळधार पावसातही वसईत दहीहंडी उत्सवाची रंगत ओसरली नाही. तब्बल १३७४ दहीहंड्या गोविंदा पथकांनी फोडल्या. यामध्ये २२२८ सार्वजनिक दहीहंड्या आणि १,०८६ खाजगी दहीहंड्यांचा समावेश होता. मानाच्या दहीहंड्यांसाठी मोठी चढाओढ झाली असून, रात्री उशिरापर्यंत गोविंद्यांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. उत्सव कुठल्याही अप्रिय घटना न होता खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.

सततचा मुसळधार पाऊस शेतीसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. ग्रामीण भागातील लावणी हंगाम पूर्ण झाला असला तरी शेतात पाणी साचल्याने लागवड वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. तानसा नदी दुथडी भरून वाहत असल्याने पूरसदृश्य परिस्थिती उद्भवण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान,शुक्रवार आणि शनिवार या दोन दिवसांतच १३० मिलिमीटर पाऊस कोसळला. रविवारी ही दुपारनंतर पावसाचा जोर होता.२१ ऑगस्ट रोजी पुन्हा मुसळधार पावसाचे आगमन होण्याचा हवामान विभागाने इशारा दिल्याने शेतीला फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# आप्पा गेले, ताई आल्या; पण नायगावातले रस्ते व्हेंटिलेटरवरच

यंदाही गणरायांचे आगमन खड्ड्यातूनच; भाविकांत संताप



प्रतिनिधी
■ वसई

यंदा वसई- विरारमध्ये सत्ता परिवर्तन झाल्यानंतर वसई -विरारकरांना विकासाचा नवा चेहरा प्राप्त होईल अशी भाबडी आशा होती. परंतु आप्पा गेले आणि ताई आल्या असे राजकीय परिवर्तन होऊन देखील नायगाव पूर्व परिसरातील नागरिकांना बिकट रस्त्यांच्या अवस्थेला सामोरे जावे लागत आहे.

वसई- विरारमधील रस्त्यांचे आरोग्य आधीच बिघडलेले असताना नायगाव पूर्व परिसरातील रस्ते मात्र व्हेंटिलेटरवर गेले आहेत. त्यामुळे नायगाव पूर्व परिसरातील गणरायांचे आगमन यंदाही खड्ड्यातूनच होणार असल्याने भाविकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

नायगाव पूर्व परिसरातील एव्हरेस्ट हॉटेल ते स्टार सिटी पर्यंतच्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्याच्या कामाकडे लक्ष देण्यास राजकीय पुढाऱ्यांना तसेच महापालिका प्रशासनाला फुरसत नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.शनिवारी या परिसरात दहीकाला उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. लाखो रुपयांची बक्षिसे दहीकालानिमित्त आयोजित करून राजकीय पुढाऱ्यांनी अनेक गोविंदा पथकांचे लक्ष वेधून घेतले. परंतु, हेच राजकीय पुढारी नायगाव पूर्व परिसरातील व्हेंटिलेटरवर असलेल्या रस्त्यांच्या अवस्थेकडे मात्र लक्ष देत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

याच नायगाव पूर्व परिसरात जुचंद्र येथे रेल्वे उड्डाणपुलाचे काम कासवगतीने सुरू आहे. या उड्डाणपुलाच्या कामाच्या जागेचा मोबदला मिळत नसल्याने काही शेतकऱ्यांनी हरकत घेतली होती. त्यानंतर सदरचे काम रखडले होते. परंतु आता पुलाच्या कामात ठेकेदार निष्काळजीपणा राबवत असल्याने त्याचा त्रास नागरिकांनी सोसावा लागत आहे. यंदा देखील गणरायांचे आगमन येथील खड्यांतूनच होणार असल्याने किमान गणेशोत्सवापूर्वी तरी हा रस्ता पूर्ववत करावा, अशी मागणी येथील नागरिक करीत आहेत.

सत्ता परिवर्तनानंतरही नायगाव पूर्ववासियांना विकासाची दिशा मिळत नसेल तर या सत्ता परिवर्तनाचा उपयोगच काय? अशा तीव्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया नायगाव पूर्व परिसरातील नागरिक देऊ लागले आहेत.

# जूचंद्र जिल्हा परिषद मराठी शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जाचा सन्मान

वसई तालुक्यातील पहिली ISO मानांकनप्राप्त शाळा



■ वसई

नायगाव पूर्व येथील जूचंद्र जिल्हा परिषद मराठी शाळेने वसई तालुक्यात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. शाळेला आंतरराष्ट्रीय मानांकन देणाऱ्या (ISO) संस्थेचे 9001:2015 प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून हे मानांकन मिळविणारी वसई तालुक्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा ठरली आहे. शाळेचे नूतनीकरण करून उभारलेली सुविधासंपन्न व सुसज्ज इमारत, अत्याधुनिक सोयीसुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण व उत्कृष्ट व्यवस्थापन या गुणांच्या आधारे हा सन्मान मिळाल्याची माहिती देण्यात आली. यामुळे जूचंद्र गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या यशाबद्दल शाळा दुरुस्ती अभियान समिती, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक तसेच सर्व देणगीदार, वस्तूदाते आणि ग्रामस्थ यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच ही ऐतिहासिक उपलब्धी शक्य झाल्याचे समितीकडून सांगण्यात आले.

कॉ. गोदावरी परुळेकर यांच्या 118 व्या जयंतीनिमित्त

# कॉ. लहानू कोम यांचा पुतळा अनावरण व संग्रहालय उद्घाटन

प्रतिनिधी
■ तलासरी

गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तलासरी येथे कॉ. गोदावरी शामराव परुळेकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण आणि आदिवासी समाजातील दुर्मिळ वस्तूंच्या संग्रहालयाचे उद्घाटन माकपचे ज्येष्ठ नेते कॉ. एल. बी. धनगर व पॉलिट ब्युरो सदस्य तसेच राष्ट्रीय अध्यक्ष किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे यांच्या हस्ते संपन्न झाले. हा सोहळा दिवंगत कॉ. लहानू कोम यांच्या स्वप्नपूर्तीसारखा ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुतळा अनावरणानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे संचालक डॉ. बी. ए. राजपूत आणि उपप्राचार्य आर. एन. पवार यांनी केले. उपस्थित मान्यवरांमध्ये कॉ. हेमलता कोम, आमदार कॉ. विनोद निकोले, माजी आमदार सुनिल भुसारा, उद्योजक व माजी मुंबई नगरपाल डॉ. मोहनभाई पटेल, कॉ. रुपेश राणे, संचालक कॉ. सुहास सुरती, ॲड. काशिनाथ चौधरी, नगराध्यक्ष कॉ. सुरेश भोये, कॉ. प्राची हातीवलेकर, कॉ. नंदू हडळ, कॉ. विजय खुलात, समाजसेवक हसूभाई ठक्कर, मा. अजितदादा नार्वेकर तसेच आदिवासी प्रगती मंडळाचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभागृहातील कार्यक्रमाची सुरुवात कॉ. गोदावरी परुळेकर आणि कॉ. लहानू कोम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविकात डॉ. बी. ए. राजपूत यांनी कॉ. लहानू कोम यांना श्रद्धांजली अर्पण करत कॉ. गोदावरी परुळेकरांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संदेश दिला.

डॉ. अशोक ढवळे यांनी गोदावरी परुळेकरांनी मागास भागात राहून समाजासाठी दिलेला लढा, अन्यायाविरुद्धची भूमिका आणि लहानू कोम यांच्या स्वप्नपूर्तीचा गौरव केला. कॉ. एल. बी. धनगर यांनी गोदूताईंच्या भूमिगत आंदोलनाचा इतिहास सांगत, “फक्त पुतळ्याचे नव्हे तर त्यांच्या विचारांचेही अनावरण करा,” असा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात कॉ. रुपेश राणे यांनी गोदावरी परुळेकरांच्या संघर्षशील कार्याचा आदर्श देत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले व भविष्यात कॉ. शामराव परुळेकर यांचाही पुतळा उभारण्याचे आश्वासन दिले.

सहा. प्रा. दीपक वाकडे यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार प्रदर्शन सहा. प्रा. सुजाता गावित यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. सांस्कृतिक विभाग, प्राध्यापक वर्ग व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# विकसित भारतात आदिवासींची दुर्दशा, निवाऱ्यासाठी स्वातंत्र्यदिनीच आंदोलन

प्रतिनिधी
■ विक्रमगड



भारताचा 79 वा स्वातंत्र्य दिन देशभरात उत्साहात साजरा होत असताना, विक्रमगड तालुक्यातील एका आदिवासी भगिनीने आपल्या संसारासह पंचायत समितीच्या दारात धडक देत स्वातंत्र्याच्या 79 वर्षांनंतरही ‘निवारा’ या मूलभूत हक्कासाठी झगडावे लागत असल्याची जिवंत हकीकत उघड केली आहे.

विक्रमगड तालुक्यातील वेढे धिंडेपाडा येथील सौ. नयना फेसरडा यांना मागील मे महिन्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत (इंदिरा आवास घरकुल योजना) घर मंजूर झाले. परंतु दुसऱ्या हप्त्याचा निधी वेळेवर न मिळाल्याने घर बांधकाम अपूर्ण राहिले. पावसाळा सुरू झाल्यानंतर नातेवाईकांकडे तात्पुरता आसरा घेतला, पण "किती दिवस दुसऱ्याच्या घरात राहायचे?" असा संताप व्यक्त करत सौ. फेसरडा यांनी अखेर आपला संसार, घरातील सर्व साहित्य, पती आणि मुलासह स्वातंत्र्य दिनी थेट पंचायत समिती विक्रमगड येथे धडक मारली.

या अगोदर त्यांनी जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी वाडा, तहसीलदार विक्रमगड, गटविकास अधिकारी विक्रमगड आणि ग्रामसेवक वेढे यांच्याकडे वारंवार अर्ज व विनंती करून पाठपुरावा केला. मात्र, निवाऱ्याची सोय न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते बळवंत गावित यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी स्वातंत्र्य दिनीच गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात हजेरी लावली.

सकाळी ११ वाजता झालेल्या या प्रकारात गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, पंचायत समितीचे इतर अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक मा. गोळे यांच्या उपस्थितीत चर्चा झाली. अखेर वेढे ग्रामपंचायतीच्या जुन्या कार्यालयात सौ. फेसरडा यांना तात्पुरता निवारा देण्याचा निर्णय घेण्यात आला, जोपर्यंत त्यांचे घरकुल पूर्ण होत नाही.

या वेळी जव्हार तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संपत पवार, युवा कार्यकर्ते नितीन मुकणे, विक्रमगड तालुका आदिवासी काँग्रेस अध्यक्ष साईनाथ रावते, पंढरीनाथ गोवारी, रवींद्र जाधव, विलास बरड, मधुकर धोदडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी कुटुंबाच्या मदतीला धाव घेतली सामाजिक बांधिलकी जपत आधार दिला.

**सौ. नयना फेसरडा यांनी माध्यमांशी बोलताना सरकारवर संताप व्यक्त केला**

"पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की ज्याचं घर कच्च्या पत्र्याचं आहे त्याला घरकुल मिळेल. पण माझ्यासारख्या गरीब आदिवासी महिलेला, ज्याचं घर अर्धवट आहे, त्याला दुसरा हप्ता देऊन घर पूर्ण करायला सरकारकडे वेळ नाही. अधिकारी वर्ग आणि ग्रामविकास विभाग जाणूनबुजून वंचित ठेवत आहेत. स्वातंत्र्याच्या 79 वर्षांनंतरही आम्हाला जगण्यासाठी लढावे लागत आहे. हा कशाचा स्वातंत्र्यदिन?" स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा गाजावाजा करताना एकीकडे देश विकसित होत असल्याचा दावा केला जातो; पण दुसरीकडे देशाचे खरे मालक असलेल्या आदिवासी बांधवांना आजही मूलभूत हक्कांसाठी दारोदारी भटकावे लागत असल्याची ही घटना सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीवर मोठा प्रश्नचिन्ह उभा करते.

# आपण आयुष्यभर विद्यार्थी म्हणून जगलो पाहिजेत, शिक्षणाने माणूस समृद्ध होतो - डॉ.निलेश राऊत

प्रतिनिधी
■ पालघर

प्रत्येकाने आयुष्यभर आपण विद्यार्थी म्हणून जगलो पाहिजेत.. नव नवीन विषय आत्मसात करीत नवीन वाटा निर्माण केल्या पाहिजेत. शिक्षणाने माणसाचे आयुष्य समृद्ध होतो..असे प्रतिपादन तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते डॉ.निलेश राऊत यांनी व्यक्त केले.

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने दातिवरे इंग्लिश हायस्कूल शाळेत विशेष अतिथी म्हणून त्यांना आमंत्रित करण्यात आले होते.मागील आठवड्यात ॲड.निलेश राऊत यांना सामाजिक कार्य साठी मानद डॉक्टर पदवी देऊन दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले होते.त्याबद्दल शिक्षण



संस्थेने सन्मान देत यावर्षी ध्वजारोहण ॲड.निलेश राऊत यांच्या हस्ते करण्याच बहुमान दिले.तसेच शिक्षण संस्थेचा सहसचिव म्हणून तसेच माजी विद्यार्थी म्हणून त्यांचे सपत्नीक हृदय सत्कार करण्यात आला.तसेच शाळेचे माजी मुख्याध्यापक राठोड सर यांनी शाळेस रोख पंचवीस हजार रुपये देणगी दिली.त्या देणगी फलकाचे सुद्धा अनावरण करण्यात आले.यावेळी संस्था,शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी यांच्या वतीने शाल, गुच्छ, श्रीफळ देऊन मला सपत्नीक सन्मानित करण्यात आले.

समारंभाला संस्थेचे अध्यक्ष मा.जगन्नाथ वर्तक,दातिवरे सरपंच जितेंद्र राऊत,संस्थेचे उपाध्यक्ष व माजी सरपंच दातिवरे मा.भारत राऊत, मा.लक्षण भोईर,माजी मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.राठोड सर,मुख्याध्यापक मा. वसावे सर, हेमंत ठाकूर ,मच्छीमार सोसायटीचे सचिव मा.अनंत वैद्य,ग्राम पंचायतचे सदस्य विजय वैद्य,त्यांच्या सौ.वैद्य,माजी सदस्य गौतम वर्तक,माजी पोलिस पाटील बंधू राकेश राऊत आणि शिक्षक वर्ग,शिक्षकेतर कर्मचारी,पालक वर्ग,विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त तलासरीत नागरी संरक्षण दलाचे आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिक

प्रतिनिधी
■ तलासरी

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून देशातील चौथे सुरक्षा दल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागरी संरक्षण दल, जिल्हा पालघर यांच्यातर्फे मौजे तलासरी येथे आपत्ती व्यवस्थापनाचे थरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.नागरी संरक्षण दलाचे जिल्हा प्रमुख के. आर. कुरकुटे (उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल, जिल्हा पालघर) यांच्या आदेशानुसार हे प्रात्यक्षिक रोहित जाधव (विभागीय क्षेत्ररक्षक, तालुका तलासरी) यांच्या कुशल नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे संपूर्ण कार्यक्रम अनुशासित आणि प्रभावीपणे सादर झाला.

या प्रात्यक्षिकात युद्धकाळ अथवा नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवक, प्रथमोपचार पथक व विमोचन पथक कसे कार्य करतात याचे नाट्यमय सादरीकरण करण्यात आले. आग विझवणे, जखमींना बँडेज बांधणे, रक्तस्राव थांबवणे, हाडमोड झालेल्यांना झोळ्या बांधणे तसेच विविध मानवी उचल पद्धतींचा वापर करून जखमींना सुरक्षितपणे दवाखान्यात पोहोचवणे यांसारख्या महत्त्वपूर्ण तंत्रांचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखवण्यात आले.

कार्यक्रमात मास्टर ट्रेनर अनिल हडळ आणि संगीता हडळ यांचे विशेष योगदान लाभले. सूत्रसंचालन नरेश म्हस्के (विभागीय क्षेत्ररक्षक, बोईसर विधानसभा) यांनी करून उपस्थित जनसमुदायाला नागरी संरक्षण दलात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच मास्टर ट्रेनर सुषमा जाधव, प्रिया पाटील, वैशाली राऊत व माजी मानसेवी अधिकारी देविदास भोये यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.

या प्रात्यक्षिकासाठी डॉ. महाविद्यालय, गोदावरी परुळेकर येथील सुमारे ४८ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान राजपूत, प्राध्यापक सचिन राऊत व प्रा. दिपाली गहला यांनी विशेष सहकार्य करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.तलासरी तालुक्यातील पंचक्रोशीत या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत असून, नागरी संरक्षण दलाचे कार्य अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# रानशेत महालक्ष्मी गडावर दरड कोसळली

सात दुकानांचे नुकसान; भाविकांना गडावर जाणे टाळण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ डहाणू

डहाणू तालुक्यातील प्रसिद्ध महालक्ष्मी गडावर शनिवारी मध्यरात्री मुसळधार पावसामुळे मोठी दरड कोसळून सात दुकानांचे मोठे नुकसान झाले. यापैकी तीन दुकाने थेट दरीत कोसळल्याने पूर्णपणे उद्ध्वस्त झाली, तर चार दुकानांना अंशतः हानी पोहोचली आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांमध्ये काशिनाथ घोषे ₹२४,५००, वालू घोषे ₹२२,०००, विनोद घोषे ₹७,००० नरेश घोषे ₹२,००० व अमृत सालकर ₹२,७०० यांचा समावेश असून, तलाठी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करण्यात आला आहे. दरड कोसळल्यामुळे महालक्ष्मी मंदिर परिसरातील अरुंद रस्त्यालाही मोठा फटका बसला आहे.

पावसामुळे भाविकांची वर्दळ कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली. परंतु या भागात यापूर्वीही अशा घटना घडल्या असून २०२२ साली देखील दरड कोसळून अनेक दुकाने उद्ध्वस्त झाली होती. दरवर्षी हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी महालक्ष्मी गडावर गर्दी करतात. विशेषतः पावसाळ्यात व सणासुदीच्या काळात भाविकांची मोठी उपस्थिती असल्याने भविष्यात गंभीर दुर्घटना होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे गडाच्या सुळक्यावर संरक्षण जाळी बसवण्याची मागणी स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर डहाणू पोलीस ठाण्याचे निरीक्षक किरण पवार यांनी आवाहन



केले की,“भाविकांनी सध्या महालक्ष्मी मंदिर गडावर जाणे टाळावे. दरड कोसळल्याने रस्ता अत्यंत अरुंद झाला आहे. पाऊस ओसरल्यानंतर आवश्यक ती सुरक्षा उपाययोजना करण्यात येतील. आज सुट्टीचा दिवस असूनही सर्कल देविदास चौरे यांनी तातडीने तलाठी संचिन तुंबळा यांना घटनास्थळी पाठवून पंचनामा करून घेतला. ग्रामस्थांनी त्यांच्या तत्पर कार्याचे कौतुक केले आहे.”

दरम्यान, नुकसानग्रस्त दुकानदार विनोद घोषे रानशेत वांगडपाडा यांनी दुःख व्यक्त करताना सांगितले की, “दरड रात्री कोसळल्यामुळे माझे व इतर भाविकांचे प्राण वाचले.

**CHANGE OF NAME**

**Lila verma** is legally wedded spouse of No.13842429, Rank- Sep, Name- Daya Ram, residing at 601, Plot no 119, Bholenath residency, Collector Colony, Near Shankar Temple, Chembur, Mumbai -400074, have changed my name from Lila verma to Leela Dayaram Soni and date of birth from 19 yrs to 15/09/1957 due to erroneously endorsed. vide affidavit **No.58AB 521498 dated 11-08-2025**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 58
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे**, E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ५८
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## चेंबूरमध्ये आरपीआयच्या दहीहंडी उत्सवात मराठमोळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई :** चेंबूर पांजरापोळ येथे छत्रपती शिवाजी महाराज मुंबईच्या प्रवेशद्वारावर गेली १९ वर्षांपासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) सलग्न कलाकुंज मित्र मंडळाच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष संजय डोळसे यांच्या नेतृत्वाखाली भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येत असते त्याप्रमाणे यंदा ही आरपीआय (आठवले) सलग्न कलाकुंज मित्र मंडळातर्फे दहीहंडी उत्सव २०२५ चे शानदार आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित गोविंदा रसिकांसाठी मराठमोळा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, शिवसेना आमदार तुकाराम काते, आरपीआयचे महाराष्ट्र महासचिव गौतम सोनावणे, मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे,आदी उपस्थित होते. या दहीहंडी उत्सवात आरपीआयच्या कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने स्थानिक रसिक उपस्थित होते.यावेळी प्रतिक्रिया देताना आयोजक संजय डोळसे म्हणाले कि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांच्या संकल्पनेतून सर्वधर्म समभाव ह्या दृष्टीकोनातून आम्ही गेल्या १९ वर्षांपासून मुंबईच्या प्रवेशद्वारावर दहीहंडी उत्सव आयोजित करत असतो. आमच्या मंडळाच्या माध्यमातून ऍम्ब्युलन्स ची व्यवस्था करण्यात आली असून मराठमोळी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.



# कबुतरांना नियंत्रित पद्धतीने खाद्य पुरविण्याची तयारी

### मुंबई महानगरपालिकेने मागवल्या नागरिकांकडून हरकती आणि सूचना

प्रतिनिधी
■ मुंबई



कबुतरखान्यांच्या ठिकाणी कबुतरांना नियंत्रित पद्धतीने खाद्य पुरवण्याबाबत मुंबई महापालिका विचार करीत आहे. याबाबत आलेल्या तीन अर्जांवर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई महापालिकेने नागरिकांकडून हरकती व सूचना मागवल्या आहेत.

दादरमधील कबुतरखाना बंद करण्यावरून सध्या मोठा वाद सुरू असून हा वाद न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. या विषयावरून राजकीय वातावरणही चांगलेच तापले आहे. तसेच जैन समाजात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. अखेर पर्यायी व्यवस्था होत नाही तोपर्यंत नियंत्रित पद्धतीने खाद्य देण्यात यावे व कबुतरखाना बंद करू नये असे आदेश राज्य सरकारने ७ ऑगस्टला दिले होते.

मुंबई महापालिकेने कबुतरांना खाद्य घालण्यास मनाई केल्यानंतर काही पक्षीप्रेमींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर १३ ऑगस्टला झालेल्या सुनावणीच्यावेळी कबुतरांना खाद्य घालण्यावरील बंदीचा मुंबई महापालिकेचा निर्णय उच्च न्यायालयाने कायम ठेवला. मात्र दादर येथील कबुतरखान्याजवळ कबुतरांना दररोज सकाळी सहा ते आठ या कालावधीत खाद्य देण्याच्या मागणीवर विचार सुरू असल्याची माहिती महापालिकेने उच्च न्यायालयात दिली. त्यावेळी महापालिकेने कोणतीही परवानगी देण्यापूर्वी आधी त्याबाबत जाहीर सूचना काढावी आणि प्रस्तावावर हरकती-सूचना मागवाव्यात. त्यानंतर, कबुतरांना सकाळी दोन तास खाद्य देण्याचा निर्णय घ्यावा असे आदेश दिले होते. त्यानुसार मुंबई महापालिकेने आता कबुतरांना नियंत्रित पद्धतीने खाद्य घालण्याबाबत नागरिकांकडून हरकती व सूचना मागवल्या आहेत.

हरकती व सूचनांसाठी केवळ दहा दिवस नागरिकांनी सोमवार १८ ऑगस्ट ते शुक्रवार २९ ऑगस्ट दरम्यान हरकती / सूचना नोंदवाव्यात असे आवाहन मुंबई महापालिका प्रशासनाने केले आहे. केवळ दहा दिवसांचा अवधी असून मुंबईत सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. मुंबईतील कबुतरखान्यांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला दादर कबुतरखाना ट्रस्ट बोर्ड, यास्मिन भन्साळी अँड कंपनी आणि श्रीमती पल्लवी पाटील, ऍनिमल अँड बर्डस् राईटस् ऍक्टिविस्ट यांच्याकडून अर्ज प्राप्त झाले आहेत. हे तिनही अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous?guest_user-english या लिंकवर अवलोकनासाठी उपलब्ध आहेत.

**येथे हरकती व सूचना पाठवाव्या**

नागरिकांनी संकेतस्थळावर दिलेल्या या अर्जांचे अवलोकन करुन कबुतरखान्यांच्या ठिकाणी नियंत्रित पद्धतीने व ठराविक वेळेतच कबुतरांना खाद्य पुरवावे (Control Feeding) किंवा कसे, तसेच यातील अन्य मुद्द्यांबाबत त्यांच्या हरकती / सूचना suggestions@mcgm.gov.in या ईमेल आयडीवर सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ ते शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीदरम्यान पाठवाव्यात, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. तसेच, हरकती / सूचना लेखी स्वरुपात प्रत्यक्ष सादर करावयाच्या असतील तर त्या 'कार्यकारी आरोग्य अधिकारी, तिसरा मजला, एफ दक्षिण विभाग कार्यालय इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई-४०० ०१२' येथे सोमवार १८ ऑगस्ट ते शुक्रवार २९ ऑगस्ट या कालावधीदरम्यान कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सादर करावयात असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे.

# चिंचपोकळीच्या चिंतामणीचं शाही थाटात वाजत गाजत आगमन

### बाप्पाचे देखणं रुप अन् राजेशाही थाट पाहून भाविकांचे डोळे सुखावले

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबईसह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आज गणेशोत्सव मंडळातील बाप्पांचे आगमन होत आहे. मुंबईत आज चिंचपोकळीच्या बाप्पाचे आगमन झाले आहे. बाप्पाच्या आगमनासाठी पाऊसही सकाळपासून बरसत होता. सोसाट्याचा वारा अन् मुसळधार पाऊस अशा परिस्थितीत चिंतामणीच्या बाप्पाच आगमन झालं. ढोल-ताशांच्या गजरात लाडक्या बाप्पाचा आगमन सोहळा पार पडला.

बाप्पाचे भाविक ज्या दिवसाची वाट पाहत होते तो दिवस आला. चिंचपोकळीच्या चिंतामणीचे आगमन आज झाले आहे. चिंचपोकळीच्या चिंतामणीचं मोहक रुप पाहून भाविकांनी अक्षरश: हात जोडून बाप्पाला नमन केलं. बाप्पाची ही पहिली झलक पाहण्यासाठी भाविकांनी तुफान पावसातही मोठी गर्दी केली होती.चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाचे यंदा १०६ वे वर्ष आहे. १९२० साली या गणपती मंडळाची स्थापना झाली. आगमनाधीश बाप्पा म्हणून या मंडळाची ख्याती आहे.२२ फुटाची ही मूर्ती पाहण्यासाठी मुंबईच्या रस्त्यावर हजारोंच्या संख्येने भाविकांची गर्दी केली होती.चिंचपोकळीचा चिंतामणीचे यंदाचे वैशिष्ट्ये म्हणजे हा बाप्पा छत्रपती संभाजी महाराज यांच्या रुपात साकारला आहे. यात त्याचा शाही थाट दिसत आहे. चिंचपोकळीचा चिंतामणीच्या आगमनावेळी त्याला लाल रंगाचे पितांबर , त्याच रंगाचा शेला परिधान केल्याचे दिसत आहे. त्यासोबच शाही सिंहासनही बाप्पाच्या रुपाला शोभून दिसत आहे.

# मुंबईत दहीहंडी फोडताना 210 गोविंदा जखमी

प्रतिनिधी
■ मुंबई

शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडलेल्या गोपाळकाला उत्सवात दहीहंडी फोडताना मुंबईत एकूण २१० गोविंदा जखमी झाल्याची माहिती रात्री उशिरा १२.३० वा. उपलब्ध झाली. या पैकी 68 गोविंदांना विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले तर १४२ जखमी गोविंदाना उपचारानंतर घरी पाठवण्यात आले.

शहर भागात ९१ गोविंदा जखमी झाले.६० जखमींना दाखल करण्यात आले तर ३१ जखमी गोविंदांवर उपचार करून त्यांना घरी पाठवण्यात आले. पूर्व उपनगरात ४५ गोविंदा जखमी झाले होते.त्यापैकी ५ गोवंदाना दाखल करून घेण्यात आले तर ४० जखमी गोविंदांवर उपचार करून त्यांना घरी पाठवण्यात आले. तर पश्चिम उपनगरात ७४ गोविंदा जखमी झाले होते. पैकी ४ गोविंदाना दाखल करून घेण्यात आले व ७० गोविंदांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय सद्भावना सायकलिस्ट रत्नाकर शेजवळ यांचा मुंबईत सत्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

नाशिक रेल्वे डाक सेवेचे सायकल खेळाडू व आतंरराष्ट्रीय स्तरावर शातीं सद्भावना व मैत्रीचा संदेश देणारे सद्भावना सायकलस्वार रत्नाकर शेजवळ यांचा शनिवारी संत सावता माळी सभागृह ,भायखळा येथे पार पडलेल्या नॅशनल कर्मचारी पतसंस्थेच्या चौदाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शाल, पुष्पगुच्छ ,स्मृतिचिन्ह देवुन सत्कार करण्यात आला .

याप्रसंगी पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष लाड, रत्नाकर अभंग ,संतोष कवटकर, .रामभजन गुप्ता, गुरुनाथ चौघुले, सुभदा घाग मा.महादेव गोपाळघरे तसेच डाक विभागाचे कर्मचारी बंधु भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



रत्नाकर शेजवळ यानीं नुकताच केन्या देशात शातीं सद्भावनेचा संदेश दिला तिकडून मुबंईत दाखल होताच. रोहीत सुर्वे व सुनिल सावंत यांनी रत्नाकर शेजवळ यांच्या खेळ व सामाजिक कार्याची दखल घेत हा सत्कार केला.



**मुंबई :** साईनगर ज्येष्ठ नागरिक संघटनेतर्फे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संदीप सिताराम दळवी यांच्या सवाई संस्थेच्या वतीने साई वाडी विभागातील ज्येष्ठ नागरिकांच्या नातवंडांना इयत्ता दुसरी ते सातवीपर्यंत २०० मुलांना मोफत वह्या व कलर पेटी वाटप अध्यक्ष दीपक भाऊ सावंत सरचिटणीस वासुदेव वसंत दळवी उपाध्यक्ष श्रद्धांनंद मनोहर जाधव, खजिनदार गिरीश शेलार, शशिकांत लाखन, अनुराधा मोहिते, वासुदेव पाष्टे, विश्वनाथ पाटणकर, विलास कदम यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले

# आज बेस्ट पतपेढीच्या पंचवार्षिक निवडणूकीसाठी मतदान

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एक अंग असलेल्या , दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड ची पंचवार्षिक निवडणूक आज होत आहे. या निवडणुकीत पतपेढी चे १५ हजार कामगार आपापल्या बस आगारात मतदान करणार आहेत.एकूण ३५ ठिकाणी मतदानाची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. व मंगळवार, १९/०८/२०२५ रोजी सकाळी ८.०० वाजेपासून मतमोजणी स. गेट नं.०४, हनुमान गेट, प्रवर्तक कार्यालयाच्या पाठीमागे उत्तर दिशेला, वडाळा आगार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विदयालयासमोर, मुंबई-४०००३१ येथे सुरू होणार आहे.

**या निवडणुकीत एकूण ५ पॅनल आहेत**

१) BJP गणेश हाके व नागे २ ) बेस्ट वर्कस युनियन ( शंशाक राव ) ३) प्रविण दरेकर - प्रसाद लाड - नारायण राणे - STNT - बुहुजन समाज असे ५ जणांचे एक पॅनल ४ ) विठ्ठलराव गायकवाडांचे एक पॅनल५) उत्कर्ष पॅनेल सेना ( उद्धव ठाकरे व राज ठाकरे ) असे पाच पॅनल असून एकूण १५ हजार बेस्ट कर्मचारी सभासद मतदान करणार आहेत. या पतपेढीचा टर्नआऊट एकूण सुमारे एकूण ६०० कोटीचा आहे.

मतदारांनी मतदार यादीतील अनुक्रमांकानुसार त्या त्या मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावयाचा आहे. संबंधीत मतदारांनी त्यांच्या यादीतील अनुक्रमांक व त्यांनी कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करावयाचे आहे, याचा तपशिल तसेच प्रत्येक मतदान केंद्राचा तपशिल संस्थेचे मुख्यालय व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहे. तसेच मतदारांनी मतदान केंद्रावर मतदान करतेवेळी शासनाने नेमून दिलेले ओळखपत्र ग्राहय धरण्यात येईल. असे निवडणूक निर्णय अधिकारी नितिन काळे यांनी कळविले आहे



**मुंबई : परिवर्तन इंडिया फाउंडेशनचे अध्यक्ष, समाजसेवक संतोष पांडे यांचा जांभोरी मैदान, वरळी येथे दहीहंडी महोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. या दहीहंडी महोत्सवात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी उपस्थित राहून ही मानाची दहीहंडी फोडली.**

# शिव आरोग्य सेनेच्या टीमकडून केईएममधील जखमी गोविंदाची विचारपूस

प्रतिनिधी
■ मुंबई

केईएम रुग्णालय परळ येथे कालच्या दहीहंडी वेळी मानवी मनोरे रचताना जखमी झालेले एकूण ४७ पेशंट उपचारासाठी आणले गेले होते. त्यापैकी १८ गोविंदाना दाखल करण्यात आले होते. पैकी ११ गोविंदाना काल सकाळी घरी पाठवण्यात आले. ७ गोविंदा पैकी दोन गोविंदा सिद्धेश पाटील व यश पन्हाळे यांनी एच्छीक डिस्चार्ज घेतला उरलेल्या कु.स्वप्नील पवार वय १९ वर्षे वॉर्ड नं.७,श्री.श्रावण उतेकर वय २६ वर्ष वॉर्ड नं.७,अक्षय गुरव वय २१ वर्ष वॉर्ड नं.७,कू.तनिष्का जाधव वय १६ वर्षे नवीन बिल्डिंग,. अक्षय मासळे वय २१ वर्षे हे दाखल आहेत.

शिव आरोग्य सेनेच्या टीमने केईएम नवीन बिल्डिंग येथे या जखमीची भेट घेऊन त्यांच्या तब्बेतीची



विचारपूस केली व सीनियर एम.ओ. डॉ.प्रवीण बांगर यांना भेटून पूर्ण उपचाराची माहिती घेतली. त्याप्रसंगी आरोग्य सेनेच्या मुंबई जिल्हा सचिव ज्योतीताई भोसले, मा.नगरसेविका उर्मिला पांचाळ,आरोग्य सेनेचे मुंबई सह समन्वय प्रकाश वाणी, दादर माहीम विधा. समन्वयक अमोल बोरकर, शिवडी विधा.सहसमन्वयक अनंत कोटकर,शिवडी विधा.आरोग्य संघटक नंदकुमार बागवे,भायखळा विधानसभा आरोग्य संघटक राजाराम झगडे, भायखळा विधान सभा .आरोग्य संघटिका अक्षया चव्हाण, प्रभाग क्र.२१० समन्वयक संदेश कोटेकर, प्रभाग क्र.२१२ आरोग्य संघटिका गुलाब ठाकूर व इतर पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

# शनिवारी संध्याकाळी तुळशी तलाव भरुन ओसंडून वाहू लागला

### सर्व ७ तलावांमध्ये ९०.१६ टक्के जलसाठा जमा



प्रतिनिधी
■ मुंबई

महानगरपालिका क्षेत्रातील तुळशी तलाव १६ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६.४५ वाजता ओसंडून वाहू लागला , अशी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता खात्याद्वारे देण्यात आली.

तुळशी तलावाची कमाल पाणी साठवण क्षमता ८०४.६० कोटी लीटर (८,०४६ दशलक्ष लीटर) इतकी आहे. हा तलाव संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्यात स्थित असून महानगरपालिकेच्या भांडूप जलशुद्धीकरण संकुलापासून जवळच्या परिसरात आहे.

८०४ कोटी लीटर इतकी कमाल उपयुक्त जलधारण क्षमता असणारा हा तलाव गत वर्षी (२०२४) २० जुलै रोजी भरुन वाहू लागला होता. या पूर्वी जुलै महिन्यात तानसा २३ जुलै रोजी व मोडकसागर ९ जुलै रोजी तलाव भरून वाहू लागले आहेत.

दरम्यान, मुंबईला पाणीपुरवठा करणा-या ७ धरणांची मिळून एकूण कमाल पाणी साठवण क्षमता ही सुमारे १,४४,७३६.३ कोटी लीटर (१४,४७,३६३ दशलक्ष लीटर) इतकी आहे. शनिवारी पहाटे ६.०० वाजता करण्यात आलेल्या मोजणीनुसार सर्व सातही तलावांमध्ये मिळून १,३०,४९८.१ कोटी लीटर (१३,०४,९८१ दशलक्ष लीटर) इतका म्हणजेच ९०.१६ टक्के एवढा पाणीसाठा जमा झाला आहे.

# निवडणुकीत विजयी झाल्यानंतर, आम्ही कर्मचाऱ्यांची विशेष काळजी घेऊ - स्वराज्य पॅनल

प्रतिनिधी
■ मुंबई

स्वराज्य पॅनलच्या उमेदवारांमार्फत दादर पश्चिम महानगरपालिका जी उत्तर विभागाबाहेर दि. म्युन्सिपल को ऑपरेटिव्ह सहकारी बँक लिमिटेडच्या मुंबईतील निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी माध्यमांशी बोलताना, स्वराज्य पॅनलच्या उमेदवारांनी कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवडणूक चिन्हाच्या टेबलावर शिक्का मारून स्वराज्य पॅनलला मोठ्या फरकाने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी, पैशाच्या बळावर निवडणूक जिंकण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांना त्यांनी जोरदार विरोध केला आहे. माध्यमांशी बोलताना स्वराज्य पॅनलच्या उमेदवारांनी सांगितले की, निवडणूक हरताना पाहून विरोधक पैशाने मते खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु मतदार सुज्ञ आणि जागरूक आहेत.



स्वराज्य पॅनलच्या उमेदवारांनी सांगितले की, २१ तारखेच्या संध्याकाळी निर्णयानंतर, द म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड मुंबईमधील स्थानिक लोक आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यांकडे विशेष लक्ष दिले जाईल. बँकेतील कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. या निवडणुकीत प्रत्येक पॅनलचे १९ उमेदवार रिंगणात आहेत. प्रत्येक समिती आणि पदासाठी प्रत्येक पॅनलचे १९ उमेदवार रिंगणात आहेत, त्यामुळे प्रत्येक मतदाराला १९ मते देण्याचा अधिकार आहे. २२ ऑगस्ट रोजी निकाल दिला जाईल. यावेळी स्वराज्य पॅनलचे उमेदवार अश्विन प्रकाश बायेस, दिगंबर लक्ष्मण सुवर्णाकर, विकास श्रीनिवास रेवस्कर, पूजा गुलाबराव घनमोडे, अॅड दिगंबर रमेशराव कवळे, नित्यानंद यशवंत करंजेकर, आनंदा भैरू बरकाले, सचिन गंगा राम महाडिक, अमोल भिका येवला, प्रमोद वसंत झिरमुटे यांच्यासह पॅनलचे सर्व उमेदवार या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी खूप उत्साहित दिसत आहेत.

# टी विभागात 18 तास पाणी पुरवठा बंद

■ मुंबई

गोरेगाव - मुलुंड जोड रस्त्यावरील (GMLR) पुलाच्या कामामुळे बाधित होणारी १२०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी वळविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे त्यामुळे गुरूवार, २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून ते शुक्रवार, २२ ऑगसट २०२५ रोजी पहाटे ४ वाजेपर्यंत एकूण १८ तास 'टी' विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा १८ तास पूर्णपणे बंद राहणार आहे. 'टी' विभागातील नागरिकांनी पुढील ४ ते ५ दिवस पाणी उकळून व गाळून प्यावे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आवाहन करण्यात आले आहे.

**या विभागात होणार पाणीपुरवठा खंडित**

गोरेगाव - मुलुंड जोड रस्त्यालगतचा परिसर मुलुंड (पश्चिम), लाल बहादूर शास्त्री मार्ग (एल. बी. एस. रोड) लगतचा परिसर मुलुंड (पश्चिम), जवाहरलाल नेहरु मार्ग (जे. एन. रोड), देवीदयाल मार्ग, क्षेपणभूमी (डम्पिंग ग्राऊंड रोड), डॉ. आर. पी. मार्ग, पी. के. मार्ग, झवेर मार्ग, महात्मा गांधी मार्ग (एम. जी. रोड), एन. एस. मार्ग, एस. एन. मार्ग, आर. एच. बी. मार्ग, वालजी लाढा मार्ग, व्ही. पी. मार्ग, मदन मोहन मालवीय मार्ग, एसीसी मार्ग, बी. आर. मार्ग, गोशाळा मार्ग, एस. एल. मार्ग, नाहुर गाव, इत्यादी. (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळः २४ तास) (पाणीपुरवठा बंद राहणार) संबंधित विभागातील नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पाण्याचा आवश्यक साठा करुन ठेवावा. पाणीपुरवठा बंदच्या कालावधीत काटकसरीने पाणी वापरुन सहकार्य करावे, तसेच नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पुढील ४ ते ५ दिवस पाणी उकळून - गाळून प्यावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार दिलीप लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पुरस्कृत दहीहंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेना चांदिवली विधानसभा पुरस्कृत बाल विकास मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आमदार दिलीप लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी उपनगरातील सर्वात मोठा दहीहंडी उत्सव 2025 चे आयोजन करण्यात आले होते. बाल विकास मित्र मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे याहीवर्षी दहीहंडीचे औचित्य साधून मंडळातर्फे कुर्ला पश्चिम काजूपाडा, गणेश मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवात ९.९९.९९९ रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले होते. या उत्सवात मुंबई उपनगरासह चांदिवली विधानसभा क्षेत्रातील गोविंदा पथकांनी 4, 5, 6



आणि 7 थरांची सलामी देऊन पुरस्कार प्राप्त केले. यावेळी आमदार दिलीप लांडे म्हणाले कि हिंदूंचा हा धार्मिक सण मोठ्या भक्तीभावातून सर्वत्र साजरा केला जात असून गोविंदा पथक एक एक थर लावून एकमेकांवर विश्वास ठेऊन उंच उंच थर लावतात हा एकीचा आणि सांघिक खेळ आज जगभरत प्रसिद्ध होत आहे देश विदेशातून पर्यटक मुंबईच्या उत्सवात समिती होतात. आपले सरकार आज सर्व प्रकारच्या खेळाना प्रोत्साहित करत सहकार्य करीत आहे. या उत्सवतील कार्यक्रमात युवासेनेचे महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य प्रयाग दिलीप लांडे यांनी सूत्रसंचालन केले आणि बाल विकास मित्र मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी हा उत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

शहाण्या लोकांकडे काहीतरी बोलण्यासारखं असतं म्हणून ते बोलतात आणि मुर्ख लोकांना काहीतरी बोलायचं असतं म्हणून ते बोलतात.



- प्लॅटो
ग्रीक तत्त्वज्ञ

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, १८ ऑगस्ट २०२५

# देशात ई - क्रांति होणार!

**देशातील** एकूण मोटारींच्या विक्रीत इलेक्ट्रिक मोटारींचे प्रमाण २०२७-२८ पर्यंत सात टक्क्यांच्या पुढे जाण्याचा अंदाज एका ताज्या अहवालात वर्तविण्यात आला असल्याने या वाहनांना लोकाचा कसा प्रतिसाद मिळणार हा महत्त्वाचा मुद्दा कायम आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी ई वाहने वापर करण्याची मोहीम गेल्या काही काळात सुरू असली तरी अजूनही त्याला फारसा आणि अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही ही वास्तवता नाकारून चालणार नाही. काही दशकांपूर्वी केवळ एक संकल्पना वाटणाऱ्या इलेक्ट्रिक गाड्या आता बऱ्यापैकी सर्वसामान्य झाल्या आहेत. सध्याच्या काळात इलेक्ट्रिफाइड वाहतूकीकडे वाटचाल ही जास्तीत जास्त अपरिहार्य होत चालली आहे. इलेक्ट्रिक वाहनं ही खूप उत्तम निवड आहे. विशेषतः आपण ज्या वातावरणात राहतो त्यासाठी आणि सभोवतालच्या लोकांसाठी ती महत्त्वाची ठरते. येणाऱ्या काळात वाहतूक हे एक मोठे शाश्वत आव्हान आहे. त्यामुळे निर्माते आणि आपल्यासारखे लोक इलेक्ट्रिक फ्लीट वाहनांकडे वळण घेत मोठी भूमिका बजावू शकतात. सरकारने ई-वाहनांसाठी काही परदेशी कंपन्यांना आवतण दिले असले तरी त्यासाठी वेगवेगळी नियमावली सुद्धा ठेवली आहे ही बाब विसरून चालणार नाही. सन २००० नंतरचा काळ हा भारतात मोबाइल क्रांती घेऊन आला. टाटा, रिलायन्स, नोकिया आदी कंपन्यांनी आपली पाळेमुळे रोवत भारतात मोठी मोबाइल बाजारपेठ उभी भारतात मोठी मोबाइल बाजारपेठ उभी राहिली. कालांतराने या क्षेत्रात स्पर्धात्मक गुंतवणूक वाढत गेली. पूर्वी घरात एकच मोबाइल फोन असे. पण, काळ बदलत गेला, तसा प्रत्येकाकडे वेगळा स्मार्टफोन. कालांतराने एक व्यक्ती आणि दोन मोबाइल फोन अशी सवय काहीजणांना लागली. वाहन क्षेत्रातही तीच स्थिती. पूर्वी घरात सर्वांकडे मिळून एक मोटार किंवा दुचाकी असा पर्याय होता. आता त्यातही घरटी दोन किंवा तीन वाहने असे चित्र दिसू लागले. हा बदल झाला तो झपाट्याने वाढ होणाऱ्या वाहन उद्योगामुळे. स्पर्धा वाढत गेली. ग्राहकांना पर्याय मिळू लागले आणि बाजारपेठेची कक्षा शहरांकडून खेड्यापर्यंत विस्तारत गेली. आता हा वाहन उद्योग नव्याने कात टाकू पाहत आहे. पारंपरिक इंधनाकडून अपारंपरिक उर्जा स्रोतांकडे झुकत चाललेला कल आणि त्यादृष्टीने सरकारतर्फे दिले जाणारे प्रोत्साहन पाहता, नवा विक्रमी उच्चांक गाठण्याची तयारी ई-वाहन उद्योग करताना दिसतात. आजवर प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने जगभर वाहन उत्पादक नवनवीन साधने, उपसाधने आपल्या प्रचलित इंजिन्सना जोडून पर्यावरणस्नेही वाहने बनवत होते. काही आघाडीचे उत्पादक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपली वाहने कमी प्रदूषण करतात असे आभासी चित्र उभे करून अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात मोठी फसवणूक केल्याने शिक्षेस पात्र ठरले आहेत. आजवर प्रचलित असलेले अंतर्गत ज्वलन पद्धतीचे इंजिन आणि वेगवेगळया प्रकारचे गिअर बॉक्स या साऱ्याला छेद देणारी अशी यंत्रणा इलेक्ट्रिक कारमध्ये असणार आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, दिवसागणिक रस्त्यावर वाढणारी वाहनांची संख्या अन् त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाची समस्या हे एक मोठे दुष्टचक्र आहे. ते नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या वाढवणारे ठरले आहे. वाहन निर्मित प्रदूषण कमी करणाच्या दृष्टीने वाहन निर्मात्यांवर सरकारने योग्य ते र्निबध घातले असून ते प्रसंगी कठोरही केले आहेत. उत्पादकांनीसुद्धा भविष्याची पावले ओळखून त्याला प्रतिसाद देत कमी प्रदूषण करणारी अशी यंत्रणा विकसित करून प्रदूषण कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी जगभरात इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब करण्याची लाट आल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे जगभरातील जवळपास सर्वच वाहन उत्पादक कंपन्यांनी आपला मोर्चा इलेक्ट्रिक वाहनांकडे वळवला आहे. ग्राहकही इलेक्ट्रिक वाहनं खरेदी करू लागले आहेत. भारतात सध्या इलेक्ट्रिक वाहनांसाठीचं पुरेसं चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर नसल्याने भारतात अजून ई-वाहनांना पुरेसा प्रतिसाद मिळालेला नसला तरी इलेक्ट्रिक वाहनांच्या मागणीत वाढ झाली असल्याचे चित्र दिसते. भारताकडे जगभरात इलेक्ट्रिक वाहनांच्या बाजाराचे नेतृत्व करण्याची क्षमता असल्याचे मत अमेरिकेतील एका संशोधनात नुकतेच व्यक्त करण्यात आले आहे. हे संशोधन अमेरिकेतल्या लॉस अँजेलिस शहरातील कॅलिफोर्निया विद्यापीठ आणि बर्फेले लॅबने केला आहे. त्यामुळे भारत सरकारचा इलेक्ट्रिक वाहनांवरील फोकस वाढला. भारतात डिझेलवर चालणाऱ्या ट्रकऐवजी इलेक्ट्रिक ट्रक आले, तर यामुळे पर्यावरणावर खूप सकारात्मक परिणाम जाणवतील. सध्या भारत आपल्या इंधनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर देशांवर अवलंबून आहे. भारतात जितकी इंधनाची गरज आहे त्यापैकी ८८ टक्के तेल भारत आयात करतो. भारतात प्रवासी विमान वाहतूकही फार मोठ्या प्रमाणावर होते. विमानांसाठी फार मोठ्या प्रमाणावर इंधन लागते. त्यामुळे आपल्या देशाला इंधन आयात करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च करावे लागते. देशात परिवहनासाठी जितके इंधन खर्च होते, त्यापैकी ६० टक्के इंधन हे केवळ मालवाहतूक करणाऱ्या ट्रकमध्ये वापरले जाते. सध्या आपण पेट्रोल आणि डिझेलवरील वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यावर लक्ष केंद्रित करीत आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढण्यासाठी सरकारकडून सबसिडी दिली जाते. कारण, विद्युत वाहनांच्या किमती या इंधनावर चालणाऱ्याच वाहनांपेक्षा जास्त असतात. पण, दीर्घकालीन विचार करता विद्युत वाहने वापरणे आर्थिकदृष्ट्या फायद्याचे ठरू शकते. आता जगातील बहुतेक सर्व वाहननिर्मिती कारखान्यांमध्ये उत्तम दर्जाची विद्युत वाहने तयार करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. येत्या दशकभरात इलेक्ट्रिक कारचा वापर मोठ्या प्रमाणात वाढणार असा कयास आहे. खर्च आणि इंधन कार्यक्षमतेमुळे इलेक्ट्रिक वाहने खूप लोकप्रिय होत आहेत. मात्र, ही वाहने टिकाऊ आहेत की नाही, याबाबत अद्याप खात्री पटलेली नाही. विद्युत वाहन कर्जावरील व्याजदर इंधनावरील वाहन कर्जापेक्षा कमी असू शकतात. कारण, बँका ग्राहकांना पर्यावरणास अनुकूल वाहने खरेदी करण्यास प्रोत्साहित करू शकतात. विद्युत वाहनांना देखभाल खर्च कमी येतो. यात मेकॅनिकल पार्ट्स कमी असतात, म्हणून देखभाल खर्च कमी येणार, ध्वनी प्रदूषण कमी होते. गाड्या सुरू करतानाही आवाज कमी होतो. येत्या दशकभरात इलेक्ट्रिक कारचा वापर मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. सरकार आणि कार निर्मात्या कंपन्या यासाठी प्रयत्न करत आहेत. देशातील वाहन निर्मित प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. या साऱ्यांवर ठोस उपाय म्हणून आपल्या सरकारने शून्य प्रदूषण करणाऱ्या इलेक्ट्रिक कारला चालना द्यायचे धोरण अवलंबिले आहे. इलेक्ट्रिक कार हा बदल जसा अनिवार्य आहे, तसाच तो आमूलाग्र अन क्रांतिकारी देखील ठरणार आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक कार हा विषय आबालवृद्धांच्या कुतूहलाचा तर उत्पादकांसाठी आव्हानात्मक तसेच काही पारंपरिक गोष्टींसाठी आणि व्यवसायांसाठी चिंतेचा सुद्धा ठरणार आहे. पूर्ण पायाभूत सुविधा उपलब्ध होत नाही तोपर्यंत लोकांचा ही वाहने घेण्याचा कल किती राहील अशी शंका कायम आहे. इलेक्ट्रिक वाहन घ्यायचे की नाही अशा संभ्रमात असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. हे लोक सध्या रस्त्यावर क्या इलेक्ट्रिक वाहने धावत आहेत, त्यांच्यातील गुण / अवगुण ढुंढण्याचा प्रयत्न करत आहेत. इलेक्ट्रिक गाड्यांचा जस जसा चांगला रिजल्ट येऊ लागेल तस तसे हा वर्ग या गाड्यांच्या खरेदीकडे वळू शकणार आहे. त्यामुळे आता ई - क्रांति होणार हे नक्की आहे.

# पतपेढीची निवडणूक परिवर्तन घडवेल?

मुंबई महानगरपालिकेची निवडणूक अद्याप तरी नक्की कधी होईल हे जाहीर झालेले नाही. पण राजकीय पक्षांनी पालिका ताब्यात घेण्याचा चंग बांधला आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येऊन ही पालिका निवडणूक लढणार असल्याचे आता तरी बोलले जात आहे. मुंबई महानगरपालिकेत मराठी बाणा कायम राहण्यासाठी या दोन ठाकरे बंधूंनी एकत्र यायला पाहिजे.अशी इच्छा इथल्या मराठी माणसांची आहे. पण मराठी माणसांना सहजासहजी एकत्र येऊ न देण्याची काळजीही काही पक्ष घेतील यात शंका वाटत नाही. मुंबई महापालिका मराठी माणसाने जिंकणे हा शेवटी मराठी अस्मितेचा प्रश्न आहे. ही अस्मिता कायम टिकवायची असेल तर मात्र मराठी माणसाच्यांच्याच हाती सत्ता आली पाहिजे. ती जर अमराठी लोकांच्या ताब्यात गेली. किंवा त्यांनी पालिकेत वर्चस्व प्रस्थापित केले तरी एकूणच मराठी भाषा, मराठी माणूस, मराठी संस्कृती , मराठीचे अस्तित्व टिकून ठेवणे अवघड जाणार आहे. आजच मराठी माणसांची मुंबईत काय अवस्था आहे.ही आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे. मराठी माणसाला घर किंवा कार्यालयाला सुद्धा "त्यांच्या" वस्तीत जागा मिळू शकत नाही.जागा मिळाली तरी त्याला मांसाहार करता येत नाही., कोंबड्या , शेळ्या पळता येत नाही. ही अवस्था आहे. राज्य सरकार हिंदी भाषेची सक्ती करीत आहे. याला इथले मराठी माणसं विरोध करीत आहेत. पण मराठी माणसांच्या या क्रियेला उत्तर प्रदेशातून एक खासदार विरोधी प्रतिक्रिया देत आहे. हे कशाचे द्योतक म्हणावे. मुंबईत काही दिवसांपासून कबुतर खान्यांचा विषय ऐरणीवर आला आहे. कबूतर खाने बंद करण्याचे आदेश सरकार मधील मराठी मंत्र्यांनी दिले आहेत. न्यायालयानेही त्यावर शिक्का मोर्तब केले आहे. कबुतरांना दाणे टाकण्यास ही निर्बंध घालण्यात आली असताना जैन समाज त्या विरुद्ध वागत आहे.शस्त्र हाती घेण्याची भाषा करीत आहे.आजही परिसरातील गच्चीवर कबुतरांना दाणे टाकले जात आहे. पालिकेने दादरचा कबुतर खाना ताडपत्री टाकून बंद केलेला असताना तो चाकू सुऱ्याने फाडून पुन्हा खुला केला गेला.विशेष म्हणजे हा सारा प्रकार पोलिसांच्या.देखत झाला होता. पण अद्याप एकाही जैन समाजाच्या माणसावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली नाही. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यानंतर ही त्या माणसांवर कोणतीही कारवाई झालेली नाही.ही विशेष. मात्र गेल्या आठवड्यात मराठी एकीकरण समितीने पोलिसांना याचा जाब विचारण्यासाठी मोर्चा काढण्याचे ठरविल्यानंतर त्यांना नोटिसा देण्यात आल्या. त्यांनी त्या नोटीसला भीक न घालता ठरलेल्या वेळी कबुतर खाना येथे येताच पोलिसांनी त्यांना अटक केली. व संपूर्ण दिवस जैन मंदिराला संरक्षण दिले. कबुतर

खान्याला पोलिसांच्या वाहनांनी घेरले होते. लोखंडी जाळ्या लावून तो बंदिस्त करण्यात आला होता.या अमराठी लोकांच्या मागे इथले सरकार आहे.त्यामुळे असे घडते आहे. हे सरकार कोणत्या विचाराचे आहे. कुणाच्या मागे ते उभे आहे. हे मराठी माणूस ओळखून आहे. पण कृती करण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा मात्र मराठी माणूस कचरत असतो. कारण आजची राजकारणाची दिशा बदलली आहे. नव्हे संपूर्ण राजकारण जात आणि धर्म याच्या भोवती घुटमळत आहे. मी मराठी आहे. ते मराठीपण विसरून मराठी माणूस आधी जात आणि धर्म याला अधिक महत्व देत असतो. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती मराठी माणसाने बदलण्याची आवश्यकता आहे. आजपर्यंत मराठी माणसाच्या नावाने गळे काढणाऱ्यांनी ही काही केले नाही उलट इथला मराठी माणूस बाहेर जात असताना त्याने इथेच रहावे म्हणून कोणतेही प्रयत्न केले नाही म्हणून आज मराठी माणसाची लोकसंख्या कमी होऊन अमराठी माणसांची संख्या मुंबईत वाढली आहे. ती या पुढेही अधिक वाढणार आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर दगडापेक्षा विट मऊ या न्यायाने मराठी माणूस व मराठी भाषेसाठी मराठी माणसाने आता एकत्र येण्याची केवळ गरज नव्हे तर काळाची गरज होऊन बसली आहे. पटतंय का ते बघा अन्यथा...



## महापालिकायन

सुनील शिंदे
मोबाईल नंबर-९८२१९९६११७

### पतपेढीच्या निवडणुका

मुंबईतच नव्हेतर संपूर्ण राज्यात सध्या सहकारी बँकांच्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी या सहकारी बँकांच्या निवडणुका न्यायालयाच्या आदेशाने ८ -- ९ वर्षानंतर होत आहेत. या निवडणुका पालिका निवडणुकीची रंगीत तालीम समजायला काही हरकत नाही. कारण या बँकांवर वर्चस्व स्थापित करण्यासाठी विविध राजकीय पक्षाच्या आशीर्वादानेच विविध पॅनल निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या पॅनल चे नेतृत्व करणारे आज कितीही काहीही बोलू देत की, राजकीय पक्षाचा आणि आमचा काहीही संबंध नाही. पण लोकांना माहित आहे की नेतृत्व करणारी व्यक्ती कोणत्या पक्षाची आहे. व या पॅनल च्या मागे कोण आहेत. त्यामुळे ही सुद्धा एक राजकीय लढाई आहे. हे कुणी सांगण्याची गरज आहे असे वाटत नाही.बृहन्मुंबई महानगर पालिका कामगारांची गेल्या ७३ वर्षांपासून सुरू असलेल्या दी म्युनिसिपल को.ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई ची संचालक मंडळाची निवड करण्यासाठीही पंचवार्षिक निवडणूक येत्या २१ ऑगस्ट रोजी होत आहे तर २१ ऑगस्ट रोजी पालिकेचाच एक भाग असलेल्या बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांच्या दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेडची पंचवार्षिक निवडणूक - (२०२५-२०३०) होत आहे. ५ पॅनल ही निवडणूक लढवत आहेत. तर म्युनिसिपल बँकेच्या निवडणुकीत तब्बल ७ पॅनल रिंगणात आहेत. तर बेस्ट क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीत मात्र प्रथमच उद्धव ठाकरे यांची शिवसेना प्रणित युनियन व राज ठाकरे प्रणित युनियन एकत्र आल्या आहेत. ते उत्कर्ष पॅनल च्या माध्यमातून निवडणूक लढवत आहेत. गेल्या काही दिवसांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ही दोघे भाऊ एकत्र येऊन लढणार असल्याची चर्चा आहे.हे दोघे भाऊ आधी मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आले. या बँकांच्या निवडणुकीमध्ये ते प्रत्यक्ष एकत्र आले आहेत पण उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षातील नेते विठ्ठलराव गायकवाड यांनी मात्र परिवर्तन पॅनल स्वतंत्रपणे उभे केले आहे. गायकवाड व शिवसेना प्रणित बेस्ट कामगार सेना युनियनचे अध्यक्ष सुहास सामंत यांच्याचकडे ही पतपेढी होती. पण सामंत आणि गायकवाड यांच्यातून आता विस्तव जात नाही. म्हणून कदाचित गायकवाड यांनी आपले स्वतःचे स्वतंत्र पॅनल उभे केले आहे. इकडे उद्धव व राज एकत्र आल्याने भाजपनेही या बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.च्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत "उत्कर्ष पॅनल" च्या नावाखाली उडी घेतली आहे. भाजपचे आमदार प्रसाद लाड यांची श्रमिक उत्कर्ष सभा, दिवंगत कामगार नेते मनोज संसारे यांची बहुजन एम्प्लॉईज यूनियन, भाजपचे माजी केंद्रीय मंत्री व नेते नारायण राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना, कामगार नेते महेंद्र साळवे यांची एस् सी एस् टी वेल्फेअर असोसिएशन संघटना आणि दी इलेक्ट्रिक युनियन अशा एकूण पाच संघटना एकत्रित येऊन ' सहकार समृद्धी पॅनल ' च्या बॅनरखाली आणि आमदार व भाजप नेते प्रवीण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली बेस्ट पतपेढीची निवडणूक लढवित आहेत. तर भाजप पक्षातही प्रवीण दरेकर व प्रसाद लाड यांच्या विरोधात भाजप बेस्ट कर्मचारी संघाचे अध्यक्ष गणेश हाके आणि सरचिटणीस गजानन नागे यांनीही सहकार विकास पॅनल उभे केले आहे. प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांच्या सहकार समृद्धी पॅनेलने बेस्ट कामगारांना वारे माप आश्वासने दिली आहेत. बेस्ट उपक्रमाला आमचे सरकार, मुख्यमंत्री, महापालिका आणि मुंबै बँकेच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यासाठी प्रयत्नशील राहू. तसेच, बेस्टच्या कामगारांना घरे मिळवून देण्यासाठी आम्ही आर्थिक मदत करू. बेस्ट उपक्रमाला आम्हीच तोट्यामधून बाहेर काढू, असे आश्वासन दिले आहे. व या निवडणुकी आधी पतपेढीवर सत्ता असलेल्या संचालकांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. त्यामुळे बेस्ट च्या पतपेढीच्या निवडणुकीच्या निमित्ताने चांगलेच राजकीय वातावरण तापले होते. शशांक राव यांचेही बेस्ट वर्कर युनियनचे पॅनल उभे आहे.शशांक राव सुद्धा भाजप चेच आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे.

### बेस्ट बुडते जहाज

आज बेस्ट ची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. बेस्ट उपक्रमात ४६ हजार कामगार होते आज ते २२ हजाराच्या खाली आले आहेत. पण पतपेढीचे सभासद १५ हजार आहेत. २०१६ पासून बेस्ट मध्ये भरती बंद आहे त्यामुळे सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागा भरल्या जात नाहीत.सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अधिदान सुद्धा तत्काळ मिळत नाही. अनेक थकबाक्या मिळत नाहीत. कामगारांना वेतनात चिल्लर दिली जाते. ते ओझे घेऊन त्यांना घरी जावे लागते. त्यांचे सर्व आर्थिक फायदे बंद करण्यात आले आहेत. बेस्ट सेवेत ४५०० बसेस बेस्ट च्या स्वमालकीच्या होत्या आता हजार बसेस सुद्धा उरल्या नाहीत. भाडेतत्त्वावर घेतलेल्या बसेस घेतल्या होत्या त्यातील काही ठेकेदारांनी आपल्या बसेस बंद केल्या त्यामुळे दीड कोटीच्या मुंबईत बेस्ट च्या अडीच हजार बसेस पुरत नाहीत त्यामुळे बेस्ट बस ची वाट बघण्यातच प्रवाशांचा वेळ जातो. काही प्रवासी मग अधिक पैसे देऊन शेअर टॅक्सी वा रिक्षाने प्रवास करतात. अशी एकूण बेस्ट उपक्रमाची परिस्थिती आहे. त्यामुळे बेस्टमध्ये पूर्णवेळ महाव्यवस्थापक म्हणून कुणी सनदी अधिकारी येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. म्हणून बेस्टला अर्धवेळ महाव्यवस्थापक नेमण्यात येतात. या सर्व परिस्थितीकडे कानाडोळा करून बेस्ट कामगारांच्या पतपेढीसाठी सर्व राजकीय पक्ष व कामगार संघटना निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. आज बेस्टच्या पतपेढीचे १५ हजार कामगार मतदान करून पतपेढीचे कारभारी निवडून देणार आहेत. हेच राजकीय पुढारी व कामगार नेते कामगारांच्या समस्या आणि बेस्ट जिवंत राहण्यासाठी लढले असते तर बेस्ट उपक्रमाची ही जर्जर स्थिती झाली नसती. बेस्ट च्या या बुडत्या जहाजाला संजीवनी देण्याची वेळ अजूनही शिल्लक आहे. बेस्ट उपक्रम सुरूच राहिला पाहिजे तो कुणा उद्योगपतीच्या घशात जाऊ नये या साठी नवीन संचालक मंडळ प्रयत्न करणार आहे की नाही हाच खरा प्रश्न आहे.

# असामान्य अभिनेत्री ज्योती चांदेकर काळाच्या पडद्याआड

**मराठी** रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय चेहरा, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ज्योती चांदेकर या मराठी रंगभूमीवरील नावाजलेल्या अभिनेत्री होत्या. केवळ रंगभूमीवरच नाही तर चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. ज्योती चांदेकर यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. लहान असतानाच त्यांनी काही नाटकात अभिनय केला. पुढे अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी नाटकात भूमिका केल्या. त्यांनी अभिनय केलेले सुंदर मी होणार आणि मिसेस आमदार ही नाटके रंगभूमीवर तुफान गाजली. त्यातील त्यांच्या भूमिका त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरल्या. या भूमिकांनी त्यांना रंगभूमीवर असामान्य अभिनेत्री असा गौरव मिळवून दिला. या नाटकातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यानंतर त्यांनी चित्रपटाकडे आपला मोर्चा वळवला. ग्यानबाची मेख हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यानंतर त्यांनी तिचा उंबरठा, ढोलकी, सुखांत, मी सिंधुताई सपकाळ, फुलवात, देवा, श्यामची आई या चित्रपटातूनही भूमिका केल्या. ज्योती चांदेकर यांनी रणजीत



पंडित यांच्याशी विवाह केल्यावर त्यांना पौर्णिमा व तेजस्विनी या दोन मुली झाल्या. तेजस्विनी ही मराठी चित्रपट सृष्टीतील सध्याची आघाडीची अभिनेत्री आहे. लग्नानंतरही ज्योती चांदेकर यांनी आपले नाव बदलले नाही. ज्योती चांदेकर यांच्या अभिनय कारकिर्दीसाठी त्यांच्या पतीने मोठा त्याग केला. ज्योती चांदेकर यांची अभिनय कारकिर्द सुरू रहावी यासाठी त्यांच्या पतीने आपली नोकरी सोडली आणि मुलींचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. ज्योती चांदेकर यांच्या कारकिर्दीत अनेक चढ उतार निर्माण झाले पण त्या डगमगल्या नाहीत. आलेल्या संकटावर त्यांनी मात केली आपली अभिनय कारिकर्द यशस्वी केली. चित्रपट आणि नाटकासोबतच त्यांनी टीव्हीवरील मालिकेतही भूमिका केल्या. त्यांनी साकारलेली 'ठरलं तर मग' मालिकेतील पूर्णा आजी, मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील सिंधुताई सपकाळ या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. देवा एक अतरंगी या चित्रपटामधील त्यांची भूमिका देखील प्रेक्षकांना भावली. ज्योती चांदेकर यांनी असंख्य नाटकं आणि मालिका यांच्या माध्यमातून आपल्या अभिनयकलेचा अविस्मरणीय ठसा उमटवला. ठरलं तर मग आता या मालिकेत त्यांनी साकारलेली पूर्णा आजी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या भूमिकेने त्यांना घराघरात पोहचवले. ज्योती चांदेकर या संपूर्ण महाराष्ट्राची लाडकी पूर्णा आजी बनल्या. याच मालिकेत अभिनय करत असताना त्या आजारी पडल्या आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. पडद्यावरील त्यांची सहजसुंदर अभिव्यक्ती, आत्मीय भाव आणि प्रांजळ संवादकळा प्रेक्षकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आई, जिव्हाळयाची कलाकार, असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## पत्र मानस

### पोलिस अधिकाऱ्याची लाथ आणि सारवासारव

गेल्या दोन दिवसांपासून जालन्यातील एका व्हिडिओने समाजमाध्यमांवर जोरदार चर्चा रंगवली आहे. पोलीस उपाधिक्षक अनंत कुलकर्णी यांनी आंदोलकाला लाथ मारल्याचा हा व्हिडिओ आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या ताफ्याला अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकाला अगदी फिल्मी स्टाईलने उडी मारून कमरेत लाथ घालतानाचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले आणि क्षणात जनक्षोभ उसळला. सामान्य जनतेच्या दृष्टीने पोलीस अधिकारी हा कायदा आणि शिस्तीचे प्रतीक असतो. अशा अधिकाऱ्याने 'लाथ घालणे' हे वर्तन संतापजनक ठरते. म्हणूनच सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या, संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी वाढू लागली. जनतेचा आक्रोश हा फक्त त्या एका लाथेबद्दल नव्हता; तर अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्याला अशा रीतीने चिरडण्याच्या प्रवृत्तीबद्दल होता. यानंतर अनंत कुलकर्णी यांनी स्पष्टीकरण दिले — संबंधित व्यक्तीने आत्मदहनाचा प्रयत्न केला, डिझेल स्वतःवर ओतले आणि पोलिस कर्मचाऱ्याच्या अंगावरही टाकण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे त्याला आवरण्यासाठी असे करावे लागले. मात्र व्हिडिओतील दृश्य आणि नंतर दिलेले स्पष्टीकरण यामध्ये विसंगती जाणवल्याने हे उत्तर लोकांना सारवासारवच वाटले. कारण कॅमेऱ्यात दिसणारा “फिल्मी स्टाईल लाथेचा प्रकार” लोकांच्या मनातून सहज पुसला जाणार नाही. प्रतिष्ठितांना वेगळा न्याय आणि सामान्यांना वेगळी वागणूक ही पोलिसांची प्रतिमा काही उदाहरणांवरुन जनमानसात रुढ झाली आहे. सध्याचे लाथ प्रकरण हे या समजावरच शिक्कामोर्तब करते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### अटलजींचा भाजपकडून विसर

भाजपतर्फे मुंबईत ठिकठिकाणी दहीकाला निमित्ताने मोठ्या बक्षिसांच्या दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या.त्या दहीहंडी आवारात भाजपतर्फे लावण्यात आलेल्या कापडी फलकांवर स्थानिक,राज्य पातळीवरील नेत्यांचे छायाचित्र होते.पण त्याच दिवशी माजी पंतप्रधान,भाजपचे संस्थापक अटलबिहारी वाजपेयी यांची पुण्यतिथी होती.त्यांचे पुण्यस्मरण कोणी केले नाही वा छायाचित्रही कार्यक्रमाच्या मंचावर लावलेले नाही याचे सखेद आश्चर्य वाटते.भाजपकडून याचा विसर पडलेला वाटतो.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव**

### फाळणीचे सत्य बाहेर आले पाहिजे

केंद्र सरकार शालेय अभ्यासक्रमात भारताच्या फाळणी बाबतीतील माहिती पुस्तकात दुरूस्ती करून सविस्तर करणार आहे. भारताच्या फाळणीला फक्त आणि फक्त ब्रिटिशच जवाबदार आहे असे आतापर्यंत आपल्याला सांगितले जात होते. पण आता भारताच्या फाळणीला ब्रिटिश म्हणजे शेवटचे व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांच्याबरोबर पाकिस्तान म्हणजेच मोहम्मद अली जिन्ना आणि भारत म्हणजेच भारताचे त्यावेळेचे नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरू यातिघांनाही समांतर जवाबदार धरले जाणार आहे. थोडक्यात कोणत्याही एका व्यक्तीने किंवा पक्षाने देशाची फाळणी केलेली नसून त्यावेळेची तशी परिस्थिती कारणीभूत झाली असावी असे वाटते. फाळणी दरम्यान लाखोंच्या संख्येने लोक विस्थापित झाले तर काहींचा मृत्यू झाला होता. फाळणी नंतर मात्र काँग्रेसने स्वतंत्र भारतावर राज्य केले तेही सलग पन्नास वर्षापर्यत आणि त्यामुळे एकट्या काँग्रेसनेच देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले असावे असे कालपर्यंत वाटणाऱ्या जनतेला फाळणीचा इतिहास नव्याने अभ्यासक्रमात समावेश केल्याने फाळणीची जवाबदारी देखील कळून येईल,असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

## सोमेश्वर कारखान्यात 54 लाखांचा अपहार दोषींवर कारवाई

**सोमेश्वरनगर :** सोमेश्वर सहकारी कारखान्याच्या टाइम ऑफिसमध्ये ५४ लाख ४७ हजार रुपयांचा आपहार झाल्याप्रकरणी संचालक मंडळाने कठोर भूमिका घेत या अपहारात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या दोघांवर कारवाई करत त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय घेतला आहे. शनिवार (दि. १६) रोजी संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत चौकशी समितीने चौकशी अहवाल सादर केला. यामध्ये दोषी नसलेल्या विलास महादेव निकम, सुरेश बाबूराव होळकर, दीपक रवींद्र भोसले आणि मानसिंग कृष्णराव बनकर या चार कामगारांना तत्काळ कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती सोमेश्वर कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी दिली. कारखान्याने स्थापन केलेल्या ॲड. मंगेश चव्हाण चौकशी समितीने अपहाराचा ठपका असणाऱ्या कामगार अधिकारी दीपक निंबाळकर व कर्मचारी रूपचंद साळुंखे यांनाही आपली बाजू मांडण्याची संधी दिली होती. इतर चार कामगारांची खात्याअंतर्गत चौकशी झाली. रूपचंद साळुंखे याने केलेल्या अपहाराची रक्कम मिळून ५४ लाख ४७ हजार रुपयांची वसुली करण्यात कारखान्याला यश आले होते. कारखान्याने स्थापन केलेल्या चौकशी समितीकडून व संचालक मंडळाकडून दोषींवर काय कारवाई होणार याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे. रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नावापुढे बोगस हजेरी दाखवून त्याचे पैसे उकळण्याचा प्रकार टाइम ऑफिसमध्ये घडला होता.

## पान 1 वरुन

### सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन

कौटुंबिक न्यायालयाचे काम करण्यात येत होते. या मूळ इमारतीचे अत्यंत कमी वेळेत नूतनीकरण करुन याच इमारतीमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे कामकाज होत आहे. न्यायदानाची साक्ष देणाऱ्या हेरिटेज इमारतींना सर्किट बेंचमुळे नवी झळाळी मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिश्रमातून केवळ एका महिन्यात सर्किट बेंच इमारतींची डागडुजी आणि नूतनीकरण होत या परिसराचा कायापालट झाला आहे. यामुळे हा परिसर शहराच्या सौंदर्यात भर घालत आहे. कामकाजाची वेळ मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचच्या कामकाजाची वेळ निश्चित झाली आहे. सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता सर्व दिवस सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत पहिले सत्र, दुपारी १.३० ते २.३० मधली सुट्टी व त्यानंतर दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत दुसरे सत्र सुरु राहील. कौटुंबिक न्यायालयाच्या जुन्या हेरिटेज इमारतीत डिव्हिजन बेंचची व्यवस्था करण्यात आली आहे. या इमारतीत दोन्ही न्यायमूर्तींचे स्वतंत्र खासगी कक्ष आणि कार्यालयीन कक्ष आहेत. या परिसरात जुन्या हेरिटेज इमारतीत एक डीव्हीजनल बेंच आहे. तर आरसीसी इमारतीत २ सिंगल बेंच आहेत. या इमारतीत रजिस्ट्रार कक्ष, न्यायालयीन कामातील कर्मचाऱ्यांसाठी बसण्याची व्यवस्था, रेकॉर्ड रुम करण्यात आली आहे. प्रवेशद्वारातून आत आल्यानंतर उजव्या बाजूच्या दुमजली इमारतीत सरकारी वकिलांची कार्यालये आहेत. या इमारतीसमोर असलेल्या छोट्या दुमजली इमारतीत काही सरकारी वकिलांची कार्यालये आहेत. परिसरात मध्यस्थी कक्ष करण्यात आला आहे. ऐतिहासिक अशा राधाबाई बिल्डिंगमध्ये रजिस्ट्रार यांचे कार्यालय, रेकॉर्ड रुम, स्ट्रॉंग रुम व कार्यालये आहेत. नूतनीकरणामुळे या इमारतीच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे. या इमारतीमध्ये न्यायाधीशांसाठी लॉन्ज, सरकारी वकिलांसाठी कक्ष तयार करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील नागरिकांची सोय या सर्किट बेंचमुळे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूरसह सातारा, सांगली, सोलापूर आणि कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ६ जिल्ह्यांतील नागरिकांना जलद आणि सुलभ न्याय मिळेल.

### दिल्ली हे विकसित भारताचे मॉडेल

यावेळी बोलताना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी द्वारका एक्स्प्रेसवेला 'अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना' म्हटले. हा प्रकल्प केवळ एक महामार्ग नसून, तो यशोभूमी, बिजवासन रेल्वे स्टेशन आणि दिल्ली मेट्रोला जोडणारा एक मल्टी-कनेक्टिव्हिटी हब आहे. या कामादरम्यान १०,००० हून अधिक झाडांचे यशस्वी पुनर्रोपण करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

## 174 च्यावर आरक्षित जागांवर सरकारचा दरोडा

### तीन महानगरांमधील तीन अभियांत्रिकी संस्थांमध्ये अन्याय, महाराष्ट्रात आरक्षण चोरी

प्रतिनिधी
■ नागपूर

महाराष्ट्रात तीन सरकारी नामांकित अभियांत्रिकी संस्था आहेत. या संस्थांमध्ये एकएक जागेसाठी जीवघेणी स्पर्धा चालते. अर्ध्या-एका गुणानेही प्रवेश हुकतो. या संस्थांमधील जाती, जमाती, ओबीसी व अन्यच्या सुमारे १७४ च्यावर आरक्षित जागांवर खुद्द सरकारनेच दरोडा टाकल्याचे समोर आले आहे. या घटनेने मोठी खळबळ माजली आहे. यावर आरक्षण संपविण्याची ही सत्ताधाऱ्यांची छुपी चाल आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

या तीन शिक्षण संस्था पुणे, नागपूर आणि मुंबईतील आहेत. या अभियांत्रिकी संस्थांना सरकारने स्वायत्त केले. त्यांना विद्यापीठाचा दर्जा दिला. याशिवाय त्या संस्थांवर नागपुरी मर्जीतील मासीक दोन-तीन लाखाची माणसं नेमली. त्या सरकारी तिजोरितील उधळपट्टी आक्षेपांचे जाऊ द्या. मात्र त्यांच्या माध्यमातून चक्क आरक्षणाला कात्री लावली. हा सरकारने केलेला सामाजिक गुन्हा होय.

विश्वसनिय सूत्रानुसार आरक्षणावर दरोडा टाकला. त्या संस्थांमध्ये पुण्याची सीओईपी, नागपूरची एलआयटी आणि मुंबईची आयसीटी आहे. एकेकाळी या तिन्ही संस्था सरकारी अभियांत्रिकी कॉलेज होत्या. या तिन्ही संस्थांमध्ये प्रथम वर्षाच्या एकूण 1हजार 544 जागा होत्या. त्यापैकी दोन संस्थानी अनुक्रमे 30 टक्के, 30 टक्के जागा वेगळया काढल्या. या जागांमधील आरक्षण काढून टाकण्यात आले. उर्वरित जागांवरील आरक्षण कायम ठेवण्यात आले. मात्र पुण्याच्या सीओइपीने जुन्या जागांमध्ये कोणताही बदल केला नाही. नव्याने २५ टक्के जागा देशपातळीवर वाढविल्या. त्यामध्ये आरक्षण ठेवलेच नाही. या प्रकारांमुळे तिन्ही संस्थांमधील सुमारे १७४ वर आरक्षित जागांना हकदार मुकले. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या ४५ जागा, अनुसूचित जमातीच्या २४ जागा,ओबीसीच्या ६६ जागा आणि उर्वरित जागांमध्ये विमुक्त भटक्या, ईडब्लएस आदींच्या आरक्षित जागांचा समावेश आहे. या संस्थांना सरकारचे 100 टक्के अनुदान आहे. शंभर टक्के अनुदान असलेल्या शिक्षण संस्थांमध्ये कायद्याने शंभर टक्के आरक्षण भरणे अनिवार्य आहे. मात्र सत्ता प्रमुखांच्या निर्देशावरून आरक्षण कायद्याला केराची टोपली दाखविली आहे.

सीओइपी ,पुणे च्या ९९८ जागा आहेत. या जागांचे आरक्षण जैसे थे ठेवले. मात्र सुमारे 237 जागा वाढविल्या. या वाढीव जागा देशपातळीवरील अभियांत्रिकी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. त्यामध्ये जाता, जमाती, ओबीसी, ईडब्लूएस आदीसाठी १४२जागा आरक्षित हव्या होत्या. या जागांध्ये आरक्षणच ठेवले नाही. हे आरक्षित जागा चोरीचे प्रकरण होय.ज्याचे आरक्षण कमी झाले. ते विद्यार्थी व सामाजिक संघटना त्या संस्था,उच्च शिक्षण विभाग व मंत्र्यांविरूध्द फौजदारी व दिवाणी तक्रारीं करण्याच्या तयारीत आहेत.

मुंबईच्या आयसीटीमध्ये एकूण जागा 209 आहेत. त्यापैकी 30 टक्के म्हणजे ६३ जागा वेगळया केल्या. त्यातील आरक्षण रद्द केले. एलआयटी ,नागपूर. एकूण जागा 150 आहेत. 30 टक्के म्हणजे 48 जागा कमी झाल्या. हा प्रकार अतिशय गंभीर आहे. मतचोरी प्रकरण देशभर गाजत असताना महाराष्टात ' आरक्षण चोरी ' चा नवा प्रकार उजेडात आला. ही आरक्षण चोरी तातडीने थांबवा , अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशार जाती, जमाती, ओबीसीच्या डझनभर संघटनांनी दिला आहे.

## खेडसह चिपळूण व दापोलीत पावसाची संततधार सुरुच

### जगबुडी नदी अद्यापही धोका पातळीवर

प्रतिनिधी
■ दापोली



गेल्या काही दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे खेड तालुक्यातील नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. खेड शहरालगतची जगबुडी नदीच्या सतत वाढत्या पाण्यामुळे धोकादायक स्थितीत पोहोचली आहे. नदीची इशारा पातळी ५ मीटर असून धोका पातळी ७ मीटर आहे. सध्या नदीचे पाणी ७.२० मीटरवरून वाहत असल्याने खेड शहराला पुराचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. खेडसह चिपळूण व दापोली तालुक्यात पावसाची संततधार सुरुच राहिली आहे.

जगबुडी नदीचे पाणी पात्राबाहेर पडून खेडमधील मटण-मच्छी मार्केट परिसर आणि शेजारील रस्त्यांमध्ये शिरले आहे. यामुळे व्यापारी व नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दापोली नाका येथे रस्त्यावर पुराचे पाणी आल्याने वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. याशिवाय खेड-दापोली मार्गावरील सुर्वे इंजिनिअरिंगजवळ रस्त्यावर पाणी आल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. तालुक्यातील खडीपट्टा विभागाचा खेड शहराशी संपर्क तुटल्याची माहितीही समोर आली आहे. दरम्यान, खेड नगरपरिषद प्रशासन सतत नागरिकांना सावधगिरीचा इशारा देत आहे. १६ ऑगस्ट पासूनच नगरपरिषदेकडून अधिकृत इशारा जारी करण्यात आला आहे. त्यात नागरिकांना व व्यापाऱ्यांना सतर्क राहण्याचे व आपले कुटुंबीय व सामान सुरक्षित स्थळी हलवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## व्हॉट्सॲपवरुन शेअर बाजारात ट्रेडिंग महागात, 40 लाखांची फसवणूक

प्रतिनिधी
■ ठाणे

व्हॉट्सअॅप समूहात जोडल्यानंतर त्या माध्यमातून ट्रेडिंगसाठी सल्ला घेणे एका ४८ वर्षीय व्यक्तीला महागात पडले. त्याची ४० लाख रुपयांना फसवणूक करण्यात आली असून त्याने दिलेल्या तक्रारीनंतर वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

वर्तकनगर भागात ४८ वर्षीय व्यक्ती राहत असून तो एका कंपनीमध्ये व्यवस्थापक म्हणून काम करतो. मागील काही महिन्यांपासून तो एका बँकेच्या संकेतस्थळामार्फत शेअर बाजारात ऑनलाईन ट्रेडिंग करु लागला होता. या ट्रेडिंगच्या माध्यमातून नफा मिळत असल्याने त्याला शेअर बाजारातील गुंतवणूकीवर अधिक विश्वास बसला होता. मे महिन्यांत त्याला फेसबुक या समाजमाध्यमावर एक जाहिरात त्याला दिसली. त्यामध्ये शेअर बाजारा संदर्भात माहिती होती. त्यामुळे त्याने त्या जाहिरातीवर क्लिक केले. अवघ्या काही सेकंदात तो व्यक्ती एका व्हॉट्सॲप समूहात जोडला गेला. त्यानंतर त्याला मोबाईलमध्ये एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्या ॲपवर पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले जात होते. त्याने सुरुवातीला त्यामध्ये १० हजार गुंतविले. त्यानंतर त्याला ॲपमध्ये नफा दर्शविला जात होता. ॲपमध्ये नफा दिसत असल्याने त्या व्यक्तीने टप्प्या-टप्प्याने त्यामध्ये ४० लाख ९९ हजार ८१४ रुपयांची गुंतवणूक केले.

## सामान्यांसाठी घरे उभारण्याचा 'सोलापूर पॅटर्न' राज्याला दिशादर्शक - मुख्यमंत्री

◆मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सोलापूरमधील दहिटणे आणि शेळगी येथील 1348 सदनिकांचे वितरण
◆सोलापूरात रोजगार निर्मितीसाठी आयटी पार्क उभारण्यात येईल- मुख्यमंत्री

प्रतिनिधी
■ सोलापूर

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत केवळ सोलापूरमध्ये विविध गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत ४८ हजार सदनिका उभारणीचे नियोजन करण्यात आले आहे, त्यापैकी २५ हजार घरांचे काम पूर्ण झाले असून २० हजार घरांचे वितरण करण्यात आले आहे. उर्वरीत घरांचे काम सुरू असून याकरिता मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महोदयांनी १ हजार कोटी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गरिबांच्या घराचे स्वप्न पुर्ण करता येणार आहे. याच पद्धतीने सुंदर घरे उभारून गृहनिर्माण क्षेत्रात 'सोलापूर पॅटर्न' तयार झाला आहे. एखाद्या खाजगी विकासकाच्या प्रकल्पालाही लाजवेल अशी घरे सोलापूरमधील दहिटणे व शेळगी येथे उभारण्यात आली आहेत.




सोलापूरने महाराष्ट्राला गरजूंना कमी खर्चात दर्जेदार घरे देण्यासंदर्भात दिशा दाखवली आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

देशातील प्रत्येक बेघर कुटुंबाला हक्काचा निवारा मिळवून देऊन त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे या उद्दिष्टावर आधारित केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) उभारण्यात आलेल्या दहिटणे येथील राष्ट्र तेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत ११२८ आणि शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत २२० अशा एकूण १३४८ सदनिकांच्या वितरणप्रसंगी मा. श्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. सदर कार्यक्रमाला सोलापूरचे मा. पालकमंत्री जयकुमार गोरे, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मा. सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, रणजितसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, दिलीप सोपल, सचिन कल्याणशेट्टी, अभिजित पाटील, देवेंद्र कोठे, 'म्हाडा'चे प्रभारी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद शंभरकर, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी उमेश वाघ, माजी आमदार राजेंद्र राऊत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे, राष्ट्र तेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेचे अध्यक्ष सुरेश बिराजदार, श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार

### राज ठाकरेंची उपस्थिती

### तेजस्वीनी पंडितच्या अश्रूंचा बांध फुटला

प्रतिनिधी
■ पुणे

सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने शनिवारी (१६ ऑगस्ट) निधन झाले. आज पुण्यातील नवी पेठ वैकुंठ स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दुपारी १२ वाजून ५ मिनिटांनी येथील विद्युत दाहिनीमध्ये त्यांच्यावर दाहसंस्कार करण्यात आले. यावेळी सिनेसृष्टीतील अनेक लोक उपस्थित होते. तसेच मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनीही यावेळी अंत्यदर्शन घेतले.

ज्योती चांदेकर यांची मुलगी तेजस्विनी पंडित यावेळी आपले अश्रू रोखू शकली नाही. आपल्या आईला मुखाग्नी दिल्यानंतर तेजस्विनीच्या अश्रूंचा बांध फुटला. ज्योती



चांदेकर आणि तेजस्विनी पंडित या मायलेकींनी 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटादरम्यान एकत्र काम केले होते. गेल्या अडीच वर्षांपासून ज्योती चांदेकर महाराष्ट्राची नंबर वन मालिका म्हणून ओळख निर्माण झालेल्या 'ठरलं तर मग'मध्ये पूर्णा आजीची भूमिका साकारत होत्या. त्यांनी साकारलेल्या पूर्णा आजीच्या भूमिकेला चाहत्यांचं भरभरून प्रेम मिळाले. त्यांच्या निधनानंतर मालिकेतील कलाकार आणि चाहत्यांना धक्का बसला आहे.

आईच्या निधनानंतर तेजस्विनीने इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. "कळवण्यास अत्यंत दु:ख होत आहे की, मनमुराद जगणारी आणि दिलखुलास हसणारी आमची आई तसेच सर्वांची लाडकी ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर पंडित यांचं वयाच्या ६९ व्या वर्षी आज १६ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झालं आहे."

## वयाचा आकडा काय असतो ते भविष्यात दाखवून देऊ

### गणेश नाईकांचे शिंदे गटाला ठाण्यात येऊन चॅलेंज

प्रतिनिधी
■ ठाणे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना लॉटरी लागली. त्याचा आनंद आहे. पण कमाविलेले टिकविता आले पाहिजे असे वक्तव्य भाजपचे नेते वनमंत्री गणेश नाईक यांनी केले होते. या वक्तव्यानंतर शिंदे गटाकडून गणेश नाईक यांच्यावर टीका केली जात आहे. शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी थेट गणेश नाईक यांच्या वयाचा उल्लेख करत त्यांच्यावर टीका केली होती. त्यांचे वय झाल्याने ते काय बोलतात त्यांचे त्यांना माहित, असे म्हस्के म्हणाले होते. आता गणेश नाईक यांनीही नरेश म्हस्के यांना प्रत्युत्तर देत वयाचा आकडा काय असतो भविष्यात दाखवून देऊ असे



म्हटले आहे. त्यामुळे नाईक विरुद्ध शिंदे गट असा नवा अंक ठाणे जिल्ह्यात सुरु झाला आहे.

पालघर येथे १५ ऑगस्टला एका शासकीय कार्यक्रमात वनमंत्री गणेश नाईक संवाद साधत असताना त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव घेऊन लॉटरी मिळाल्याचे वक्तव्य केले होते. प्रत्येकाचे नशीब असते, लॉटरी लागते की नाही. एकनाथ शिंदेंना लॉटरी लागली, त्याचा आनंद आहे. पण कमविलेले टिकविता आले पाहिजे, असे माझे मत आहे. कसे कमविले, किती कमविले आणि कसे टिकविले यावर जनसामान्यांची नजर असते असाही उल्लेख त्यांनी केला होता. या वक्तव्यावरून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. शिंदे गटाचे ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी गणेश नाईक यांच्यावर टीका केली.

## विमानतळाच्या नावासाठी प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

### नांदगाव टेकडीवरुन सरकारला थेट आव्हान

प्रतिनिधी
■ पनवेल

एकीकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनाची लगबग सुरू असताना, दुसरीकडे याच प्रकल्पासाठी आपल्या जमिनी देणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या असंतोषाचा ज्वालामुखी पुन्हा एकदा पेटला आहे. आपल्या हक्कांसाठी आणि विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी शेकडो प्रकल्पग्रस्तांनी रविवारी थेट नांदगाव टेकडीवर चढाई करत सरकारला खुले आव्हान दिले. या अनोख्या आंदोलनाने प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आहे.

केंद्र आणि राज्य सरकार ३० सप्टेंबरपर्यंत विमानतळ सुरू करण्यासाठी



युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. मात्र, विकासाच्या या घाईत प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या आश्वासनांचा विसर पडल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. आपल्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रकल्पग्रस्त तरुणांनी एकत्र येत हे आंदोलन आयोजित केले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते, लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे.ज्या कुटुंबांच्या जमिनी संपादित झाल्या आहेत, त्या कुटुंबांतील सदस्यांना विमानतळ प्रकल्पात प्राधान्याने रोजगार मिळावा. पुनर्वसन पॅकेजअंतर्गत दिलेली आश्वासने आणि सुविधांची तातडीने पूर्तता करावी.

## तेरे जैसा यार कहा, तहसीलदाराच्या खुर्चीवर बसून म्हटलं गाणं...

### विभागीय आयुक्तांनी केली कडक कारवाई

प्रतिनिधी
■ नांदेड

तहसीलदाराच्या खुर्चीवर बसून तहसीलदार प्रशांत विश्वासराव थोरात यांनी उमरी येथील आपल्या दालनात निरोप समारंभाच्यावेळी तेरे जैसा यार कहां हे गाणं म्हंटलं होतं. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. व्हिडीओ व्हायरल झाल्याने विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी त्यांना तडकाफडकी निलंबित केलं आहे.

उमरी येथील तहसीलदार प्रशांत थोरात यांची शासन आदेशानुसार 29 जुलै रोजी बदली झाली होती. त्यांना निरोप देण्यासाठी शासकीय



कार्यालयातील सर्व कर्मचारी व अन्य कार्यकर्त्यांनी उमरीच्या तहसील दालनात कार्यक्रम आयोजित केला होता. आपल्या खुर्चीत बसून त्यांनी तेरे जैसा यार कहां, कहां ऐसा याराना, याद करेगी दुनिया, तेरा मेरा अफसाना हे गाणं म्हटलं होतं. याबाबतचा व्हिडीओ ज्या दिवशी कार्यक्रम झाला त्या दिवशी म्हणजेच 8 ऑगस्ट रोजी त्यांच्याकडून व त्यांच्या सहकार्यांकडून व्हायरल करण्यात आला. याची प्रशासनाने गंभीर दखल घेतली. जिल्हाधिकार्यां कडे याबाबत तक्रारी झाल्यानंतर जिल्हाधिकार्यांनी प्रशांत थोरात यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) 1979 चे नियम 3 (1) चे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) 1979 मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस विभागीय आयुक्ताकडे केली होती. तसा अहवाल शासनाकडे जिल्हाधिकार्यांमार्फत पाठविण्यात आला आहे. शासकीय कर्मचार्याला अशोभनिय ठरेल असे वर्तन त्यांनी केल्याने शासनाची प्रतिमा जनमानसात मलिन झाली असून ही बाब गंभीर आहे.

## मुलाकडूनच 65 वर्षीय आईवर दोनवेळा अत्याचार

### आईची पोलिसात धाव, पोराला अटक

■ नवी दिल्ली

राजधानी दिल्लीत आई-मुलाच्या नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली असून मुलाने 65 वर्षीय आईवरच दोनवेळा अत्याचार केल्याचा गुन्हा पोलिसात दाखल झाला आहे. आपल्या आईला चरित्रहीन असल्याचे सांगत वडिलांपासून वेगळं होण्यास भाग पाडलं. नराधम मुलाने आधी वडिलांपासून घटस्फोट घेण्यासाठी आईवर दबाव टाकला, त्यानंतर आईवरच



दोनवेळा अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल होताच 39 वर्षीय आरोपी मुलास पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, पीडित महिला आपल्या सरकारी नोकरीतील सेवानिवृत्त पतीसोबत हौज काझी परिसरात राहत होती. येथील घरी तिच्यासमवेत तिचा आरोपी मुलगा आणि 25 वर्षीय मुलगी देखील एकाच घरात राहत होते. तसेच, येथून जवळच कुटुंबातील आणखी एक मुलगी राहत असून ती विवाहित आहे. 17 जुलै रोजी पीडित महिला आपल्या पती आणि मुलीसोबत सौदी अरब दौऱ्यावर गेली होती. यादरम्यान, आरोपी मुलाने त्याच्या वडिलांच्या फोनवर कॉल करुन तातडीने दिल्लीला बोलावून घेतले. तसेच, तुम्ही तुमच्या पत्नीला घटस्फोट द्या, कारण माझ्या आईचे दुसऱ्या पुरुषासोबत अनैतिक संबंध असल्याचे मी लहानपणीच पाहिले होते, असेही मुलाने वडिलांना फोनवर सांगितले होते.

## नाशिकच्या राजगड कार्यालयात मनसे सहकार सेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

प्रतिनिधी
■ नाशिक

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नाशिक शहर जिल्ह्यातील मनसे सहकार सेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नाशिक शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राजगड कार्यालयात मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर अण्णा पाटील, मनसेचे नाशिक जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, मनसेचे नाशिक शहराध्यक्ष सुदाम भाऊ कोंबडे,मनसे सहकार सेनेच्या प्रदेश सरचिटणीस माजी नगरसेविका अनिषाताई माजगावकर, मनसे सहकार सेनेचे सरचिटणीस विजय जाधव, मनसे



महिला जिल्हाध्यक्ष सुजाताई ढेरे,सहकार सेनेचे उपाध्यक्ष वैभव भोर,भाऊसाहेब निमसे,राकेश परदेशी, अक्षरा घोडके, स्वागता उपासनी आदीसह अन्य सदस्य उपस्थित होते. सहकार सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या या बैठकीत सहकार सेनेचे प्रमुख मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन केले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "गटार दुरुस्ती"या लेखाशिर्षका प्र.क्र. ११ मध्ये आदर्शनगर ते सिद्धिविनायक टॉवर पर्यंतच्या गटाराचे साफ सफाई करणे. या कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द् शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.१८.०८.२५ ते दि.२५/०८/ २०२५ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे दि.२५/०८/२०२५ रोजी सायं. १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. २५/०८/२०२५ रोजी सायं १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-उ. प्र.स/५३१/२०२५-२६ सही/-
दि:१४.०८.२०२५
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

# असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ...

**असंगाशी** संग केल्यावर काय होतं याचं चांगलं उदाहरण निवडणूक आयोगाच्या रुपाने देशवासीयांसमोर उभं राहिलं आहे. आपलं स्वत्व भाजपला विकणाऱ्या अधिकाऱ्यांनी आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे. समृध्द लोकशाहीची वासलात लागली आहे. जे स्वत:च विकले गेले ते नामेनिराळे झाले. संजीव कुमार नावाचा अधिकारी देशाबाहेर मजा मारतो आहे. अशा असंख्य अधिकाऱ्यांची सोय भाजपच्या सत्तेने विविध ठिकाणी करून ठेवली आणि त्यांना चोऱ्या करायला भाग पाडलं. मूळ संस्थेत चोऱ्या केल्यावर गेले तिथेही चोऱ्या करायचे मार्ग मोकळे झाले. अशी लबाडी अनंत काळ पचत नसते. ती कधी तरी बाहेर येणारच. विरोधी पक्षनेता निडर असेल तर कोणत्याही परिणामांची तमा तो ठेवत नाही. जे काम आज राहुल गांधी यांनी करून दाखवलं आहे. आता कितीही सफाई देण्याचा आणि सारवासारव करण्याचा प्रयत्न केला तरी आयोगावर कोणाचाच विश्वास राहणार नाही. ज्यांच्यासाठी आयोगाने हे सारे उद्योग केले त्या भाजपच्या नेत्यांनी तर कमालच केली. आयोग ही आपली रखेल आहे, अशा तोऱ्यात भाजपचे नेते आयोगाची बाजू घेत होते. आता फार झालं अन्यथा अनेक्षित घटनांना त्यांना सामोरं जावं लागेल, हे त्यांनी लक्षात घ्यावं.

**प्रविण पुरो**

राहुल गांधी यांनी भर पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाचं वस्त्रहरण केलं तेव्हापासून देशभर मतचोरीची एकच चर्चा सुरू आहे. आयोगाच्या भ्रष्ट कारभाराचा पोलखोल करून आठवडा उलटला तरी आयोगाचे अधिकारी आपला हेका सोडायचं नाव घेत नाहीए. राहुल गांधी यांनी आपलं म्हणणं शपथपत्रावर मांडावं, असं सांगणारे आयोगाचे अधिकारी राहुल यांनी उघड केलेली माहिती आपल्याच दप्तरातील असल्याचं अमान्यही करत नाहीत. स्वत:चा बचाव करण्यासाठी ज्या काही युक्त्या आयोगाच्या वतीने करण्यात आल्या त्या साऱ्या फोल ठरल्या. राहुल गांधी यांच्या रायबरेली आणि प्रियंका गांधींच्या वायनाड लोकसभा मतदार संघातील वाढलेल्या मतांची माहिती अमित मालविय आणि अनुराग ठाकूर यांना पुरवली आणि आयोगासह भाजपही तोंडघशी पडला. मतांच्या चोरीचे पुरावे सत्ताधाऱ्यांनीच पुढे केल्याने राहुल गांधी यांच्या अरोपाला पुष्टीच मिळाली. ठाकूर आणि मालविय यांनी स्वत:च थोबाड फोडून घेतलं. पुढे देशाचं नागरिकत्व नसलेल्या सोनिया गांधी यांनीही मतदान करून मतचोरी केल्याचा नवा दावा मालविय यांच्या टोळीने केला. या माहितीतही फेरफार केल्याचं उघड झाल्याने मालविय उताणे पडले. चोऱ्या पकडल्या जाऊ नयेत म्हणून मतदान क्षेत्राच्या परिसरातील व्हिडिओ फुटेज आणि व्हीव्हीपॅट 45 दिवसात निष्कासित करण्याचा निर्णय त्याआधीच घेतला गेला. हे फुटेज बाहेर आले वा व्हीव्हीपॅट तपासले गेले तर सारा खेळ खल्लास. याची भीती भाजप आणि आयोगाला होती. निवडणूक आयोगाच्या प्रमुखाची निवड करण्याचा अधिकार आपल्याकडे राहावा म्हणून मोदींनी देशाच्या सरन्यायाधिशांना निवड समितीवरून दूर केलं.

जग डिजिटल प्रणालीचा सर्वत्र अंगिकार करत असताना असलेली माहिती पुसण्याचं पाप आयोगाने केलं. लाचार बनलेल्या पत्रकारांना हाताशी धरून राहुल गांधी यांना शहाणपण शिकवण्याचा प्रयत्न झाला. आयोगाने सांगितल्या प्रमाणे प्रतिज्ञापत्र दाखल करायला हवं होतं, नियमाप्रमाणे ठरल्यावेळी आयोगाकडे तक्रार करायला हव्या होत्या, त्यानंतर अपिलात जायला हवं होतं, अशा बाष्कळ सूचना होऊ लागल्या. आपली चोरी लपवण्याचा आयोगाचा हा छुपा मार्गच होता, हे लक्षात यायला वेळ लागला नाही. क्वासी ज्युडिशियल अधिकार असलेल्या संस्थेकडे प्रतिज्ञापत्र दाखल करणं म्हणजे निव्वळ वेळकाढूपणा आहे, हे राहुल जाणून होते.

राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेतल्यापासून ब्र न काढणाऱ्या आयोगाने भाजपच्या नेत्यांना कामाला लावलं. त्यांचाही खोटारडेपणा लपून राहिला नाही. सुरुवातील महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी प्रवक्ते असल्याप्रमाणे आयोगाची तरफदारी केली. राहुल गांधी यांची चीप निकामी झाल्याचं वक्तव्यं करणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातच मतचोऱ्या आढळून आल्या. या एका मतदारसंघात चक्क 29 हजार मतं अतिरिक्त निघाली. ज्यांनी आक्षेप घेतला ते प्रफुल्ल दुधाते यांनी याआधीच भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. सतीश उकये या वकिलाने याचिकेसाठी पुढाकार घेतल्याने त्यांना ईडीच्या खोट्या केसमध्ये अडकवण्यात आलं. फडणवीसांच्या या कृतीने लोकांमधला संशय अधिकच गढद झाला आणि आयोग अधिकच संकटात सापडला.

कर्नाटकच्या महादेवपूर मतदारसंघातील चोऱ्या बाहेर आल्यावर लोकशाहीला मानणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या मतदारसंघातील बोगस नावांच्या याद्या पडताळायला सुरुवात केली. तेव्हा देशभर मतचोरी झाल्याचं उघड झालं. महाराष्ट्रात अहमदनगरमध्ये 27 हजार मतदारांची नावं दुहेरी, तिहेरी पध्दतीने नोंदवलेली आढळली. बदली नावावर मतदान करणाऱ्यांची एक टीमच अहमदनगरमध्ये तयार होती. चंद्रपूर आणि गडचिरोली येथेही अशाच प्रकारे मतदार वाढवण्यात आल्याचं स्पष्ट झालं. विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात 29 लाख मतदार कसे वाढले या प्रश्नाचं उत्तर वरील वाढत्या मतदारांमध्ये होतं. दक्षिण पश्चिम नागपूर मतदारसंघात दररोज 162 नावं नोंदवली गेल्याचं स्पष्ट झालं. मतदारसंघात सरासरी चार टक्के मतदार वाढले की त्याची चौकशी केली पाहिजे, असा अयोगाचा नियम सांगतो. नागपूरच्या या मतदारसंघात आठ टक्क्यांहून अधिक मतदारांची नावं नोंदवली जावूनही त्यावर कोणतीच कारवाई झाली नाही. त्याआधी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत नितीन गडकरी यांना पाडण्यासाठी चक्क एक लाख नावं वगळली गेली. या कृत्याचा स्वत: गडकरींनीच पर्दाफाश केला. महाराष्ट्रातल्या पालघरमध्ये सुषमा गुप्ता या जीवदानी चाळीत राहणाऱ्या 39 वर्षाच्या महिलेचं नाव सात ठिकाणी आढळून आलं. तिच्या सात ओळखपत्रांच्या आधारे सात मतं टाकण्यात आल्याचा आक्षेप नोंदवला गेला.

आता येऊ घातलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत अशीच मतचोरी झाल्याचं उघड होतय. राहुल गांधी आणि तेजस्वी प्रसाद यांनी सुरू केलेल्या शोध मोहिमेचा फटका निवडणुकीत बसेल हे लक्षात आल्यावर आयोगाने राज्यात स्पेशल इंटेन्सीव्ह रिव्हिजनद्वारे विशेष मत पडताळणी करण्याचा आव आणला आणि चक्क 65 लाख मतदारांची नावं यादीतून वगळली. यात एकेका मतदारसंघात पाच हजारहून अधिक लोकांना मृत दाखवून त्यांना बेदखल केलं. मृत म्हणून ज्यांचा उल्लेख आयोगाने केला अशा काही मतदारांनी राहुल गांधी यांची भेट घेऊन आपला मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात असल्याची बाब त्यांच्यापुढे ठेवली. सर्वोच्च न्यायालयापुढे हे प्रकरण गेल्यावर ज्यांची नावं मतदार यादीतून वगळली ती का वगळण्यात आली, याचं स्पष्टीकरण देण्याचे आदेश न्यायालयाने आयोगाला दिले. याच प्रणालीचा भाग म्हणून नव्याने नाव नोंदवायचं असेल तर शिधा पत्रिका, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र अशा प्रचलित 11 ओळखपत्रांचं वावडं निकालात काढत न्यायालयाने आधार कार्डच्या आधारे नाव नोंदवण्याचे आदेश दिले. ही नोंदणी केवळ पासपोर्टधारकाचीच होईल, असा फतवा काढण्यात अला होता. तो सर्वोच्च न्यायालयाने रद्द करून टाकला. आणि अखेर आधार कार्डच्या आधारे वगळलेल्या मतदारांची नाव यादीत समाविष्ट करून देण्यास भाग पाडलं. मतदार यादीत नावं वाढवण्यासाठीच्या मोहिमेत भाजपचे पदाधिकारीच उतरल्याचे पुरावे पुढे आले. दिल्लीतही 11 हजार मतदारांना मृत दाखवून त्यांची नावं यादीतून वगळण्यात आली. आयोगाच्या भ्रष्ट कारभाराने देशातील सुमारे पाच कोटी मागास आणि सुमारे सहा कोटी इतक्या मुस्लिम मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावला गेला आहे.

या साऱ्यापासून आपला बचाव करण्यासाठी सत्तेने जाब विचारणाऱ्या पत्रकारांचे अधिकार गोठवण्याचा नीच प्रकार सुरू झाला. भ्रष्टाचार करणाऱ्यांविरोधात लिहायचं असेल तर त्या मंत्र्यांची, सचिवांची वा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागणारचा डेटा प्रोटेक्शन ॲक्ट कायदा आणण्याची तयारी मोदी सरकारने सुरू केली आहे. याद्वारे भ्रष्ट कारभार करणाऱ्यांना संरक्षण दिलं जाईल. आयोगाच्या लबाडांना आणि भाजपच्या मतचोरांना उघडं पाडायचं तर ज्यांना ज्यांना मतदानाचा अधिकार आहे, त्यांनी तो अबाधित राखण्यासाठी सजग राहणं अनिवार्य आहे...

**लेखक ज्येष्ठ पत्रकार व ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत**

# स्वातंत्र्यदिनी पहिल्या ध्वजवंदनाचे मानकरी लेफ्ट. कर्नल डी.ए. सुर्वे

भारताला १५ ऑगष्ट १९४७ रोजी ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळाले. देशाचे तुकडे, लुटालूट, जाळपोळ, बलात्कार, प्रचंड मनुष्य हानीनंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अनेक डाग, जखमा, जिव्हारी शल्य यांनी भरलेले होते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमापासूनच क्रूर आक्रमकांची पाळेमुळे उखडणे सुरु झाले होते. भारतभर झालेल्या विविध युद्धांमध्ये मराठा सैन्याचे देदीप्यमान कर्तृत्व तळपत होते.१८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध,ब्रिटिशांविरुद्ध उभे ठाकलेले क्रांतिकारक, अनेक चळवळींचे नेतृत्व करणारे पुढारी यांमध्ये मराठी नेतृत्वाचा सिंहाचा वाटा होता. मराठा साम्राज्य तर( फाळणीपूर्व ) भारतभर पसरले होते. मराठा सैनिक हे शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या अतुलनीय शौर्य, धाडस आणि नीतिमत्ता या त्रिगुणांसाठी प्रसिद्ध होते. स्वातंत्र्याच्या वेळी झालेल्या अतिभीषण नरसंहाराबद्दल लिहितांना एका लेखात लेफ्ट. जनरल विजय ओबेरॉय असे नमूद करतात की मेलेल्या आणि अर्धमेल्या फाळणी निर्वासितांच्या डब्यातून आम्ही अत्यंत भीषण व भितीदायक प्रवास करीत होतो. आम्हाला मारण्यासाठी आसुसलेल्या दंगलखोरांना कांही मोजक्याच शूर मराठा सैनिकांनी, यशस्वीपणे रोखून धरले होते. लेफ्ट. जनरल विजय ओबेरॉय हे सर्वात जुन्या मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंटमध्ये ( यालाच जंगी फलटण म्हटले जात असे ) होते. १५ ऑगष्ट १९४७ रोजी दिल्लीमध्ये, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते लाल किल्ल्याच्या लाहोरी द्वारावर तिरंगा फडकला. पण यासंबंधात मराठी माणसांना अत्यंत अभिमान वाटावा अशी एक घटना दुर्लक्षित राहिली आहे. नेहरूंच्याही अगोदर स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकविण्याचे श्रेय एका मराठी सेनाधिकाऱ्याला म्हणजे लेफ्ट.कर्नल ( जे नंतर मेजर जनरल झाले ) डी.ए. सुर्वे यांना मिळाले आहे.

तर या जंगी फलटणीचे ( मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंट ) वास्तव्य तेव्हा जपानमधील हमादा येथे होते. याचे प्रमुख म्हणून लेफ्ट.कर्नल डी.ए. सुर्वे यांनी सूत्रे स्वीकारली होती. या फलटणीने जपानमध्ये हमादा येथे पहाटे ४.३० वाजता लेफ्ट.कर्नल डी.ए. सुर्वे यांच्या हस्ते भारत आणि पाकिस्तानचे राष्ट्रध्वज फडकावले ! ब्रिटिश राजवट संपुष्टात आल्याचे द्योतक म्हणून ब्रिटिश राष्ट्रध्वज उतरविण्यात आला. सैन्यातील बिगुल पथकाने ' लाईट्स आऊट ' आणि ' रेव्हीएल ' या दोन समर्पक धून वाजवल्या. त्यानंतर शहरातील ३००० हजार मुले आणि पालकांसाठी चहापानाचा कार्यक्रम आणि फटाक्यांची रोषणाई आयोजित केली गेली होती. स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज फडकावणारी मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंट ही सैन्यातील पहिली रेजिमेंट ठरली आणि लेफ्ट.कर्नल डी.ए. सुर्वे हे पहिले मान्यवर ठरले आहेत.नंतरच्या काळात लेफ्ट. जनरल विजय ओबेरॉय यांनी लेफ्ट.कर्नल डी.ए. सुर्वे यांची कन्या दौलत हिच्याशी विवाह केला. हे पहिले ध्वजारोहण आणि तत्कालीन परिस्थितीवर लेफ्ट कर्नल एम.जी.भागवत यांनी Valour Enshrined हे पुस्तक ( प्रकाशक -- ओरिएंट लॉगमन्स, संगम प्रेस, कोथरूड, पुणे ) लिहिले आहे. प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित लेखन आणि लेखकांमुळे खऱ्या गोष्टींचे दस्तावेजीकरण झाले आहे. ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्वाच्या अशा या घटनेमागचे हे मराठी श्रेय आपल्याला अभिमानास्पद आहे.

**- संजयंत सहस्रबुद्धे**

# महाराष्ट्र काँग्रेसमध्ये 'जान' आणणारे प्रदेशाध्यक्ष



## सद्भावना पदयात्रा – शांतता आणि न्यायासाठीचा लढा

महाराष्ट्रातील सौहार्द आणि संविधानाच्या मूल्यांसाठीची 'सद्भावना पदयात्रा' ही चळवळ उभी राहिली. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने महाराष्ट्रात सत्ता सांभाळल्यापासून अवघ्या सहा महिन्यांत राज्यात कायद्याचेराज्य संपल्याचेचित्र निर्माण झाले हे. बीड आणि परभणीमधील हत्या, मुंबईत माजी मंत्र्याची निर्घृण हत्या, प्रसिद्ध व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या जीवघेण्या धमक्या आणि एका कलाकारावर घरात घुसून करण्यात आलेला अमानुष हल्ला – या सर्वघटना कायदा-सुव्यवस्थेची पारदर्शक धुळधाण दर्शवतात. पुण्यातील स्वारगेटसारख्या सार्वजनिक स्थानावर झालेल्या बलात्काराच्या घटनेनेसंपूर्णराज्याच्या संवेदनशीलतेला हादरवून सोडलेआहे.त्याहीपेक्षा अधिक चिंताजनक बाब म्हणजेअनेक भागांत मुस्लिम समाजाविरोधात सामाजिक वा आर्थिक बहिष्काराचे खुले आवाहन करण्यात येत आहे. वर्तमान सरकारमधील अनेक वरिष्ठ नेते, मंत्री धार्मिक आणि जातीय तिरस्कार पसरवणाऱ्या भाषणांद्वारेसामाजिक तेढ वाढवत आहेत, पण त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.पुण्यासारख्या मेट्रो शहरापासून ते धाराशिवसारख्या ग्रामीण भागांपर्यंत अंमली पदार्थांचा बिनधास्त व्यापार सुरू आहे. पोलीस प्रशासन व गृहखात्याची भूमिका निष्क्रिय ठरत आहे. सध्या राज्यात ना कलाकार सुरक्षित आहेत, ना सामान्य नागरिक – सर्वच अराजकाच्या सावटाखाली आहेत. या भीती, तणाव आणि हिंसाचाराच्या काळात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने(MPCC) अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचेप्रभारी श्री. रमेश चेन्निथला आणि महाराष्ट्र काँग्रेसचेअध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली आहे. जाती-धर्माच्या नावावर राज्यात फूट पाडून लूट करण्याच्या राजकीय कटाला तोंड देण्यासाठी 'सद्भावना पदयात्रा' हा ऐतिहासिक उपक्रम काँग्रेसने सुरु केला आहे.राज्यात शांतता प्रस्थापित करणे, सामाजिक ऐक्य वाढवणेआणि संविधानाचेमूल्य पुन्हा अधोरेखित करणेहा या पदयात्रांचा उद्देश म्हणजेआहे. ही पदयात्रा बीड, नागपूर, नाशिक आणि परभणी या संवेदनशील ठिकाणी पार पडली, जिथेसामाजिक सलोख्याला सुरुंग लावण्याचेप्रयत्न सातत्यानेहोत आहेत.बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचेसरपंच श्री. संतोष देशमुख यांची स्थानिक गुंडांकडून निर्घृण हत्या झाली. सत्ताधारी पक्षांच्या छत्रछायेखाली वाढलेल्या गुंडांमुळेबीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील सामाजिक सुरक्षेला धोका पोचून सामाजिक सौहार्दावर मोठा आघात होत आहे. या घटनेनंतर परिसरात तीव्र सामाजिक तणाव आणि असहिष्णुतेचेवातावरण निर्माण झाले.या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने(MPCC) सामाजिक सलोखा आणि शांततेच्या पुनःस्थापनेसाठी ठाम भूमिका घेत, मसाजोग तेबीड दरम्यान ३७ किलोमीटरची 'सद्भावना पदयात्रा' काढली. या यात्रेचा उद्देश जिल्ह्यात पुन्हा ऐक्याचेवातावरण निर्माण करणे आणि द्वेषमूलक राजकारणाला प्रत्युत्तर देणे हा होता.

**देशात आणि महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला सत्तासोपानापासून दूर व्हावे लागले अन राज्यात काँग्रेस पक्षाची जनसेवक आणि देशभक्त प्रतिमा पुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी महाराष्ट्र काँग्रेसचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर आली. संकटालाच संधी मानून जिगरबाज सपकाळ यांनी हे आव्हान मोठ्या जिद्दीने स्वीकारले. त्यांच्या आतापर्यंतच्या ६ महिन्यांच्या कारकिर्दीत त्यांनी विविध कार्यक्रम आणि आंदोलने उभारून सत्ताधारी महायुतीपुढे आव्हान उभे करण्याची किमया लिलया साधली. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे महाराष्ट्र काँग्रेसमध्ये अक्षरशः 'जान' आली आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या स्तुत्य वाटचालीचा संक्षिप्त आढावा घेण्याचे काम या लेखप्रपंचातून केला गेला आहे.**

२०१४ नंतर महाराष्ट्रात सत्तेपासून वंचित राहिलेल्या काँग्रेसला नवसंजीवनी देण्याचे काम सक्षमपणे करणारा प्रदेशाध्यक्ष पक्षाला हवा होता. महाविकास आघाडीचे सरकार जाऊन पुन्हा महायुतीचे सरकार राज्यात आले होते. त्यानंतर सत्तेपासून दूर झालेल्या काँग्रेस पक्षाला राज्यात पुन्हा सक्षम आणि प्रेरक नेतृत्व देणारे व्यक्तिमत्व हर्षवर्धन सपकाळ यांच्या रूपाने लाभले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत राज्यातील महायुती सरकारपुढे संघर्षाचे आव्हान उभे करण्याचे काम प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यशस्वीपणे करत आहेत. सत्ताधाऱ्यांच्या हुकूमशाही आणि जनविरोधी निर्णयाविरुद्ध लढा देणारी आंदोलने आणि चळवळी उभ्या करण्याचे शिवधनुष्य प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी ९ फेब्रुवारी २०२५ ते ३१ जुलै २०२५ या ६ महिन्यांच्या कालावधीत समर्थपणे पेलले आहे. सत्ताधाऱ्यांपुढे समर्थ विरोधीपक्ष म्हणून काँग्रेसची आंदोलने आणि विविध उपक्रम राबवत सपकाळ यांनी आपल्या नेतृत्वाची चमक या कालावधीत दाखवली आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीचे नेतृत्व करणारा राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसची ओळख राज्यात कायम राहिली आहे.

बीड, नागपूर, नाशिक आणि परभणी येथे सामाजिक ऐक्यासाठी 'सद्भावना पदयात्रा', नाशिक व परभणीत 'संविधान बचाव' मोर्चे, राज्यभरात सशस्त्र दलांच्या सन्मानार्थ ४५ हून अधिक 'जय हिंद तिरंगा' रॅलीज, विधानसभा निवडणुकांतील संशयास्पद अनियमिततेविरोधात संपूर्ण महाराष्ट्रात मशाल मोर्चे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर, ठप्प झालेल्या नागरी विकास प्रकल्पांवर आणि सत्ताधाऱ्यांच्या सूडभावनेविरुद्ध आंदोलने, महाराष्ट्र विधीमंडळात मंजूर करण्यात आलेल्या दडपशाहीच्या 'जन सुरक्षा कायद्या'विरोधात तीव्र राज्यव्यापी आंदोलन, पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीने लागू करण्याच्या निर्णयाविरोधात ठाम भूमिका, सामाजिक ध्रुवीकरण टाळण्यासाठी सर्जनशील उपक्रम,
नागरिक समाजाचे प्रतिनिधी व विविध समुदायांशी व्यापक संवाद, तालुका अध्यक्ष निवडीसाठी मुलाखती, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आढावा बैठका, प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांवर सक्रीय उपस्थिती, जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न असे अनेक संघटनात्मक उपक्रम यशस्वीपणे राबवत सपकाळ यांनी आपल्या नेतृत्वाची चुणूक पक्षश्रेष्ठींना दाखवली आहे. या सहा महिन्यांच्या कालावधीत प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी आजपर्यंत ३६ पैकी २२ जिल्ह्यांना भेटी देत राज्य पिंजून काढले आहे. शिवाय त्यांनी २९ संघटनात्मक जिल्ह्यांना भेटी देत पक्षाचा झेंडा यशस्वीपणे फडकवत ठेवला आहे. याच कालावधीत ८ सार्वजनिक सभा घेत प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी महाराष्ट्रात काँग्रेसचे कार्य जनतेत समर्थपणे नेण्याचे काम केले आहे.

### शेतकरी आत्मसन्मान यात्रा – ३ जून २०२५

पंतप्रधान होण्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या झालेल्या यवतमाळ जिल्ह्याला भेट दिली होती. दाभडी गावातील शेतकऱ्यांसोबत 'चाय पेचर्चा' करून शेतकऱ्यांना उत्पादन खर्चअधिक नफा देऊ आणि देशात कृषी क्रांती घडवून आणण्याचे आश्वासन दिलेहोते. आज अकरा वर्षांपासून तेपंतप्रधान आहेत. यापैकी एकाही आश्वसनांची पूर्ती के ली नाही. याकडेलक्ष वेधण्यासाठी काँग्रेसच्यावतीनेयाच गावातून शेतकरी आत्मसन्मान यात्रा काढली. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माणिकराव ठाकरे, खा. प्रतिभा धानोरकर यांच्यासह स्थानिक काँग्रेस नेते, कार्यकर्तेव शेतकरी बांधव स्वयंस्फूर्तीने मोठ्या संख्येनेसामील झाले होते.

### जय हिंद तिरंगा रॅली – एकतेचा, संविधानाचा आणि शौर्याचा सन्मान

पहलगाम (जम्मू-काश्मीर) येथील दहशतवादी हल्ल्याला आपल्या शूर आणि सन्माननीय सशस्त्र दलांनी दिलेल्या प्रत्युत्तरात 'ऑपरेशन सिंदूर' पार पडलं. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसनेराज्यभरात जय हिंद तिरंगा रॅलीचेआवाहन करत आपल्या जवानांना मानवंदना अर्पण केली. ही रॅली म्हणजेके वळ एक कार्यक्रम नव्हे, तर एक जनआंदोलन ठरले — ज्यामध्येकाँग्रेसचेनेते, कार्यकर्तेआणि सामान्य नागरिक भारतीय तिरंग्याचा अभिमान बाळगून रस्त्यावर उतरले. या रॅलीत देशभक्तिपर घोषणांनी आसमंत भरून गेला, सांस्कृतिक कार्यक्रम, देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचेस्मरण, आणि संविधानाचेमूल्य सांगणाऱ्या भाषणांनी समाजात एकतेचा संदेश दिला.या रॅलीत नागरिक मोठ्या आकाराच्या तिरंग्यांसह रस्त्यावर चालत होते, स्वातंत्र्यस्मारकांना अभिवादन करत होते, देशभक्तिपर गीते वाजवली जात होती, आणि संविधानाचे हस्तपुस्तक तसेच राष्ट्रीय प्रतीकांचेवाटप के ले जात होते. महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्या विचारांची आठवण करून देणारे फलकही रॅलीचे आकर्षण ठरले.

### मशाल मोर्चा – निवडणूक अनियमिततेविरोधात काँग्रेस रस्त्यावर

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील अनियमिततेविरोधात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसनेराज्यभरात 'मशाल मोर्चे' काढले. लोकसभेतील विरोधी पक्षनेतेश्री. राहुल गांधी यांनी ७ जून २०२५ रोजी प्रसिद्ध के लेल्या



लेखात निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत आकडेवारीसह शंका उपस्थित केल्या होत्या. मतदार यादीतील अनियमितता, संशयास्पद मतदान टक्केवारीत वाढ, आणि निवडणूक आयोगाची पारदर्शकतेविषयीची भूमिका — हे मुद्दे या आं दोलनात केंद्रस्थानी होते. १२ जून रोजी गडचिरोली येथेकाँग्रेसनेशेतकरी मोर्चा व मशाल आं दोलनाचेआयोजन केले. या आं दोलनात स्वतः हर्षवर्धन सपकाळ, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. कुणाल चौधरी, सौ. प्रतिभा धनोरकर यांसह अनेक नेते सहभागी झाले. काँग्रेसने राज्यभरात सर्वत्र ही आंदोलनेआणि निदर्शने केली,काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे चौकशीची मागणी करत लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

### शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी राज्यव्यापी एल्गार – ३ मार्च२०२५

३ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने(MPCC) शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर राज्यभर निदर्शनेके ली. मुंबईतील टिळक भवनासह सर्व जिल्हा मुख्यालयांवर हे आंदोलन एकाचवेळी पार पडले. या आंदोलनाचा उद्देश शेतकऱ्यांच्या समस्या सरकारसमोर ठळकपणे मांडणेआणि तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी करणेहा होता. आं दोलनात पुढील मुद्द्यां वर विशेष भर देण्यात आला: पीक किमतीतील अन्याय व हमीभावाच्या देयकातील विलंब , पिकविमा योजनेतील गोंधळ व विमा कं पन्यांकडून अद्याप न मिळालेले पैसे, खत व बियाण्यांच्या वाढत्या किमती आणि अपुरी अनुदान मदत, अपुऱ्या सिंचन सुविधा व दुष्काळग्रस्तांना अजूनही न मिळालेले भरपाई अनुदान. या निदर्शनांमध्ये स्थानिक शेतकरी, काँग्रेस किसान सेलचे सदस्य, व जिल्हास्तरीय कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्तसहभाग दिसून आला. शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलेआणि त्वरित उपाययोजनेची मागणी करण्यात आली. काँग्रेसनेपुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी आपली बांधिलकी ठामपणेअधोरेखित केली आहे.

### भाजप सरकारच्या सूडनीतीविरोधात आंदोलन –१७ एप्रिल २०२५

भाजप सरकारच्या सूडनीतीचा निषेध करण्यासाठी काँग्रेसनेमुंबईतील टिळक भवन, तसेच ईडी आणि सीबीआयच्या कार्यालयांसमोर जोरदार निदर्शने केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार विरोधकांचेआवाज दाबण्यासाठी केंद्रीय यंत्रणांचा वापर करत असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. विशेषतः 'नॅशनल हेरॉल्ड' प्रकरणात काँग्रेसच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी आणि श्री. राहुल गांधी यांना लक्ष्य करण्यात आले. ही के वळ राजकीय सूडाची कारवाई असून, तपास यंत्रणांचा उपयोग भाजपविरोधी नेत्यांना त्रास देण्यासाठी केला जात असल्याची टीका आं दोलनात करण्यात आली. राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयांवरही जिल्हा काँग्रेस समित्यांनी आंदोलने केली. विरोधी पक्षाच्या नेत्यांवर खोटेगुन्हे दाखल करून दडपशाही केली जात असल्याचा आरोप करत, भाजपच्या नेत्यांना मात्र वाचवलेजात असल्याचे निदर्शकांनी स्पष्ट केले. काँग्रेसच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांना नंतर पोलिसांनी ताब्यात घेतले. या आंदोलनातून काँग्रेसने स्पष्टपणे सांगितले की, सत्तेचा गैरवापर आणि लोकशाहीची गळचेपी सहन केली जाणार नाही.

### स्थानिक स्वराज्य संस्थांमधील गोंधळाविरोधात काँग्रेसचा संघर्ष

गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नाहीत, याचा निषेध करत काँग्रेस पक्षानेराज्यभर तीव्र आंदोलन छेडले. भाजपनेनिवडणुका लांबवून सत्तेवर आपली मक्तेदारी कायम ठेवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या काळात नगरसेवक व लोकप्रतिनिधींना दरू सारले गेलेअसून, महापालिका व नगरपरिषदांची सर्व अधिकारशक्ती भाजपच्या मंत्र्यां व आमदारांकडेकेंद्रीत झाली आहे. निवडून आलेलेस्थानिक सरकार नसल्यामुळे नागरी प्रशासनात अकार्यक्षमता आणि गैरव्यवस्थापन वाढले आहे, अशी टीका या आंदोलनांतून करण्यात आली. या आंदोलनात राज्यभरातून काँग्रेसचेअनेक ज्येष्ठ नेतेव कार्यकर्तेसहभागी झालेहोते. अनेकांना अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि जनतेच्या प्रतिनिधींना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेसचा संघर्षसुरूच राहील, असा निर्धार या आंदोलनातून व्यक्त करण्यात आला.




### जनसुरक्षा कायद्याविरोधात आंदोलन

१० आणि ११ जुलै२०२५ रोजी महाराष्ट्र विधानसभेत आणि विधान परिषदेत विशेष जनसुरक्षा कायदा (Jan Suraksha Act, 2025) संमत करण्यात आला. विरोधी पक्षांच्या हरकती, आणि नागरी समाज संस्थांनी व्यक्त केलेल्या गंभीर शंका यांना दुर्लक्षित करत हा कायदा पारित झाला. हा कायदा सरकारला 'शहरी नक्षलवाद' किंवा 'डाव्या विचारसरणीच्या उग्रवादाविरोधात' कठोर कारवाई करण्यासाठी अमर्याद अधिकार देतो. एखाद्या संघटनेवर बंदी घालण्यास आणि त्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीला अटक करण्यास प्रशासनाला थेट अधिकार मिळतात.

या कायद्याच्या अस्पष्ट भाषा आणि पोलिसांना दिलेलेप्रचंड अधिकार पाहता, याचा वापर विरोधकांवर कारवाई, dissent चा आवाज दाबण्यासाठी होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षानेविधानमंडळात आणि रस्त्यावरही या कायद्याला ठाम विरोध केला. राज्यभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी शांततापूर्ण निदर्शने केली. काँग्रेसने स्पष्ट केले की, जनतेच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणणाऱ्या अशा कायद्यांचा ती तीव्र विरोध करत राहील. प्रमुख निदर्शने वसई-विरार , शेगाव (बुलढाणा), नागपूर ग्रामीण , जळगाव ग्रामीण, पालघर , छत्रपती संभाजीनगर , पुणेशहर, इचलकरंजी (कोल्हापूर), सोलापूर शहर , गडचिरोली,धाराशिव या जिल्ह्यांत झाली.

### इ.१ली पासून हिंदी भाषा सक्तीविरोधात कठोर भूमिका

महाराष्ट्र शासनानेपहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषा तिसरी सक्तीची भाषा म्हणून शिकवण्याचा आदेश जाहीर केला. शैक्षणिक क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांनी या निर्णयाला विरोध केला. इतक्या लहान वयात तिसऱ्या भाषेची सक्ती ही शिक्षणशास्त्राच्या सिद्धांतांना धरून नाही, असेस्पष्ट मत व्यक्त करण्यात आले. तसेच, हिंदी भाषा लादण्यामागेभाजपचा 'हिंदी - हिंदु - हिंदुस्थान' असा सांस्कृतिक अजेंडा असल्याचा आरोप काँग्रेसने केला. हा दृष्टिकोन देशातील बहुसांस्कृतिकतेचा, भाषिक विविधतेचा आणि लोकशाही मूल्यांचा अपमान करणारा आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने (MPCC) या आदेशाला ठाम विरोध केला आणि जनतेच्या दबावामुळेसरकारला तो आदेश मागे घ्यावा लागला. नवीन आदेश जरी सक्ती काढून टाकल्याचा दावा करत असला, तरी प्रत्यक्षात हिंदीच तिसरी भाषा ठेवली गेली, हेस्पष्ट होते.

### लोकजागर अभियानासोबत जनसंवाद

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचेअध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांनी सेवाग्राम येथे 'लोकजागर अभियान' या नागरी समाज गटाच्या बैठकीला संबोधित केले. या संवादात्मक बैठकीत राज्यभरातील तरुणांशी थेट संवाद साधण्यासाठी 'युवा संवाद' उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत तरुणांच्या प्रश्नांवर, रोजगार, शिक्षण, उद्योजकता आणि लोकशाही मूल्यांवरील जनजागृती यासारख्या मुद्द्यां वर चर्चा झाली. MPCC युवांसोबत थेट संपर्कात येण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'युवा संवाद' कार्यक्रमांचेआयोजन करणार आहे. सेवाग्रामच्या गांधीवादी विचारमूल्यांतून प्रेरणा घेऊन, काँग्रेसने नव्या पिढीपर्यंत लोकशाही विचारसरणी आणि संविधानाच्या मूल्यांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## बीओबी बुद्धिबळ स्पर्धेत झीयान, शिवांश, अथर्व गटविजेते

**मुंबई :** आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या बीओबी ट्रॉफी बुद्धिबळ स्पर्धेमध्ये ८ वर्षाखालील गटात झियान नागरेचाने, ११ वर्षाखालील गटात शिवांश गिरीने आणि १४ वर्षाखालील गटात अथर्व देशमुखने सर्वाधिक ४.५ गुण घेत गटविजेतेपद पटकाविले. फिडे गुणांकित शिवांश गिरीने प्रथम स्थानावर झेप घेतांना निर्णायक पाचव्या फेरीपर्यंत आघाडीवर राहिलेल्या फिडे गुणांकित धैर्य बिजलवानचा (४ गुण) २८ व्या मिनिटाला पराभव केला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा ॲड. प्रकाश लब्धे, ॲड. प्रेमानंद भोसले, डॉ. सचिन शिंदे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. विविध जिल्ह्यातील फिडे गुणांकित सबज्युनियर बुद्धिबळपटूंसह एकूण १६२ खेळाडूंच्या सहभागाने रंगलेल्या स्पर्धेत ९० विजेत्या-उपविजेत्यांना गौरविण्यात आले. आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना सहकार्यीत बँक ऑफ बडोदा चषक बुद्धिबळ स्पर्धेमधील ८ वर्षाखालील गटात झियान नागरेचाने (४.५ गुण) प्रथम, मानवा पारकरने (४ गुण) द्वितीय, ईशी सिंगने (४ गुण) तृतीय, रिहान दुबेने (४ गुण) चौथा, हस्ती शाहने (३.५ गुण) पाचवा, जितेज गाडगेने (३ गुण) सहावा; ११ वर्षाखालील गटात शिवांश गिरीने (४.५ गुण) प्रथम, धैर्य बिजलवानने (४ गुण) द्वितीय, श्लोक पवारने (४ गुण) तृतीय, मृण्मयी डावरेने (४ गुण) चौथा, नैतिक पालकरने (४ गुण) पाचवा, लक्ष परमारने (३.५ गुण) सहावा तर १४ वर्षाखालील गटात अथर्व देशमुखने (४.५ गुण) प्रथम, पुरस्कार जिंकला.



## शिवनेरी रोड रेसमध्ये पंकज, आरुषी, इशांत, डिनेल विजेते



प्रतिनिधी
■ मुंबई

दादर (पूर्व) येथील शिवनेरी सेवा मंडळाने भारतीय स्वातंत्र दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या शिवनेरी रोड रेस २०२५ मध्ये पंकज महातो, आरुषी गुप्ता, इशांत शर्मा, डिनेल अल्मेडा, अनिकेत सोनार, देवश्री पाटील, श्लोक मोंडकर, आरती यादवने अनुक्रमे १६, १४, १२, १० वर्षांखालील वयोगटात प्रथम क्रमांक मिळवून त्या त्या गटाचे विजेतेपद मिळविले. शिवनेरी सेवा मंडळाने दरवर्षी प्रमाणे लहान मुला-मुलींसाठी रोड रेसचे आयोजन करून भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा केला.

१०,१२, १४ व १६ वर्षाखालील मुला-मुलींसाठी घेण्यात आलेल्या या रोड रेस मध्ये ५०० पेक्षा जास्त धावपटूंचा सहभाग लाभला. रोड रेसचे आकर्षण असणाऱ्या १६ वर्षाखालील मुलांच्या गटात पंकज महातो व मुलींच्या गटात आरुषी गुप्ता यांनी पहिला क्रमांक मिळवला. या रोड रेसच्या वेळी रवी करमरकर, फ्रँक अल्फान्सो, सुधाकर राऊळ हे क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दादर येथील स्पिकवेल या इंग्रजी संभाषण शिकविणाऱ्या नामांकित संस्थेचे प्रमुख सचिन मांजरेकर, शिवसेना उपविभाग प्रमुख नितीन पेडणेकर यांनी या रोड रेसला आर्थिक सहाय्य केले. प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांक मिळवऱ्या धावपटूंना आकर्षक चषक, प्रमाणपत्र, रोख रक्कम देऊन त्यांना गौरवण्यात आले.

# रोहित 45 वर्षांचा होईपर्यंत खेळू शकतो!

## योगराज सिंग यांनी हिटमॅनच्या निवृत्तीवर बोलणाऱ्यांना फटकारले

वृत्तसंस्था
■ मोहाली

भारताचा माजी कसोटी आणि टी-२० कर्णधार रोहित शर्माने या दोन्ही फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. पण रोहित वनडेमध्ये खेळताना दिसणार आहे. ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकासाठी रोहितने सरावाला देखील सुरूवात केल्याचं म्हटलं जात आहे.पण रोहित आता ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेनंतर निवृत्त होणार असल्याची चर्चा आहे. यादरम्यान माजी भारतीय क्रिकेटर योगराज सिंग यांनी रोहितसारखा खेळाडू वयाच्या ४५ व्या वर्षांपर्यंत खेळू शकतो ,त्याच्या निवृत्तीसाठी का मागे लागता अशा शब्दांत 'हिटमॅन'च्या निवृत्तीबाबत प्रश्न विचारणाऱ्यांना फटकारले आहे .

युवराज सिंगचे वडिल योगराज पुढे म्हणाले, आपण म्हणायला हवं, रोहित तू अजून ५ वर्षे खेळ, आम्हाला तुझी गरज आहे. तू देशासाठी अधिक योगदान द्यायला हवं. तुझ्या फिटनेसवर आणि सगळ्या गोष्टींवर कठोर परिश्रम कर. त्याच्यासोबत चार जणांना ठेवा आणि रोज सकाळी त्याला १० किमी धावायला सांगा. रोहित असा खेळाडू आहे जर त्याने मनात आणलं ना तर तो वयाच्या ४५व्या वर्षापर्यंत खेळू शकतो.

योगराज यांनी रोहितला स्वतःला फिट ठेवण्यासाठी देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा सल्ला दिला आहे. योगराज म्हणाले, रोहितने देशांतर्गत क्रिकेट खेळलं पाहिजे असं मला वाटतं. तो जितका जास्त खेळेल तितका तो फिट होईल. अंतिम सामन्यात सामनावीर कोण होता? रोहित शर्मा. त्यामुळे लोकांनी तुम्ही फक्त तुम्हाला जे माहित आहे त्याबद्दलच बोललं पाहिजे. जर तुम्हाला त्याचा खेळ आणि फिटनेसबद्दल बोलायचं असेल तर तुम्ही त्या स्तरावर क्रिकेट खेळलं पाहिजे.

भारतीय संघाचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगचे वडील योगराज सिंग यांच्या मते रोहित शर्मा असा खेळाडू आहे, जो वयाच्या ४५व्या वर्षापर्यंत खेळू शकतो. रोहितने भारताकडून चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अखेरचा खेळताना दिसला होता आणि त्याच्या नेतृत्वाखाली संघाने विजेतेपद पटकावले होते. रोहितने न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात ७६ धावा केल्या. या खेळीसाठी रोहितला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.



**रोहितच्या खेळाचा क्लास वेगळाच आहे !**

रोहित वनडे वर्ल्डकप २०२७ पर्यंत खेळेल की नाही याबद्दल क्रिकेट तज्ज्ञांचे वेगवेगळे मत आहे, कारण त्याचा फिटनेस हा एक मोठा मुद्दा आहे. रोहितच्या भविष्याबद्दल काहीही सांगणं घाई करण्यासारखं असेल, परंतु योगराज यांनी रोहित पुढील पाच वर्षे खेळू शकतो असं म्हटलं आहे. रोहित शर्मा हा असा खेळाडू आहे ज्याच्याबद्दल बरेच लोक विनाकारण काहीही बोलतात. तो कसा फलंदाजी करतो ते पहा. एकीकडे त्याची फलंदाजी आणि दुसरीकडे संघातील इतर खेळाडूंची फलंदाजी. एकीकडे त्याची खेळी आणि दुसरीकडे जगातील इतर कोणत्याही फलंदाजाची खेळी. हा रोहितचा क्लास आहे,असे योगराज शेवटी म्हणाले.

## बलात्काराच्या आरोपांमुळे करिअर धोक्यात; टी-20 लीगमध्ये यश दयालवर लागला बॅन



वृत्तसंस्था
■ बंगुळुरु

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा (RCB) स्टार गोलंदाज यश दयालने संघाला पहिल्यांदा आयपीएलचं विजेतेपद पटकावण्यासाठी महत्वाचे योगदान दिले. पण यश दयाल मागील महिन्यांपासून एका वेगळयाच कारणामुळे चर्चेत आहे. यश दयालवर गाजियाबाद आणि जयपुर मधील दोन तरुणींनी लैंगिक छळाचे आरोप लावले आहेत. त्यामुळे उत्तर प्रदेश क्रिकेट असोसिएशन (UPCA) ने यश दयालला यूपी टी२० लीगमध्ये खेळण्यापासून प्रतिबंधित केले आहे.

यश दयालवर गाजियाबादमध्ये लग्नाचं आमिष दाखवून महिलेचं शोषण केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी यश दयालला अलाहाबाद उच्च न्यायालयाने अटकेपासून संरक्षण दिले आहे. पण जयपूर हायकोर्टाने त्याला सुरक्षा देण्यापासून नकार दिला. कारण या प्रकरणी एका अल्पवयीन मुलीचा समावेश आहे. त्यामुळे आरसीबीच्या या स्टार खेळाडूला कधीही अटक केली जाऊ शकते. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ ऑगस्ट रोजी होईल.

२७ वर्षांच्या यश दयालला यूपी टी२० लीगमध्ये गोरखपुर लायन्स सोबत खेळण्यासाठी उत्सुक होता. त्याला संघाने ७ लाख रुपयांना खरेदी केले होते. तो सध्या देशातील सर्वात वेगवान गोलंदाजांपैकी एक आहे. आरसीबीसाठी मॅच विनिंग खेळी करणाऱ्या यशवर सर्वांची नजर होती. पण त्याच्यावर लावण्यात आलेल्या लैंगिक छळाच्या आरोप आणि हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने यश दयालवर यूपी टी२० लीगमध्ये बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती.

## अंधेरीच्या स्वप्नाक्षय मंडळाची दहीहंडी ओम साई गोविंदा पथकाने फोडली

प्रतिनिधी
■ मुंबई

अंधेरी पश्चिम येथील सातबंगला मॉडेल टाउन येथे स्वप्नाक्षय मित्र मंडळ सार्वजनिक दहीहंडी उत्सव मंडळातर्फे दहिकाला उत्सव जल्लोषात साजरा केला. दहीहंडी फोडण्यासाठी 25 मंडळानी भाग घेतला. अखेर ही हंडीओम साई गोविंदा पथक जोसेफ पटेल वाडी, सातबंगला अंधेरी पश्चिम, या मंडळाने फोडण्याचा मान पटकवला. व रोख रुपये व चषक मंडळाने मिळवले.

सदर जयंती उत्सवात आमदार हारून खान , राजेश शेट्टे उप विभागप्रमुख, योगेश गोरे शिवसेना युवा विस्तारक व स्वप्नील शिवेकर युवा विभाग अधिकारी मेघना काकडे महिला संघटिका उपस्थित होते मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक देवेंद्र बाळा आंबेरकर, संजीव बिल्लू कल्ले, राजेश ढेरे अध्यक्ष,दिनेश गवलांनी, सुरेश नागपाल, अशोक मोरे, सोहम आंबेरकर सुदर्शन जाधव, नवीन चौधरी विकी गुप्ता अमित पऱ्हाड, गणेश लोणकर अंकुश पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भाग घेतला



## मध्य रेल्वेने जुलै-2025 मध्ये दररोज 193 मेल/एक्सप्रेस गाड्या चालवल्या

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने जुलै-२०२५ मध्ये एकूण ५९८३ मेल आणि एक्सप्रेस गाड्या (५७७० मेल आणि एक्सप्रेस गाड्या आणि २१३ विशेष गाड्या) चालवल्या, तर जुलै-२०२४ मध्ये एकूण ५७४२ मेल आणि एक्सप्रेस गाड्या (५५८५ मेल आणि एक्सप्रेस गाड्या आणि १५७ विशेष गाड्यांसह) चालवल्या होत्या, ज्यामध्ये आता 7% वाढ झालेली दिसून आली आहे.याचा अर्थ जुलै २०२५ मध्ये दररोज सरासरी १९३ गाड्या चालवल्या गेल्या, ज्यामुळे जुलै २०२४ च्या तुलनेत दररोज ८ अतिरिक्त गाड्यांची वाढ झाली आहे.मध्य रेल्वेने चालवलेल्या एकूण गाड्यांमध्ये जुलै २०२५ मध्ये २१३ विशेष गाड्या चालवल्या, तर जुलै २०२४ मध्ये १५७ गाड्या चालवल्या, ज्यामध्ये ३५% वाढ झाली आहे.

दरम्यान, उपनगरीय सेवांमध्ये वर्षानुवर्षे लक्षणीय सुधारणा दिसून आली, सतत पाऊस पडत असतानाही वेळेवर पोहोचण्याचे प्रमाण ९१% वरून ९२% पर्यंत वाढले आहे. असे मध्य रेल्वेने म्हटले आहे.

रेल्वे सेवा वाढवण्याव्यतिरिक्त, मुंबई विभागाने गाड्यांच्या वक्तशीरपणातही लक्षणीय प्रगती केली आहे, विशेषतः दररोजच्या प्रचंड ट्रेन वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर वक्तशीरपणा सांभाळणे म्हणजे एक परीचालनाचा महत्त्वाचा निकष आहे. एप्रिल ते जुलै-२०२५ या कालावधीत, मेल/एक्सप्रेस गाड्यांचे वक्तशीरपणा ५७% पर्यंत वाढले, जे गेल्या वर्षी याच कालावधीच्या तुलनेत ५१% होता. त्याचप्रमाणे, एप्रिल ते जुलै-२०२५ या कालावधीत उपनगरीय गाड्यांचा वक्तशीरपणा ९३% पर्यंत पोहचला आहे, जे गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील ९२% पेक्षा किंचित जास्त आहे. तर जुलै-२०२५ मध्येच मेल/एक्सप्रेस गाड्यांनी वेळेवर धावण्याचे प्रमाण ५६% नोंदवले गेले आहे, जे जुलै-२०२४ मध्ये ४९% होते.

या यशांमुळे मुंबई विभागाच्या सततच्या प्रयत्नांना आणि धोरणात्मक नियोजनाला अधोरेखित केले जाते ज्याचा उद्देश प्रवाशांचा जास्त भार कार्यक्षमतेने व्यवस्थापित करणे आणि सेवांची विश्वासार्हता आणि वेळेवर पोहोचणे सुधारणे आहे. संचालनातील उत्कृष्टतेवर सतत लक्ष केंद्रित करून, मध्य रेल्वेचा मुंबई विभाग अधिक प्रतिसादात्मकतेने आणि वाढीव सेवा गुणवत्तेसह जनतेची सेवा करण्यासाठी वचनबद्ध आहे. असेही म्हटले आहे.

# आता आपल्याला 'आत्मनिर्भरतेची दहीहंडी' उभारायचीय!

## शिवराज प्रतिष्ठानच्या दहीहंडीत मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ मुंबई

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत' हा नारा दिलाय. आता आपल्याला 'आत्मनिर्भरतेची दहीहंडी' उभारायची आहे आणि विकासाचे मनोरे रचून सामान्य माणसापर्यंत हंडीतील प्रसाद पोचवायचा आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आ. प्रविण दरेकर आयोजक असलेल्या शिवराज प्रतिष्ठानच्या दहीहंडीवेळी केले.

दहिसर पूर्व येथे भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर आयोजक असलेल्या शिवराज प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दहीहंडीचे आयोजन केले जाते. उंचउंच मनोरे रचून गोविंदा पथके येथे सलामी देतात. यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बोरिवलीतील सुमित घाग गोविंदा पथकाला सलामी देण्याचा मान मिळाला.

यावेळी गोविंदा पथकांना संबोधित करताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत माता कि जय, छत्रपती शिवाजी महाराज कि जय, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज कि जय, जय भवानी जय शिवाजी, जय श्रीराम असा जयघोष केला. ते म्हणाले कि, मी दरवर्षी येथे येतो. प्रत्येक वर्षी मला आधीपेक्षा जास्त उत्साह पहायला मिळतो. सकाळपासून पाऊस सुरु आहे. अनेकांना वाटत होते पावसामध्ये दहीहंडीचा उत्सव कसा होईल. पण पावसापेक्षा जास्त गोविंदांचा उत्साह आहे. त्यांच्या उत्साहाला पाऊस काहीच करू शकत नाही हे पहायला मिळाले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आत्मनिर्भर भारत' हा नारा दिलाय. आता आपल्याला 'आत्मनिर्भरतेची दहीहंडी' उभारायची आहे आणि विकासाचे मनोरे रचून सामान्य माणसापर्यंत हंडीतील प्रसाद पोचवायचा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले कि, आपल्या भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानात घुसून पाकिस्तानची पापाची हंडी फोडली आहे. आता नवीन भारताच्या निर्मितीकडे जायचे आहे. त्यात सर्व गोविंदांचा महत्वाचा सहभाग असणार असल्याचे सांगत सर्वांना दहीहंडीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विधानपरिषद आमदार निरंजन डावखरे, मुंबई भाजपा उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, डॉ. यश प्रविण दरेकर, मंडल अध्यक्ष अमित उतेकर, मोतीभाई देसाई, आदित्य दरेकर, कृष्णा दरेकर, गणेश खणकर, संजय घाडी, आरपीआयचे रमेश गायकवाड यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**लाडक्या बहिणींनी बांधली राखी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोविंदांसह 'दहीहंडी उत्सवा'मध्ये सहभागी झाले असता लाडक्या बहिणींनी त्यांना राखी बांधली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रेम आणि जिव्हाळ्यासाठी सर्व लाडक्या बहिणींचे आभार मानले.

## उत्तर मुंबईत उत्साहात साजरा झाला गोविंदा उत्सव

### मानवी मनोऱ्यांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी
■ मुंबई

उत्तर मुंबईत "आला रे आला, गोविंदा आला" अशा घोषणांनी दहीहंडी उत्सवाचा जल्लोष दुमदुमून गेला. हजारो गोविंदा पथकांनी उत्साहात मानवी मनोरे रचून सण साजरा केला. मलाड, बोरीवली, दहिसर आणि मागाठाणे मतदारसंघांमध्ये सांस्कृतिक विविधतेने आणि सामुदायिक सहभागाने हजारो लोकांनी हजेरी लावली.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी अनेक दहीहंडी सोहळ्यांना हजेरी लावून शुभेच्छा दिल्या – "जय श्रीकृष्ण, सर्वांना दहीहंडीच्या हार्दिक शुभेच्छा" – आणि धाडसी गोविंदांचा सन्मान केला. यावेळी उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, आणि जिल्हा अध्यक्ष बाळा तावडे हेही उपस्थित होते.

"दहीहंडी हा परंपरा, एकता आणि शौर्याचा उत्सव आहे. विश्वास आणि टीमवर्कवर उभे राहिलेले हे मानवी मनोरे आपल्या सामूहिक आकांक्षा दर्शवतात. खरी ताकद ही पडल्यावर पुन्हा उभे राहण्यात आहे आणि आपल्या तरुणांचा उत्साह माझा अभिमान वाढवतो." असे केंद्रीय मंत्री पीयूष गोयल म्हणाले.



## घाटकोपर भूषण पुरस्कार प्रदान सोहळा मोठ्या जल्लोषात संपन्न



प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर प्रगती मंचतर्फे वर्धापन दिनाचे औचित्य साधत देण्यात येणारा घाटकोपर भूषण पुरस्कार सोहळा शुक्रवार दि 15 रोजी मोठ्या जल्लोषात घाटकोपरच्या परमकेशव बाग हॉल मध्ये पार पडला. यंदाच्या वर्षी आध्यात्म क्षेत्रात भिक्खू विरत्न महाथेरो, आरोग्य क्षेत्रात नितीन मणियार, कला क्षेत्रात गायक मयूर सुकाळे, शिक्षण क्षेत्रात सरस्वती विद्यालयाच्या संचालिका दीपाली पवार, आणि क्रीडा क्षेत्रात जिने नुकताच राज्यातील सर्वोच्च शिव छत्रपती पुरस्कार पटकावला त्या कबड्डीपट्टू पूजा यादव यांना घाटकोपर भूषण पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. घाटकोपर प्रगती मंचचा यंदा 11 वा वर्धापन दिन होता. घाटकोपर सह राज्यात विविध सामाजिक कार्य, जनतेच्या हिताची आंदोलने करण्यात येतात. घाटकोपर मधील सर्व सामान्य नागरिकांनी एकत्र येऊन या मंचची निर्मिती केली. आणि दीडशे पेक्षा जास्त तरुणांनी एकत्र येत गेले 11 वर्ष या ग्रुप च्या माध्यमातून सामाजिक कार्य सुरू ठेवले आहे. तर गेली तीन वर्ष या वर्धापन दिनानिम्मित घाटकोपर मध्ये विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या मान्यवरांना घाटकोपर भूषण पुरस्कार प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात येतो. हा पुरस्कार प्राप्त केलेल्या पाच ही मान्यवरानी घाटकोपर प्रगती मंच चे आभार मानले. वर्धापन दिनानिम्मित मंच मधील सदस्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सांस्कृतिक कार्यक्रम मधून आपली कला सादर केली. तसेच या वेळी महिलांसाठी हळदीकुंकू समारंभचे आयोजन ही करण्यात आले होते. या सोहळ्याला घाटकोपर मधील सामाजिक, राजकीय आणि सर्व क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहनचालकांसह,प्रवाशांना दुसऱ्या दिवशीही दुर्गंधीचा त्रास, वाहतुकीची कोंडी

प्रतिनिधी
■ मुंबई

कांदिवली पश्चिमेला न्यु लिंक रोडवरील मुख्य भूमिगत मल निसारण वाहिनीचे घाण पाणी दोन दिवसांपासून पासून मोठ्या प्रमाणात रस्त्यावरून वाहत आहे

पालिकेच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी सकाळी पहाणी केली. गळतीच्या ठिकाणी लोखंडी बेरिकेड्स ठेवले. रस्त्यावर पाणी साचू नये म्हणून पंप लावले. मोठ्या प्रमाणात घाण पाणी मुख्य मार्गांवरून वाहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन वाहन चालकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कांदिवली पश्चिमेला न्यु रोडवरती कांदिवली वेस्ट मेट्रो स्टेशनं आहे. न्यु लिंक रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. मेट्रो स्टेशनच्या खालील मार्गांवरील भूमिगत मल निसारण वाहिनीचे घाण पाणी पहाटे पासून मोठ्या प्रमाणात रस्त्यावरून वाहू लागले. पाण्याचे प्रमाण जास्तच असल्याने दुर्गंधी पसरली तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याने, पालिकेला तक्रार करण्यात आली. पालिकेचे संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी पहाणी केली. मोठ्या प्रमाणात घाण पाणी बाहेर पडण्याच्या ठिकाणी लोखंडी बेरिकेड्स लावले आहेत.सिग्नल सुटताच मालाड कडे जाणाऱ्या वाहनांच्या गतीला रस्त्यावरून वाहणाऱ्या पाण्यामुळे तसेच लावण्यात आलेल्या लोखंडी बेरिकेड्स मुळे ब्रेक लागतो. दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करतच वाहन चालक तसेच प्रवासी मार्गस्थ होतात. बाहेर पडणाऱ्या पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने तसेच पाण्याचा निचरा योग्य रित्या होत नसल्याने पालिकेच्या अधिकाऱ्यांनी पंप लावून, पाण्याच्या निचारा करणाऱ्या वाहिनीचे काम हाती घेतले.मात्र भूमिगत मल निसारण वाहिनी दूधडी भरून वाहत आहे. यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना सद्या नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुसळधार पाऊस सुरु झाला की, नेहमीच याचं भागातून रस्त्यातून पाणी बाहेर पडते. गेले चार पाच आठवड्यापासून हि समस्या आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहन चालकांसह प्रवाशांना तसेच बाजूलाच बस थांबा आहे.बस प्रवाशांना नाक दाबूनच बस थांब्यावर थांबावे लागते असे स्थानिक नागरिकांनी सांगितले.





**मुंबई:** शिवसेना शाखा क्रमांक २०६ च्या वतीने स्वर्गीय निवांत घेरडे चौक शिवडी नाका येथे सलग १४ व्या वर्षी निष्ठावंतांच्या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत एकूण १७१ गोविंदा पथकांनी उपस्थिती दर्शवली. या दहीकाला उत्सवाचे आयोजन माजी शिवसेना नगरसेवक सचिन पडवळ व शाखाप्रमुख हनुमंत बैजू हिंदोळे यांनी केले होते. शिवसेना विभागप्रमुख आशिष चेंबूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गोविंदा पथकांना रोख पारितोषिक व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.



**मुंबई :** शिवसेना दक्षिण मुंबई विभाग संघटक विजय वाडकर यांनी भुलेश्वर येथे भव्य दिव्य दहीहंडीचे आयोजन केले होते. या दहीहंडी मध्ये लहान गोविंदाला त्यांनी रोख रक्कम आणि सन्मान चिन्ह दिले. यावेळी त्यांच्या सोबत इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**मुंबई : मुंबई - शिवसेना कुलाबा विधानसभा संघटक दीपक पवार यांच्या दहीहंडी उत्सव कुलाबा येथे जल्लोषात पार पडला. यावेळी शिवसेना मुंबादेवी विधानसभा संघटक रुपेश पाटील, प्रिया रुपेश पाटील, माजी नगरसेविका सुजाता सानप, माजी नगरसेवक गणेश सानप आणि इतर सर्व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते**





## सुविचार

आपले काम जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे करणे हाच सर्व सन्मानांचा मार्ग आहे.

# माझ्या संग्रहातील कृष्ण वैभव!

लेखक
मकरंद करंदीकर

भगवान श्रीकृष्ण हा आधुनिक तत्वज्ञानाचा मूळ पाया घालणारा आद्य तत्ववेत्ता ! अगदी स्वतःचा मामा असला तरी त्याच्या जुलुमी राजवटीविरुद्ध बंड करणारा, आपल्या राज्यातील बालकांना उपाशी ठेवून दुसरीकडे दूध, दही, लोणी यांच्या विक्रीविरोधात गवळणींचा रस्ता रोको करणारा, जहरी वृत्तीच्या आणि यमुनेचा डोह अडवून बसलेल्या कालियाचे मर्दन करणारा, धर्म ( चांगुलपणा, भलेपणा ) रक्षणासाठी युद्ध करतांना आप्तस्वकीयांविरुद्ध उभा राहणारा अशा असंख्य प्रसंगांतून लोकांसमोर आदर्श ठेवणारा हा परमेश्वरी अवतार !! श्रीकृष्णाने या सर्व गोष्टी परिस्थितीनुरूप आणि त्याच्या देवत्वाला साजेल अशा पद्धतीने केल्या. जगातील आद्य अशा हिंदू धर्माचा वैचारिक पाया त्याने रचला.

उद्या साजऱ्या होणाऱ्या श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या मंगल पर्वाच्या निमित्ताने माझ्या संग्रहातील हे कृष्ण वैभव आपल्या सर्वांपुढे मांडत आहे. सोबतचे सर्व फोटो अवश्य पाहावेत. यातील दिवे आणि अन्य वस्तू क्रमवार माहितीसह ---





**१) कालिया मर्दन दीप --** नागाच्या कंठात, पोटात विष असते असा पूर्वी समज होता. या विषावर तुम्ही विजय मिळविला तर तेच विष तुम्हाला तारक ठरते. आज शास्त्रीय संशोधनामध्ये नागाचे विष अनेक गोष्टींवर उतारा म्हणून उपकारक ठरते आहे. सोबतच्या दिव्यामध्ये कालियामर्दनानंतर निवांत झालेला श्रीकृष्ण, नागाच्या फण्यावर देहुडाचरण स्थितीमध्ये बांसरी वादनात मग्न असलेला दिसतो. नागाच्या " विषारी " पोटाशी सर्वांना प्रकाश देणारा दिवा पाहायला मिळतो.

**२) सप्तसूर कृष्णचिन्ह --** भगवान श्रीकृष्ण म्हणजे मानवी शरीरातील १६ सहस्त्र नाडींवर ( नारींवर नव्हे ) हुकूमत असलेला योगीराज, नृत्य, सूर आणि स्वरराज्य यावर ज्याचे अधिपत्य होते असा सकलकला शिरोमणी ! चित्रकार, गीतकार, साहित्यिक, तत्वचिंतक, योगीपुरुष अशा अनेकांना हजारो वर्षे या श्रीकृष्णाने नवनिर्मितीसाठी उद्युक्त केले आहे. सोबतच्या कृष्णचिन्हामध्ये दोन हातात धरलेली मुरली आणि त्याखाली ७ वेगवेगळ्या लांबीच्या साखळ्यांना ७ वेगवेगळ्या आकाराचे घुंगुर आहेत. अधिक लांबीच्या साखळीचा जाड घुंगुर खर्ज किंवा खालच्या "सा" साठी तर एकेक स्वर चढत थेट कृष्णापर्यंत पोचता येते. पण त्याआधी देहरूपी मुरलीच्या ६ छिद्रांतून षडरिपु बाहेर जायला हवेत.

**३) सुरमयी समई --** ही माझ्या संग्रहातील पितळी समई अगदी वेगळीच आहे. काही अध्यात्मिक तत्वे सांगणारी अतिशय देखणी अशी ही समई आहे. ६ छिद्रांची मुरली ही या समईचा आधार आहे. देहरूपी मुरलीच्या ६ छिद्रां ( रंध्रांमधून ) मधून षड्रिपू निघून गेल्यावर त्याला ईश्वर प्राप्ती होते. श्रीकृष्ण सर्वात मोठा योगीराज आहे. योगशास्त्रानुसार शरीरात कुंडलिनी शक्तीची एकूण ७ केंद्रे आहेत त्यापैकी सातवे केंद्र, सहस्त्रचक्र हे सर्वात वर आणि ईश्वरासमीप नेणारे आहे. मुरलीतील छिद्रांची रचना हेच दर्शविते. मुरलीचे ७ वे छिद्र हे श्रीकृष्णाच्या पायांच्या जवळ आहे. तर या समईच्या ९ वाती या नवरसांचे प्रतिक आहेत. या नवरसांचा स्वामी मुरलीधर श्रीकृष्ण हा मध्यभागी देहुडाचरण स्थितीत उभा आहे. एरवी श्रीकृष्णासोबत गाय किंवा शेष नाग पाहायला मिळतो. पण येथे श्रीकृष्णाच्या पायाशी, सौन्दर्याचे मूर्तिमंत प्रतिक असलेला मोर उभा आहे.

**४) पुणेरी पगडीतील बाळकृष्ण --** माझ्या संग्रहात रांगणाऱ्या बाळकृष्णाची, डोक्यावर चक्क पुणेरी पगडी असलेली मूर्ती आहे. एरवी आपण उजव्या हातात लोण्याचा गोळा ( किंवा लाडू ) आणि डोक्यावर मुकुट असलेली अशी मूर्ती पाहतो. पण एखादा कलाकार किती वेगळा विचार करू शकतो ? समजा हा कृष्ण मूळचा पुण्यातला असता तर त्याने बालवयातसुद्धा पगडी आणि तीही पुणेरी पगडीच घातली असती. या कलाकाराने आपली कल्पना या मूर्तीच्या रूपाने प्रत्यक्षात उतरवली आहे. ही वेगळी मूर्ती पाहायला छानच वाटते. पण खरंच भगवान श्रीकृष्ण पुण्यात राहत असते तर ? कदाचित त्यांचा पुण्यातील पत्ता असाही दिला गेला असता .....श्री श्रीकृष्ण वसुदेव यादव , १०८ , जुना मुरलीधर वाडा , गौळी आळी, यादव पेठ, पुणे.




**५) गोमुखी कृष्ण जलपात्र --** आपल्या धार्मिक कार्यांमध्ये पूर्वापार तांब्याच्या उपकरणांना खूप महत्व आहे. तांब्याच्या भांड्यामध्ये साठविलेल्या पाण्यामध्ये तांबे सौम्य स्वरूपात विरघळते. तसेच हा धातू वीज आणि उष्णतेचा शीघ्रवाहक आहे. त्यामुळे तो वातावरणातील चांगली / सकारात्मक ऊर्जा सहज शोषुन घेतो. त्याचाही आतील पाण्यावर चांगला परिणाम होतो. असे पाणी प्यायल्याचा आपल्या शरीराला फायदा होतो अशी ठाम समजूत आहे. यामुळेच हल्ली बाजारात, पिण्याच्या पाण्यासाठी तांब्यापासून बनविलेली विविध प्रकारची भांडी उपलब्ध आहेत. माझ्याकडे तांब्याचे थोडे वेगळे असे पात्र आहे. या पात्राला असलेला नळ हा गोमुखाच्या आकाराचा आहे. आपल्या अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये गोमुखातून सतत पडणारे पाणी आपण पाहतो. माझ्याकडील तांब्याच्या पात्राच्या गोमुखाचा नळ मात्र उघडता - बंद करता येतो. मध्यभागी राधेसह मुरलीधर कृष्ण आहे. झाकणावर छोटी गायीची मूर्ती आहे. हे भांडे शुद्ध तांब्याचे आहे. पाणी पिण्यासाठी उपयुक्त असलेले हे पात्र , शोभेसाठीही छानच आहे.

**६) वसुदेव वासुदेव दीप --** नुकत्याच जन्मलेल्या वासुदेवाला, त्याचा बंदिवान पिता वसुदेव टोपलीत घालून यमुनापार नेताना या दिव्यामध्ये पाहायला मिळतो. टोपलीत बाळकृष्ण पिंपळपानावर पायाचा अंगठा चोखत पहुडलेला आहे. त्याच्यावर ७ मुखी शेषनागाने छत्र धरले असून त्यावरील ७ वातींच्या समईतून प्रकाश विखुरला आहे. ( एका कथेनुसार, नागफणीवरील मण्याच्या प्रकाशात हा प्रवास झाला होता.) यातील वसुदेवाचा धीरगंभीर चेहेरा, टोपली धरलेले त्याचे बलदंड हात, पित्यावरील पूर्ण विश्वासाने टोपलीत पहुडलेला वासुदेव, वरती फणा धरणाऱ्या शेषाने वसुदेवाभोवती संरक्षणासाठी घातलेले वेटोळे यासर्व गोष्टी, हा दिवा घडविणाऱ्या कलाकाराच्या रसिकतेची साक्ष देणाऱ्या आहेत.

# वडापाव, फ्रॅक्चर, आणि दही हंडी!

लेखक
प्रशांत कुळकर्णी

चारकोप सेक्टर बारा मध्ये राहाणारा लहानसा मनोज आपल्या मुठीत शंभर रुपयांची नोट घेऊन दुकानात जाण्यासाठी निघाला होता . मागे कुणीतरी घंटी वाजवत सायकलवर येत होते. सायकल जसजशी जवळ येऊ लागली तसतशी सायकलची घंटा जास्तच मोठ्याने खणखण करायली लागली. नक्कीच आपल्या पाचवीच्या वर्गातील बबन असणार, सायकलची घंटी बबन शिवाय नॉनस्टॉप कोणीही वाजवत नाही! मनोजचा अंदाज अगदी खरा ठरला.

“आज तर सुट्टी आहे सकाळ सकाळी कुठे निघालास मित्रा?”

“आईने दुकानातून सामान आणायला पाठवले आहे, बटाटे,कांदे, कोथीबीर, दुधाची थैली!”

“अरे पण दानवे काकांचे दुकान तर तुझ्या घराच्या मागेच आहे! एवढ्या लांबून का जातो आहेस ?” बबनने विचारले

“अरे मागच्या गल्लीत तो डॉगी बसलेला असतो जाडाजुडा! मला जाम भिती वाटते त्याची! मनोजने अगदी खरंखुरं सांगितले.

“अरे मन्या चल बघू मी तुझ्याबरोबर येतो ,मी तुला शिकवतो कुत्र्यांच्या जवळून न घाबरता कसे जायचे ते!”

आपला मित्र आपल्या सोबत आहे हे ऐकून मनोजला आनंद झाला. दानवे काकांच्या दुकानातून सामान घेऊन दोघे मित्र निघाले. जाडजूड कुत्रा जमीनीवर आपली मान सपाट पसरुन शांत बसला होता. बबन एका हाताने हॅंडल धरुन सायकल पुढे घेऊन आला.

“कुत्रा माणसाला मुद्दामहून इजा कधीही करत नाही, फक्त माणसाने कुत्र्याकडे न पाहता, न घाबरता शांतपणे चालायचे ,आपण घाबरलो तर धडपडतो,अडखळतो,त्यामुळे कुत्रा सुध्दा घाबरतो, आपल्यावर भुंकतो,अंगावर येतो, आपल्याकडे बघून तो भुकांयला जरी लागला तरी आपण त्याच्याकडे बघायचे नाही, म्हणजे तो सुध्दा काहीच करत नाही!”

“बबन तुझ्यामुळे माझ्या मनातील कुत्र्याची भिती कमी झाली! तु असा चारपाच वेळा माझ्या सोबत राहिलास ना तर मी कुठल्याही कुत्र्यांना घाबरणार नाही!”

“मनोज मग रोज रात्री नऊ वाजता भेट , आपण दहीहंडीचा सराव बघायला जाऊ, येशील का ? आजच भेट, मी सायकल घेऊन येईन! आपण रोज वेगवेगळ्या ठिकाणी जायचे,आम्हाला गोविंदा पथकात घ्या म्हणून हट्ट करायचा, रोज कुठे ना कुठे सराव सुरु असतो. आपण गोविंदा पथकांच्या अध्यक्षाना शोधायचे, आम्हाला दहीहंडी फोडण्याच्या सरावात घ्या, असे म्हणत राहायचे.आपण वयाने लहान म्हणून नाही घेतले गोविंदा पथकामध्ये तर काय झाले? आपल्याला रोज कुठे वडापाव, तर कुठे समोसा पाव तर खायला मिळेल! वडापाव खाऊन आपण मस्त एन्जॉय करायचे! हंडी फोडण्यासाठी गोविंदा कसे थर लावतात,कसे रिंगण करुन उभे राहतात, कसे एकमेकांना सांभाळून घेतात? त्याची मजा तर पाहायला मिळेल!”

बबनचे बोलणे ऐकून मनोज जाम खुश झाला, आणि म्हणाला,

“बबन अरे आपल्या शाळेत सहावी, सातवी इयत्तेत शिकणारे आपले मित्र सुध्दा आपल्या सोसायटीत राहातात, त्यांना सुध्दा सोबत घेऊन आलो तर ? सगळ्यांकडे सायकली आहेत. सगळेजण सराव बघायला निघाले तर, काय बिशाद आहे आपल्या दादा ताईंची आपल्या विरोधात बोलण्याची ? आपले आईबाबा सुध्दा आपल्याला गोविंदाचा सराव पाहायला जाण्यासाठी हसत हसत परवानगी देतील!”

“अरे वा मनोज खरोखरच हुशारच आहेस तू ! पण आपल्याला गोविंदा पथकामध्ये घेतले तर भारी मजा येईल नाही का ? दहीहंडीच्या कार्यक्रमात आपल्याला चमकणारी , सुंदर सोनेरी, पदके मिळतील, आपल्या हातात ट्रॉफी घेतलेले आपले फोटो बघून आपले आईबाबा आपले कौतुक करतील!”

“हो रे मित्रा बबन्या पण आपले वय आड येते त्याचे काय करायचे ? माझी कॉलेजमध्ये शिकणारी ताई म्हणते, चौदा वर्षापेक्षा कमी वय असलेल्या लहान मुलांना दहीहंडी फोडण्यासाठी परवानगी नाही, त्यांना खालच्या वरच्या कुठल्याही थरांत घेण्यासाठी परवानगी नाही म्हणजे नाही ! ऐकून बबनचा चेहरा कसा नुसा झाला, रात्री भेटायचे सांगून तो निघून गेला. त्यानंतर कितीतरी दिवस रात्री मनोज, बबन, आणि त्यांचे मित्रमंडळ सायकलवरून हसतखेळत एकत्र जाताना आणि आनंदाने घरी परत येताना दिसत होते. शेवटी दहीहंडीचा दिवस पार पडला. मुंबई शहरामध्ये सर्व ठिकाणी मोठमोठ्या गोविंदा पथकांनी नऊ ,दहा, असे उंचच उंच थर लावून आकाशाला हात लावून दहीहंडी फोडण्याचा पराक्रम करून दाखवला. संध्याकाळी मनोजची मोठी बहीण सुलभा टिव्हीवर मुंबईतील दहीहंडीचे विविध ठिकाणाचे कार्यक्रम पाहात होती, कार्यक्रम बघता बघता ती अचानक जोरात ओरडली “ आई बाबा तो बघा आपला मनोज, मनोजचे मित्र विनोद, जगन, बबन, सगळ्यांना बक्षीसे आणि ट्रॉफी देऊन पालकमंत्री त्यांचे कौतुक करत आहेत! आईबाबा मनोज खोटे बोलला त्याला ट्रॉफी मिळाली म्हणजे त्यांने थरावर थर चढून हंडी फोडली ! आणि बाबा ते बघा ,आपला मनोज आणि बबन कुणाला तरी सायकलवर बसवून कुठे तरी नेत आहेत, त्यांच्या हाताला पट्टा बांधला आहे म्हणजे कुणाचा तरी हात फ्रॅक्चर झाला आहे , बाबा मनोज खोटं बोलला! मनोज खोटारडा आहे!”



“सुलभा अगं तू कार्यक्रम तरी नीट पाहा ,काळजीपूर्वक ऐक टिव्हीवर काय सांगत आहेत ते!”

“अंध मुलांच्या गोविंदा पथकाने आपल्या विभागात पाच थर लावून कितीतरी दहीहंड्या शिस्तबद्ध रितीने एकामागून एक धडाकेबाज पणे फोडल्या. अनेक बक्षीसे मिळवली. अंध मुलांच्या गोविंदा पथकाला ,सेक्टर बाराच्या मनोज, बबन, विनोद, सलीम, हेमंत, साक्षी,निक्षा, श्रध्दा गगन, आनंद, या प्रगती मराठी विद्यालयाच्या पाचवी सहावी इयत्तेत शिकणाऱ्या मुलांनी खुप मदत केली. त्याना पाणी आणून देणे, वडापावचे वाटप करणे, साखर पाणी लिंबूपाणी,देणे, कुणाला दुखापत लहानसहान फ्रॅक्चर झालेच तर झटपट सायकलवर बसवून डॉक्टरांकडे घेऊन जाणे, बसमधून उतरल्यावर मैदानावर सरावासाठी घेऊन येणे, अशी मोलाची मदत केली. म्हणूनच मनोज आणि त्याच्या सर्व मित्रांना चांगल्या कामाचे बक्षीस आणि ट्रॉफी मिळाली आहे. इतक्यात मनोज सोबत मित्र मंडळ आले त्यांच्या सोबत अंध मुलांच्या गोविंदा पथकातील सर्व मुलेमुली सुध्दा होत्या सगळ्यांच्या हातात आपल्या ट्रॉफी होत्या. सेक्टर बाराच्या बाहेर मुख्य रस्त्यावर सर्व लोकांनी त्यांच्या वर फुले उधळून जोरदार कौतुक केले. सुलभा पटकन हातात बुंदीच्या लाडूचा बॉक्स घेऊन आली आणि म्हणाली,

“माझ्या लाडक्या भावानो, बाल गोविंदानो समोर उभे राहा एकसाथ मस्तपैकी फोटो आणि सेल्फी घेऊ!”

अंध गोविंदा पथकाचे मुख्य मार्गदर्शक म्हणाले या सेल्फीला नाव देऊया,

“वडापाव , फ्रॅक्चर, आणि दहीहंडी!”

सेक्टर बारांच्या लहान मुलांची मदत झाली म्हणून तर अंध मुलामुलींच्या गोविंदा पथकांने बाजी मारली!

गोविंदा रे गोपाळाचा जयघोष सेक्टर बारा मध्ये जोरदार दुमदुमून गेला.


# कलेची जोपासना ही तपश्चर्याच

**प्रगती विद्यालयात आठवीत शिकणारा अजय त्याचे चित्रकलेचे शिक्षक श्री. पेंडसे यांच्यासमोर मान खाली घालून उभा होता. आज त्याने प्रथमच त्यांना ‘यापुढे मी शाळेच्या भित्तिपत्रकांसाठी चित्रे काढणार नाही’ असे सांगितले होते. ते ऐकून पेंडसे सरांना मोठे नवल वाटले. अजय हा एक हुशार विद्यार्थी होता. लहानपणापासून त्याला चित्रकलेची मनस्वी आवड होती. हा पुढे उत्तम चित्रकार होईल हे ओळखूनच पेंडसे सरांनी अजय चौथ्या इयत्तेत असल्यापासून त्याच्यावर विशेष लक्ष ठेवले होते. त्याला चित्रांचा सराव व्हावा म्हणून ते त्याच्याकडून टिळक जयंती, गांधी जयंती, स्वातंत्र्यदिन, दसरा, रक्षाबंधन अशा विशेष प्रसंगी शाळेच्या फलकावर लावण्यासाठी चित्रे काढून घेत. त्या चित्रांचे सर्वजण कौतुक करीत. चित्र काढताना त्याचा उत्साह बघण्यासारखा असे. सरांनी दिलेले प्रत्येक काम ज्याने मनः पूर्वक केलेले होते, तोच अजय आज चित्र काढण्यास नाही म्हणत होता.**

**शेवटी या नकारामागे काय रहस्य दडले आहे ते जाणून घ्यावे म्हणून पेंडसे सरांनी त्याला जवळ घेतले. मोठ्या मायेने. त्याच्या हात फिरवला व म्हणाले, “काय झालंय ते सांगशील?” अजय म्हणाला, “माझ्या वर्गातली मुलं माझ्या चित्रांना नावं ठेवतात. त्या चित्रांमध्ये अनेक दोष दाखवतात. पेंडसे सरांनी याला उगीचच डोक्यावर चढवून ठेवला आहे असं म्हणतात. त्यामुळे मला वाईट वाटतं.” ते ऐकून सर हसले. त्यांनी अजयला वर्गात पाठवले,त्यांनतर दोनच दिवसांनी आठवीच्या वर्गावर पेंडसे सरांचा तास होता. त्या दिवशी वर्गात प्रवेशताच सर. म्हणाले, “आजचा तास जरा वेगळ्या स्वरूपाचा आहे.” ते ऐकून मुलेही सरसावून बसली.**

**त्यानंतर त्यांनी अजयने काढलेले एक चित्र फळ्यावर लावले व म्हणाले “मुलांनो, हे, अजयने काढलेले गणपतीचे चित्र आहे. यात तुम्हाला काय काय दोष दिसतात ते सांगा.” तेव्हा काही मुलांनी त्यातील दोष सांगितले ते सरांनी फळ्यावर लिहीले व त्यापुढे त्या-त्या मुलांची नावेही लिहिली. त्यानंतर त्यांनी त्यांच्यापैकी प्रत्येकाला फळ्याजवळ बोलावले आणि त्यांना रंग कामाचे सर्व साहित्य देऊन ते दोष सुधारण्यास सांगितले. पण एकालाही ते धाडस झाले नाही. तेव्हा सर म्हणाले, “पाहिलंस अजय, दोष दाखवायला सर्वच पुढे येतात, पण ते सुधारण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. म्हणून आपलं काम सोडू नये. कलेची जोपासना ही एक प्रकारची तपश्चर्याच आहे. तीत अनेक अडचणी येतील तरी डगमगू नये. या खंबीर प्रयत्नांतच भविष्यातील यश दडलेलं असतं..’ ते ऐकून अजयला मोठा हुरूप आला, तर वर्गातील इतर मुलांची तोंडेच बंद झाली.**

## मनोरंजक शब्दकोडे




**आडवे शब्द :**
१) श्रावणमासी हर्ष मानसी ×××× ×× ×××× ७) एक मद्य प्रकार ८) काम ९) कमल हासनचा एक सिनेमा ११) लांब केसांचा सस्तन प्राणी १३) साहस शोधणारा १४) बोभाटा १७) मस्ती, रग १८) मुळापासून १९) धोबी, परीट २०) एक आंबटगोड फळ २२) उत्सव २३) नोकर २४) लोक २६) गोष्टीतील काल्पनिक शहर २८) खूप जोराचा ३०) कपड्याचे छोटे तुकडे ३१) कष्ट, श्रम ३४) अमिताभ बच्चनचा एक प्रसिद्ध असा चित्रपट ३५) आशीर्वाद ३६) वडील

**उभे शब्द :**
१) छोटा हिरा २) हत्या ३) जावई ४) लुटेरा ५) हिमवंत, हिमवान ६) फुलाचे एक नाव ९) स्वाक्षरी १०) ठावठिकाणा १२) गडबड, गोंधळ १३) राजा १५) मोड, वाकण १६) लांबी मोजण्याचे एक परिमाण १७) मनूने निर्माण केलेला पुत्र २०) नखरा २१) जागृत, ताजातवाना २५) शहर २६) आरंभ करणे २७) एक शेंगभाजी २९) एक पशू ३०) कूर्म ३१) रावणाचा भाऊ ३२) एक ऋतू ३३) महिना

## चित्रातील ५ फरक ओळखा




## चित्र रंगवा




## बाल चित्ररंग



सम्राट शिंदे
सेंट मेरी हायस्कूल
मुलुंड(प)



## स्टाईल मारी



भूमित्रा साळसकर

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्री. मधुसूदन बापू सदडेकर
संस्थापक - अध्यक्ष : नवकिरण मंडळ
कार्याध्यक्ष: बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघ
अध्यक्ष : अंधेरी वृत्तपत्र विक्रेता सेना
शुभेच्छुक
रविंद्र चिले
वृत्तपत्र विक्रेते